
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३१०८



REFBK-0024667


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 SEP 1985
29 SEP 1985
16 OCT 1985
22 JUL 1987

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

मे. वि. दर्शित लेख
संदर्भ विभाग
३१०८
३४६७
१९८८५



बकुळीची फुले

(ललित लेख)

ग्रंथालय वणे
दा. क्र.
शाखा (स्थळ

प्र. श्री. नेरूरकर

REFBK-0024667

चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्था,
मर्यादित- कुडाळ.

प्रकाशन क्र. : ३

प्रकाशक :

वि. गं. भागवत

चिंतामणी साहित्य
सहयोग प्रकाशन संस्थेकरिता

© : सौ. **उमा नेरूरकर**

मुखपृष्ठ : श्री. **बाळ ठाकूर**

मुद्रक :


य. गो. म्हात्रे

नरेश मुद्रणालय,
चेंढरे–अलिबाग

मूल्य : **पंधरा रुपये**

आवृत्ती पहिली : जानेवारी १९८५

Bakuleechi Phule / P. S. Nerurkar



'बकुळीची फुले' वेचताना

लहानपणापासूनच बकुळीची फुले ही माझी आवडती फुले. नेरूरला माझ्या गावी आमच्या चव्हाट्यावरील घरांजवळच तळ्याच्या बांध्याने बकुळीची प्रचंड झाडे हारीने उभी आहेत. एक झाड तर तळ्याच्या काठाला पाण्यातच उभे आहे. त्याची फुले पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगायची व पाण्यात तरंगतच लहानपणी आम्ही मुले ती गोळा करायचो. कोकणी, मालवणी भाषेत बकुळ म्हणजे ओवळ व बकुळीची फुले म्हणजे 'ओवळा.' ओवळा सुकली तरी त्यांचा सुगंध दरवळतच रहातो. गंमत म्हणजे आज साहित्य सहवासातही आमच्या 'फुलराणी' समोर ओवळीचे सुबक वाढते झाड एखाद्या घरती नारीसारखे ओवळांचा सडा भूपृष्ठावर पसरीत छान सुंदर हिरवेचार उभे आहे. खाली गेलो की ती फुले मी लहान होऊन वेचतो.

या पुस्तकातील 'बकुळीची फुले' मात्र बेळगावची आहेत. माझे काका कै. विठ्ठलराव गुणाजी नेरूरकर यांनी मला लहानपणी दहाव्या वर्षी इंग्रजी शिक्षणासाठी बेळगावला नेलं. ते मिलिटरी अकाऊण्ट्स्मध्ये नोकरीला होते. शालेय शिक्षण व नंतर महाविद्यालयाचे पहिले वर्षही माझ्या काकांमुळेच- आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू– माझे बेळगावात गेलं. माझी धाकटी बहीण सौ.विमल व तिचे यजमान आप्पासाहेब वेतुरेकर गेली चाळीस वर्षे बेळगावलाच राहतात. त्यांच्या मुलांबाळांचे शिक्षण बेळगावलाच झाले. त्यामुळे सतत माझा बेळगावशी संबंध आजतागायत चालू राहिलाय. नंतर बेळगावचे धडाडीचे कामगार पुढारी व डाव्या विचारसरणीचे लेखक, पत्रकार व समाजसेवक कृष्णा मेणसे यांचे व माझे स्नेहसंबंध जुळत गेले. बेळगावातील रवी मुद्रणालयाचे संचालक व माझे थोर स्नेही सदाशिवराव हुंद्रे यांची गाठ पडली. मेणसेमुळे मग एके दिवशी मेणसेंच्या घरी बेळगावातील तरुण साहित्यिक कार्यकर्ते व पत्रकार मला भेटले. कृष्णा मुचंडी व कृष्णा

शहापूरकर यानी 'बेळ गाव वार्ता' द्विसाप्ताहिक सुरू केले होते. शिवाय कृष्णा मेणसे यांचा 'साम्यवादी'चा दिवाळी अंक निघायचा. मी त्यात लिहू लागलो

इ. स. १९७७ पासून मी 'बेळगाव वार्तेत' 'बकुळीची फुले' लिहू लागलो. बेळगावात गेलेलं लहानपण व तरुणपण जीवनभर स्मृतिविश्व व्यापून राहिलेलं. ते मी माझ्या या छोटेखानी ललित लेखांतून पुनः एकदा साकार करीत गेलो. ते आत्मकथनपर लेखन मी सातत्याने काही काळ केलं. मध्यंतरी त्यात खंडही पडत गेला. पुनः मग ते लिहिलं गेलं. असे एकूण तीस छोटेखानी ललित लेख मी 'बेळगाव वार्ता'मधून लिहिले. त्यांचा संग्रह म्हणजे ही 'बकुळीची फुले.' रसिकांना ती– विशेषतः बेळगावातील– भूतकाळात घेऊन गेलीत. बेळगावातील माझे थोर स्नेही व मराठीचे प्राध्यापक, लेखक व राणी पार्वतीबाई महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य अरविंद याळगी यांना ही फुले फार आवडली. त्यांनी मला ती सतत लिहित रहाण्याचा आग्रह वेळोवेळी केला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ, नेरूर, वालावल, सावंतवाडी परिसरात स्थापन झालेल्या '**चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्था लि.**'चे अध्यक्ष व माझे तरुण वयापासूनचे परमस्नेही व गाववाले लेखक, कवी, कादंबरीकार, प्राचार्य विद्याधर भागवत व कार्यवाह सी. श्री. उपाध्ये यानी माझे पुस्तक प्रकाशित करण्याची इच्छा तप्तरतेने प्रकट केली. आणि मी आता 'बकुळीची फुले' रसिकांना सादर करीत आहे. 'अभिनव प्रकाशन'चे वामनराव भट यांनी पुस्तकाचे मुद्रण पाहिले. माझे गेल्या तीन दशकांतले गाववाले साहित्यिक व शिक्षकी पेशातील मित्र प्रा. आ. ना. पेडणेकर यानी अलिबागला पुस्तकाची मुद्रिते स्वतः तपासली. पुस्तकातील ललितलेखांच्या प्रकाराबद्दल माझ्याबरोबर चर्चा केली. श्री. म्हात्रे यानी पुस्तकाचे मुद्रण केले. मी या सर्वांचा सदैव ऋणी आहे.

८–१–१९८५
१३ फुलराणी,
साहित्य सहवास,
बांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

प्र. श्री. नेरूरकर

ती. स्व. अण्णाना

व

काकीला

जी दोघेही आता या जगात नाहीत.

ओवण्याआधी—

बाल-कुमारवयातल्या निखळ आठवणी साहित्यात बहुधा दुर्मिळ असतात. काहीजण बाळपणात निरागसता भरभरून वाहू देण्याचे पाप करतात. काहीजण शैशव रंगवताना प्रौढत्वाला जपत असतात. वाचकाला चुकल्या-सारखे वाटायला लावणारे अचूक तपशील काहीजण पुरवतात. कधी प्रतिमांच्या दाटीत बाळपणचा चेहरा पुसला जातो, कधी भूतकाळात शिरू पाहणाऱ्या बाळाला प्रौढाचा चष्मा चढवला जातो. कधी नुसते उसासे उरतात. कधी अपराधी जंत्री.

यामुळेच असे आत्मपर लेखन कथा, कविता, नाटक यांसारख्या शुद्ध वाङ्मयप्रकारात मोडत नाही असे मानले जाते. बालमन— प्रौढ जाणीव, खरी घटना— कलात्मकता, गतकाल—सद्य:स्थिती यांच्या ओढाताणीत आत्म-पर लेखन गुदमरल्यासारखे होते का ? बाळपणावरचे हे लघुलेख मुख्यत: कोणासाठी असतात ? ते निश्चित ठरवणे नेहमीच सोपे नसते.

श्री. प्र. श्री. नेरूरकरांनी ' बकुळीची फुले ' या तीस लघुलेखात आपल्या विसाव्या एकविसाव्या वर्षापर्यंतच्या आठवणी सांगितल्या आहेत. लेखांचे आकडे विसरायला लावणारी प्रवाही उत्कटता त्यात आहे. त्यांनी कालानु-क्रमाने लेखन न केल्यानेही असेल, कृत्रिमता टळली आहे. इंग्रजी पहिली (म्हणजे त्यावेळी दहावे वर्ष) पासून आठवणी सुरू होतात, कॉलेजच्या प्रथम वर्षानंतर पुन्हा ते अगदी लहानपणच्या आठवणीत रमतात. जाणिवा तरल झाल्याचे प्रत्यय पुष्कळदा येतात. पण त्यांचा आलेख काढणे अनावश्यक आहे आणि अशक्यही.

आजच्या काळातला प्र. श्री. नेरूरकर हा विविध भूमिकांनी समृद्ध आहे. कथा, कादंबऱ्या, संपादन, समीक्षा, अध्यापन, मुलाखत, भाषण, प्रवास, गोवा-सत्याग्रह, अनुवाद अशा क्षेत्रात तो समर्थपणे वावरला आहे. इथल्या आठ-वणी इतक्या विनाभाष्य आहेत की त्या ह्या सर्व भूमिकांचा विसर पाडायला लावतात. हे या आखीवरेखीव नसलेल्या पाल्हाळिक लेखांचे यश आहे.

या लेखातून डोकावतो तो एक संवेदनशील पोरगा. रमतगमत बालपणाबद्दल ऐसपैस बोलताना तो पुन्हा पुन्हा म्हणतो– ' अजूनही स्पष्ट आठवते.' तरीही पुष्कळ गोष्टी ' आठवत नसल्याचे ' त्याला आठवते. संभरवेळा शिक्षा म्हणून लिहिलेले वाक्य, कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या कवितांची नावे त्याच्या स्मरणातून गेलेली आहेत. असे हे विसरणे त्याच्या स्मृतींना प्रांजळतेचा उजाळा देत राहते.

मुलगा असलेल्या प्रभाकरने त्या त्या वेळी ह्यातील काही गोष्टी निःसंकोच सांगितल्या असत्या का ? हातचे राखून न ठेवता सांगणे शक्य झाले ते प्रौढपणामुळे का ? गच्चीतून मुतल्यावर त्याला मारवाडणीने मार दिला. प्रगति–पुस्तकातील नापासचा ना त्याने खोडला. सप्लिमेंटसची चोरी केली. श्रीमंत देसाई मंडळींनी मेलेल्या माणसासाठी केलेला दानधर्म घ्यायचा नाही असे ठरवता ठरवता तो अखेर आशेने उभा राहिला आणि त्याला एक रबरी तुकडा विभागून मिळाला. असले प्रसंग प्र. श्रीं. नी अतिशय पारदर्शी भाषेत कथन केले आहेत.

पन्नास-पंचेचाळीस वर्षापूर्वीचे अनुभव प्र. श्रीं. नी सात-आठ वर्षापूर्वी लिहिले. मुलाच्या स्मृतीत विसाव्या शतकाची दोन दशके (तिसरे, चौथे) दवबिंदूत आकाश उमटावे तशी प्रतिबिंबित झाली आहेत. मूक सिनेमा, बोलपट, सर्कस, भावगीत, फोनोच्या तबकड्या, फोटो स्टुडिओ, चावट फार्स, बाँब, गांधीजी... अशांशी त्याचा पहिला परिचय. प्र. श्रीं. च्या पिढीचे वाचक आपले अनुभव नकळत ताडून पाहतील, नवे वाचक विस्मयाने वाचतील.

पडलेले विमान बैलगाडीएवढेही नसल्याचे पाहून हा पोरगा हिरमुसला होतो. अनगोळकर सर त्याला दोन्ही हातांनी उचलतात तेव्हा त्याला गांधीजी ' चित्रात पाहत होतो तस्सेच ' दिसतात. कंदिलाच्या गूढ प्रकाशात वासुदेवाला पाहून तो थरारतो. ' डोळे हे जुल्मी गडे ' गायिल्याबद्दल झालेल्या शिक्षेपेक्षा त्या शिक्षेतून सोडवणाऱ्या तरुणीची त्याला आजही याद येते.

प्र. श्रीं . ना आठवणाऱ्या व्यक्तिरेखा घटनांच्या संदर्भात येत नाहीत बहुतेकांचे स्थिरचित्रण झालेले आहे. त्यांच्या वेषात, दिसण्यात, लकबीत ते

रंगतात. आजही प्र. श्री. ह्या व्यक्तींकडे कुमाराच्या डोळ्यांनी व कुतूहलाने पाहतात. ही कठीण गोष्ट आहे पण ती त्यांना साधते.

पुणे, नेरूर, बेळगाव ह्या गावांशी निगडित अशा ह्या आठवणी. बेळगावच्या साप्ताहिकासाठी लिहिलेल्या म्हणून बेळगावच्या बाळजीवनाशी निगडित गोष्टींवर मुख्य भर देऊन लेखन केलेले असावे. मामांच्या मृत्यूने व्याकुळ होणारा, बांधून घातलेल्या चोराबद्दल हेलावून जाणारा प्रभाकर इतक्या वर्षानंतरही शब्दांनी मागे जाऊन जस्साच्या तसा पकडलेला. आजच्या प्र. श्रीं. नी स्वत:ला पुसून टाकण्यात कौतुकास्पद यश दाखवले आहे. यश वाटू नये इतक्या सहजपणाने.

प्र. श्री. या तीस भागांना ' बाल्यपर लघुलेख ' म्हणतात. ' ललित हे विशेषणही त्याना लावू नये, लालित्य म्हणजे आजकालचे आलंकारिक, काव्यमय, पोज घेणारे लेखन, (म्हणजेच कृतक लेखन !) प्र. श्री. कमावलेल्या भाषेत गमावलेल्या बाल्याला बंदिस्त करीत नाहीत. दाटणाऱ्या बाल्य स्मृतींना ते शब्दातून हवे तसे वावरू देतात. जेवणातील रफेज पोषणाला महत्त्वाचे. सहज येणाऱ्या निर्देशानी भाववृत्तीचा ताजेपणा जपला आहे आणि प्रौढपणची अनाग्रही बालवृत्तीही.

अलिबाग
७–२–८५.

–आ. ना. पेडणेकर

एक

बेळगाव म्हटलं म्हणजे लहानपण आठवतं. माझ्या काकानी माझं नाव इंग्रजी पहिलीत बेननस्मिथ हायस्कूलमध्ये घातलं. शेहचाळीस वर्षं झाली. कोकणातून बेळगावात आलो होतो. पहिल्याच दिवशी पहिल्या इयत्तेत बसलो त्याचवेळी बेळगावी मुलानी 'कोकणी भात बोकणी' म्हणून मला चिडवायला सुरुवात केली बेळगावात पाऊल पडलं आणि जाणवलं ते म्हणजे बेळगावची थंडगार हवा. तशी ती हवा प्रवासात आंबोलीपासून सुरुच झाली होती. मी काकांकडे चपाती खायला लागलो होतो· बेननस्मिथ हायस्कूल-पासून जवळच असलेल्या रावबहादूर परुळकरांच्या बंगल्यात माझे काका राहात होते. मिलिटरी अकाऊण्ट्समध्ये ते नोकरी करीत होते. गोरेगोरे पान. रुबाबदार. नेहमी सुटाबुटात. गळ्यात नेकटाय उंचीपुरी देखणी अंगकाठी. साहेबी शैलीतील इंग्रजी बोलणं. घरात सगळं कसं साहेबी. टाण्टीपखुर्च्या कपाटे, दिवे, पलंग, मच्छरदाण्या. सायकल, नोकर, चाकर, परुळकरांच्या बंगल्याचं आवार खूप मोठं होतं. मागच्या बाजूला एक टेकडी होती. आणि त्या टेकडीवर गाईगुराना द्यायच्या गवताचे डोंगर रचलेले होते. पण टेकडीच्या पायथ्याशी मुलाना व मोठ्यानादेखील खेळायला जागा होती. कधी क्रिकेट, कधी हॉकी. शाळा अगदी जवळ होती. बंगल्यातून इतर मुलांबरोबर निघालो की चर्च भेटायचं त्याची घंटा आपली सकाळ संध्याकाळ वाजत रहायची. पुढे गेल्यावर युनियन जिमखाना. जिमखाना ओलांडला की बेननस्मिथ हायस्कूल, हायस्कूलच्या आवारात येण्यासाठी दोन फाटकं होती एक जिमखान्याकडचं आणि दुसरं शिरगाव-करांच्या बंगल्यापुढील रस्त्यावरचं, आवारात पाऊल पडताच रस्त्याकडेच्या विहिरीवर लक्ष जायचं तिच्या शेजारी एक उंच चिंचेचं झाड उभं होतं. दुपारच्या सुटीत चिंचेखाली सवंगड्याबरोबर छान वेळ जायचा. चिंचा खात.

शिरगावकरांचं नाव त्यावेळी बेळगावात फार मोठं होतं. सारखं शिरगावकर शिरगावकर चंदू व रवी शिरगांवकर माझ्याच वर्गात होते. भरलेल्या अंगाचे देखणे, गोरेपान मी कोकण्या. लिडीपिचांग. किडकिडीत. पण मग आम्ही चांगले मित्र झालो. अधून मधून शिरगांवकरांच्या बंगल्यात जायला लागलो. चंदू रवीबरोबर अजूनही आठवत म्हणजे त्यांच्या बंगल्याच्या आवारात असलेली तो रंजनांची हिरवी चार झाडे. त्याना फुटबॉलसारखी गोल गोल वाटोळी व हिरवी तोरंजने फाद्याफाद्यावर लटकलेली असत. सुटीत वगैरे आम्ही खेळायला गेलो की तोरंजने तोडून मग ती फोडत होतो. आतील लालबुंद गर खात होतो. कच्ची अर्धवट तोरंजने तोडली तर त्यांचेच फुटबॉल करून आम्ही खेळत होतो. आमची एक क्रिकेटटीम होती. बेळगावच्या इतर टीमबरोबर आमचे सामने होत असत. कधी हॅरिस ग्राऊंडवर, कधी स्टेशन ग्राऊंडवर तर कधी मिलिटरीत कुठच्या तरी रिकाम्या हॉकी मैदानात. मी स्लोबॅट्समन व स्लो बॉलर होतो. ओपनिंगला जायचा नि शेवटपर्यंत टिकायचा. स्टेडी धावसंख्या मात्र जेमतेम असे आमच्या वर्गातील सरोदे लष्करातल्या आपल्या क्रिकेटटीमचा कॅप्टन होता. लहानपणीच नंतर बेळगाव सुटले. खूप वर्षांनी मी कोल्हापूरला बी. एडच्या अभ्यासाला गेलो. पावशतक उलटून गेले होते. रवी शिरगावकर व सरोदे भेटले. लहानपणाच्या मग खूप आठवणी आम्ही आठवल्या. बायरन साहेबांची आठवण त्यातली प्रमुख. हे अमेरिकन साहेब आम्हाला इंग्रजी शिकवायचे. निळा निळा सूट घालून ते वर्गात यायचे. फळ्यावर रंगीत खडूनी चित्रे काढायचे, हसायचे, रडायचे, नाचायचे, उडया मारायचे. आम्हाला हळूहळू ' लाफ ', ' क्राय ', ' डान्स ', ' जम्प ', या शब्दांचे अर्थ कळायला. लागले. त्यानीच आमचं बालवीर पथक चालविलं त्यानी शिकविलेल्या एक दोन गोष्टी आजही आठवतात. डफेदार मास्तर होते लंगडे, काळीफेझ टोपी डोक्यावर ऐटीत ठेवायचे. गामा आणि इमाम बक्षाच्या कुस्तीच्या बहाद्दर कथा त्यानी रंगवून सांगितलेल्या. मी अजून विसरलो नाही. अजगर्णी सर स्वत:च्या घोडागाडीतून यायचे. बायबलचा तास द्यायचे, बायबलातील जुन्या काळातील गोष्टी वाचताना ख्रिश्चन धर्मात तुम्ही या म्हणून आम्हाला उपदेश करायचे. धर्माचा अर्थ तेव्हापासून माझं मन शोधतंय ! आजतागायत.

❋

दोन

बेननस्मिथ हायस्कूलमध्ये आम्हाला इंग्रजी पहिली दुसरीला सुतार कामाचा एक किंवा दोन तास आठवड्यातून असायचे. एक दक्षिणात्य शिक्षक तो तास घ्यायचे. ते लुंगी घालायचे. लुंगीवर झब्बा असावा मला वाटतं. किरकोळ देहाचे पण कडक. कार्पेंटरीचा वर्ग एका वेगळ्या झापाच्या की पत्र्याच्या बराकीमध्ये होता. त्या वर्गासमोर सुंदर बाग केलेली होती. एका बाजूला फुलझाडे होती. दुसऱ्या बाजूलाफ ळझाडे होती. फळझाडांमध्ये पेरू होते, डाळिंबे होती आणि टोमॅटोची लागवड एका विभागात केलेली होती. बारीक बोरासारखे टोमॅटो छोट्या छोट्या झाडावर लाल पिवळे असे तरारलेले असायचे. वर्गातून बाहेर पडताना ते तोडून खायचा मोह अनावर व्हायचा. चोरी कधी करू नये असं अजगर्णी सर शिकवायचे, पण तरीही टोमॅटो चोरून चड्डीच्या खिशात भरल्याशिवाय काही आम्ही वर्गात पाऊल टाकीत नसू. सुतारकामाच्या तासाला एक लेखणीदान व एक चौकोनी पेटी–वरच्या फटीतून आत पैसे टाकायची, एक पुस्तके ठेवण्याचे शेल्फ आणि भिंतीला लावायचे खुंट केल्याचं आठवतं. त्यानंतर हातात तासणी, हातोडा घेण्याचा योगायोग आलाच नाही. त्या बागेला लागूनच भिंत होती. त्या भिंतीपलीकडे ख्रिश्चन लोकांचे स्मशान होते. ती भिंत सरळ रेषेत वनिता विद्यालयापर्यंत पसरलेली होती. बागेत टोमॅटो तोडताना भिंती पलिकडे लक्ष जायचं. दुपारच्या सुट्टीत आम्ही पुनः त्या बागेत जायचो नि भिंतीवर चढता येईल तितके चढून पलिकडे पाहायचो. सगळीकडे थडगीच थडगी पसरलेली. आणि त्या थडग्यांच्या सभोवार चिंचा, पेरू, सीताफळे आणि विलायती चिंचांची झाडे विखुरलेली होती. वर्गात दोन चार धाडसी मुलगे होते. ते भिंत ओलांडून पलिकडे जायचे. एकदा मीही त्यांच्यात सामील झालो.

गोड गोड पेरू खाऊन पोट अगदी टुम्म झालं होतं. तर आमच्या पुढचात शिवाप्पा उभा. डोळ्याला रुमाल बांधलेला. गुडघ्यापर्यंत पंचा, अंगात मुंडासं, दांडगा भक्कम माणूस, हसतमुख, शाळेचा माळी, पोरांचा आवडता म्हणाला, निमूटपणानं माझ्याबरोबर चला. साहेब बोलावतोय. चटकन् लक्षात आलं. वेननस्मिथ हायस्कूलच्या मुख्य दगडी इमारतीत दुसऱ्या मजल्यावर स्मिथ साहेबांचं ऑफिस होतं. स्मिथसाहेब शाळेचे प्रिन्सिपल होते. अमेरिकन, गोरेपान, देखणे. शाळा सुरू व्हायच्या अगोदर शाळेतील सर्व मुले घंटेबरोबर ड्रॉईंगरूम समोरच्या पटांगणात वर्गवार जमायची. स्मिथसाहेब प्रार्थना सांगायचे. प्रवचन द्यायचे. आम्हा पोराना काहीच कळत नसे. आमेन मात्र लक्षात राहील. आपटुडेड सुटाबुटात ते शाळेत यायचे. वर्गावर्गावरून फेरी मारायचे तेव्हा दृष्टीला पडायचे. नंतर कधीच दिसायचे नाहीत. साहेबांच्या खोलीत आम्ही गेलो तुम्ही चोरी करीत होता. चोरी करणं पाप आहे. साहेब म्हणाले. साहेबांनी लांबलांब वह्या काढल्या. मला आठवते शंभर दोनशे ओळी शाळा सुटेपर्यंत आम्ही लिहीत होतो. कसलेतरी उपदेशपर वाक्य होते. पण तरीसुद्धा स्मिथसाहेबाबद्दल आम्हा पोराना अभिमान वाटायचा. त्यांच्याबरोबर सगळ्या शाळेचा फोटो काढला होता. त्यात मी इवलासा त्यांच्या पुढचातच इतर मुलांबरोबर बसलो होतो. त्याच वर्षी मला वाटते स्मिथसाहेब शाळा सोडून गेले होते. ते उत्तम क्रिकेट खेळायचे. युनियन जिमखान्यावर एकदा सावंतवाडीकरांचा वेळगावकरांशी चुरशीचा क्रिकेट सामना झाला होता. कै. बापूसाहेब महाराज सावंतवाडीतर्फे खेळताना आम्ही पहात होतो. बापूसाहेबांनी षटकार मारलेला आम्ही पाहिला होता. त्यानी चौकार मारला की टोप्या हवेत उडवीत आम्ही सावंतवाडीवाली मुले नाचायचो, ओरडायचो. पण आमचे स्मिथसाहेब वेळगावकरातर्फे खेळत होते. त्यानीही चौकार मारला की आम्ही नाचायचो. पण शाळेकडच्या झाडाखाली बसून तो क्रिकेट सामना पहाताना मनाची कुतरओढ होत होती. बापूसाहेब महाराजांचा विजय व्हावा असे तर वाटायचेच. पण स्मिथसाहेबांचे शतक झळकावं असेही वाटायचे. गंमतच होती.



तीन

बेननस्मिथ हायस्कूलमध्ये म्हातारे गोखले सर होते. डोक्याला पांढरा रुमाल बांधायचे. शुभ्र धोतर, लांब बारावंदी कोट, गळेबंद. मराठी शिकवायचे. दिंडी वृत्तातील 'ध्रुवाख्यान' ते दिंडी वृत्तात म्हणायचे. आम्हाला कोकणात इयत्ता पाचवीत गुरुजींनी दिंडीवृत्त तालासुरात म्हणायला शिकवलं होतं. 'कुणाला म्हणता येतं का दिंडीवृत्त ?' गोखले सरानी विचारलं. मी उभा राहिलो आणि 'ध्रुवाख्यान' दिंडीवृत्तात तिसरा चरण दोनदा घोळवीत म्हटलं. गोखले सरानी एकदम मला आपल्याजवळ ओढलं. मग कवितेच्या प्रत्येक तासाला वेगवेगळ्या वृत्तातील कविता ते मलाच गायला सांगत. मीही मोठ्या आनंदानं व चवीनं कविता गात असे तर त्यावेळी बेननस्मिथ हायस्कूलमध्ये एक चांगली शैक्षणिक प्रथा होती. दर आठवड्याला एका विषयाची परीक्षा व्हायची. शनिवार हा परीक्षेचा दिवस. अशा रीतीने प्रत्येक विषयाची वर्षांतून चारदा परीक्षा व्हायची. शिवाय सहामाही. प्रत्येक विषयात शेकडा पन्नासपेक्षा अधिक गुण मिळाले म्हणजे त्या विषयाला वार्षिक परीक्षेत सूट मिळत असे. पहिल्या इयत्तेत पहिल्याच सहामाहीत मी इंग्रजी विषयात शंभरपैकी पंचाण्णव गुण मिळविले. मी संध्याकाळी उत्तर पत्रिका नेऊन घरी दाखवली. तर माझ्या काकांचा त्यावर विश्वासच बसेना. मी खोटं बोलतो व बनावट उत्तरपत्रिका दाखवितो म्हणून मला काकांकडून मार खावा लागला. खरं बोलल्याबद्दल मार का बसावा हेच मला कळत नव्हतं. मात्र गणितात मला भोपळा मिळाला होता. गोखल्यांचं गणित होतं आणि (मला आता आठवत नाही) पण एक काळा लांब कोट घालणारे, वाटोळी टोपी घालणारे, कानडी बोलणारे शिक्षक, तो विषय आम्हाला शिकवायचे. तोंडी उत्तर चुकलं की थाडकन् तोंडात

मारायचे. एकदा तर माझी चड्डी ओली झाली होती. इतका मार मी त्यांच्याकडून खाल्ला. दुसऱ्या दिवशी काका स्वत: शाळेत आले त्यांची शंका फिटली. संध्याकाळी मी घरी गेलो तर म्हणाले, ' उद्यापासून तुला गणिताची शिकवणी ठेवणार आहे...' काकांचे दोन मुलगे खडे बाजारात दोन नंबरच्या शाळेत शिकायला जात. त्याना गुरुवर्य श्री. अनगोळकर शिकवीत. दुसऱ्या दिवसापासून ते आम्हाला गणित शिकवायला घरी येऊ लागले. अनगोळकर सरानी गणित विषय इतका पक्का करून घेतला की त्यावर्षी पहिलीत वार्षिक परीक्षेला मला फक्त गणित या एकाच विषयाला बसावं लागलं होतं. आणि त्या विषयात मला शंभरपैकी फक्त चार गुणच कमी पडले होते. अनगोळकरसर सायकलवरून यायचे. उंच शिडशिडीत देहयष्टी. चाप्चोपून नेसलेलं धोतर, सदरा, कोट, डोक्यावर टोपी. (काळी की गांधी ?... आता आठवत नाही) त्यांच्या सायकलवर मी पहिलं ' हॉपिंग ' शिकलो. आणि फ्रेममधून दोन्ही पायडलवर पाय टाकून सायकल चालवायलाही शिकलो. कधी रागवायचे नाहीत. सदा हसतमुख. प्रेमळ आर्जवी आवाजात ते आमच्याकडून गणिते सोडवून घ्यायचे. रीत सांगायचे.

दुसरे जॉन नावाचे शिक्षक आम्हाला कवायत शिकवायचे. ते बाटलेले ख्रिश्चन होते. पोरे त्याना थट्टेनं ' जॉनसाहेब ' म्हणायचे. नेहमी खाकी कपड्यात ते असायचे. डोक्यावर खाकी सन हॅट, हातातील बेताची काठी पायावर सपकन मारायचे. हॅरस मैदानावर ते आम्हाला लेफ्ट राईट करीत कवायतीसाठी घेऊन जायचे. संध्याकाळचे चार वाजले होते. बेळगावात रेसकोर्सवर त्या काळात दोन विमानं उतरली होती. अधूनमधून ती बेळगाव शहरावरून घिरट्या घालायची. विमान म्हणजे केवढी अपूर्वाई आम्हाला वाटायची. विमान केवढं मोठं असेल याबद्दल आम्हा मुलांचे तर्कवितर्क चालायचे. कुणी म्हणायचे ते घराएवढं मोठं असतं. आमची कवायत चालली होती आणि विमान डोक्यावरून उडत होतं. मध्येच एकदम जॉनसाहेब ओरडला, '...पोरानो, पळा विमान खाली पडतयं...' आम्ही वर पाहिलं तर विमान पंखे बंद पडून दगड खाली यावा तसं येत होतं. पण ते हॅरिस मैदानावर पडलं नाही. अरगन तलावाकडे रस्त्याच्या बाजूला पत्र्यांच्या संडासावर कोसळलं. आम्ही पोरं अरगन तळ्याकडे धावत गेलो. सगळं

बेळगाव धावत होतं आम्ही विमानाच्या खूप जवळ गेलो. त्याचं नाक जमिनीत घुसलं होतं. पंखा तुटला होता. पेट्रोल टाकीतून गळत होतं. विमानात कुणीच नव्हतं. मात्र ते विमानाचं पहिलं दर्शन घेऊन आम्ही निराश झालो. बैलगाडी एवढंसुद्धा ते विमान मोठं वाटत नव्हतं. छोटसं घराची खोलीसुद्धा त्याच्यापेक्षा मोठी वाटत होती. मग आम्ही भानावर आलो. तर हजारो माणसांचा गराडा आमच्याभोवती पडला होता. हळूहळू वाट काढीत आम्ही बाहेर पडलो. तेव्हा रात्र झाली होती आणि बेळगावातील रस्त्यातील विजेचे दिवे झगमग पेटले होते.



चार

मी इंग्रजी दुसरीत गेलो आणि त्याचवर्षी आमचे काका मिलिटरी विभागात रहायला आले. ग्लोब टॉकीजजवळ. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगच्या आवारात दर्ग्यासमोर लांबच लांब आवार. त्या आवारात मिलिटरीतील कर्मचाऱ्यांसाठी रहायला दगडी भिंतीची स्वतंत्र घरे. घराच्या मागील बाजूला भरपूर मोकळे आवार. मिलिटरी अधिकाऱ्यांसाठी तीन चार लांबट बराकी. त्याना काचेच्या खिडक्या, फरशीची जमीन मधोमध रुंद, मोकळा पॅसेज. बराकीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उडचा मारीत, धावत, लंगडत खुशाल जावं. या बराकीत ब्रह्मचारी इंग्रज सेनाधिकारी रहात. काकांच्या घराला लागूनच एक बराक होती. बाहेरून पिवळचा व आतून शुभ्र पांढऱ्या रंगाने तिच्या भिंती रंगवलेल्या होत्या. बराकीच्या पुढचात बाग होती. काकांच्या दारासमोरही हिरव्याचार पिवळी बारीक फळे येणाऱ्या झुडपांचं कुंपण होतं. त्या कुंपणात बाग होती. दारासमोरच उंच वाढलेलं पेरूचं झाड होतं. त्याला पेरू आले की आमची चंगळ होत असे. अनगोळकर सर शिकवायला घरी आले की पेरूच्या झाडाला आपली सायकल टेकून ठेवीत. मग तर पेरूच्या झाडाबरोबरच सायकलचे आकर्षण वाढत

जायचे. शिकवून झालं की आळीपाळीने अनगोळकर सर आम्हाला सायकल चालवायला द्यायचे. बेळगावात त्यावर्षी मला वाटते काँग्रेस भरली होती. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू बेळगावात आले होते. तर मोठी माणसे बोलताना सारखं गंगाधरराव देशपांडे यांचं नाव कानावर यायचं. एका संध्याकाळी अनगोळकर सर आम्हा मुलाना ठळकवाडीला घेऊन गेले. ती संध्याकाळ जशीच्या तशी आजही हुबेहूब आठवते. आम्ही इवलेसे. मी जेमतेम दहा वर्षाचा, अंगात सदरा, चड्डी, डाकं उघडं. बेननस्मिथ हायस्कूल मध्ये आलो आणि डोक्यावरची काळी टोपी गेली. महात्मा गांधींच्या दर्शनाला आम्हाला अनगोळकर सर घेऊन चालले होते. चालता चालता आमचे हात आपल्या हातात घेऊन गांधी व नेहरूंबद्दल ते आम्हाला खूप काही सांगत होते. मिलिटरीचा रस्ता ओलांडून हलके सोडावॉटर फॅक्टरी-कडून आम्ही ठळकवाडीच्या रस्त्याला लागलो तर रस्ता माणसानी फुलून गेला होता. विमान पडलेल्या दिवसाची आठवण झाली. छोटी मोठी माणसं दाटीवाटीनं चालली होती. केव्हातरी गंगाधरराव देशपांडे यांचं घर आलं. रात्रीची वेळ सुरू झाली होती. दिवे पेटले होते. लोकांची गर्दी थबकली होती. आम्ही गर्दीच्या एका टोकाला होतो. पाण्यात बुडून जावं तशी आम्ही पोरं त्या गर्दीत बुडालो होतो, तळावलो होतो. अनगोळकर सर पायाच्या टाचा वर करून समोर काहीतरी पहात होते. इतक्यात हजारो मुखातून 'महात्मा गांधी की जय' असा घोष सुरू झाला. आपल्या दोन्ही हातानी अनगोळकर सरानी आम्हा मुलाना धरून ठेवलं होतं. मग तेच खाली वाकून आम्हाला हळूच म्हणाले, 'आता तुम्हाला गांधीजी दिसतील... मी ऐकेकाला वर उचलतो...तुम्ही सरळ थेट नाकासमोर पहायचं. पंचा घातलेले, आणि अंग उघडं असलेले... हातात काठी... ते गांधीजी, समजलं ?' अनगोळकर सरानी माझ्या दोन्ही बखोडचात हात घालून मला वर उचललं. मी समोर पाहिलं– होय आम्ही चित्रात नेहमी पहात होतो तस्सेच गांधीजी दिसत होते. ते चालत होते. बोलतही होते (की मौन होतं ?) त्यांचा एक हात वर उभारलेला होता. त्यांच्या देहाची हाडे दिसत होती. डोळ्यावर चष्मा होता. शुभ्र खादी कपडचातील व खांदी टोपी घातलेली कितीतरी माणसे त्यांच्या आवतीभोवती होती. 'दिसले का रे ?...' खालून अनगोळ-

कर सर विचारीत होते. ' हो...' मी म्हटलं आणि झपकन सरानी आपले हात खाली आणले. आम्ही परतलो तेव्हा चांगलीच रात्र झाली होती. रस्त्यात तोबा गर्दी होती. मिरवणूक शहापूरकडे जाणाऱ्या रस्त्याकडे लोक बोटे दाखवीत होते. ' नेहरू...पंडीत जवाहरलाल नेहरू...' विजेचा उजेड लख्ख पडला होता. अगदी चित्रात पाहिले होते तसे पंडीत जवाहरलाल नेहरू पांढऱ्या शुभ्र घोडयावर बसून चालले होते. डोक्यावर शुभ्र गांधी टोपी. जवाहरी जाकीट. ऐटदारपणा. ती संध्याकाळ आठवली की अनगोळकर सर आठवतात.



पाच

इंग्रजी पहिलीत असतानाच पहिला बोलका चित्रपट मी पाहिला. पण त्या अगोदर मूक चित्रपटही बेळगावलाच इंग्रजी पहिलीत असताना पाहिला. स्टेशन ग्राउंडवर एक तंबू ठोकण्यात आला होता. गरगरीत वाटोळा व पांढरा शुभ्र. या तंबूच्या बाहेर चारपाच खुर्च्या ठेवून एक बँडपथक बँड वाजवायचं. बँड थांबलं की एक मनुष्य तोंडाला पऱ्याचा लांबट कर्णा लावून ओरडत असे. ' ठकसेन राजपुत्राची गोष्ट ' पहायला लवकर या. सिनेमा सुरु होत आहे. तिकिटाचे दर- पीट आणा. बाक दीड आणा, गॅलरी दोन आणे, खुर्ची तीन आणे. वेळ संध्याकाळची असायची. तंबूबाहेर लोकांची गर्दी जमलेली असायची. दोन खेळ व्हायचे. एके दिवशी आमचे काका आम्हा सर्व मुलाना ' ठकसेन राजपुत्र ' दाखवायला त्या तंबूत घेऊन गेले. बँड पथकाकडे उभा राहूनच विदूषकी टोपी व कपडे घातलेला एकजण लांब हात करून पैसे घ्यायचा व तिकीटे द्यायचा. ती संध्याकाळ मला स्पष्टपणे आठवते. मी त्यापूर्वी कोकणातच मराठी पाचवीत असताना आमच्या घरात कुणीतरी आणलेलं ' ठकसेन राजपुत्राची गोष्ट ' हे पुस्तक वाचलेलं होतं. ते वाचून ठकसेन राजपुत्राच्या चातुर्यानं मी थक्क

झालो होतो. शाळेच्या रिकाम्या मधल्या वेळात मी माझ्या वर्गसोबत्याना ठकसेन राजपुत्राची कथा रंगवून सांगत असे. इंग्रजी पहिलीतच एकदा शिक्षकांनी मुलाना व्यासपीठावर येऊन गोष्टी सांगा म्हटले. मी ठकसेन राजपुत्राची गोष्ट सतत महिनाभर गोष्टीच्या तासाला दंग होऊन सांगत असे. सगळा वर्ग उत्सुकतेने ऐकत असे. तर तंबूत आम्ही शिरलो. सर्कसची लावतात तशी आत लाकडी फळचांची गॅलरी अर्धवर्तुळाकार लावली होती. खाली जमिनीवर लोक बसले होते. पत्र्याच्या खुर्च्या लोकांच्या मागे मांडलेल्या होत्या. स्त्रियासाठी वेगळे दालन होते व त्याला पांढरासफेत पडदा लावलेला होता. म्हणजे पडद्याच्या पलीकडे बायका, अलिकडे पुरुष.

मधोमध सिनेमाचा पांढरा पडदा दोन लोखंडी दांड्यावर उभा होता. छोटासाच. मला वाटतं तो आठ मि. मि. असावा. त्या पडद्याकडे एक कोट टोपी घातलेला व धोतर नेसलेला माणूस हातात कर्णा घेऊन अंगाभोवती वाटोळा गरगर फिरत ठकसेन राजपुत्राची गोष्ट सांगत होता. तो मराठीत बोलायचा. तसाच कानडी व हिंदी उर्दूतही बोलायचा. प्रोजेक्टर कुठंतरी पडद्याआड न दिसणारा असा लावलेला होता. त्यामुळे तंबूत काळोख झाला आणि पडद्यावर तेवढा प्रकाशझोत पडला ते पाहून अंगावर रोमांच उभे राहिले व सगळं अद्‌भुत वाटू लागलं. पडद्यावर हळूहळू काळी पांढरी चित्रं हालू लागली. त्या चित्रपटातील ठकसेनाचं काम मला वाटतं मास्टर विठ्ठल यानी केलं असावं. चित्रपट सुरु झाल्यावर कर्ण्यातून मोठ्याने गोष्टही सांगायला सुरुवात झाली... देखिए... अब ठकसेन राजपुत्र आ रहा है... बघा बघा, ठकसेन राजपुत्र आता पडद्यावर येतो आहे... बेळगावात वर्षानुवर्षे राहूनही मला कधी कानडी भाषा आली नाही याची आता मात्र मनाला खूप खंत वाटते. नाहीतर मी ते कानडी वाक्य नक्कीच इथं लिहिलं असतं. किती वेळ चित्रपट चालला होता ते आता धड आठवत नाही. पण तास दीड तास तरी असावाच. कारण पुस्तकात वाचलेले सगळे प्रसंग पडद्यावर पाहिले होते. आता आठवतं ती एक नदी वाहाते आहे तिच्यातून एका बाजूला कपड्याचे गाठोडं वहात जात आहे. तो जणू ठकसेनच पोहून जात आहे म्हणून सैनिक भरभर पाण्यात उडचा घेत आहेत. तर ठकसेन राजपुत्र खुशाल एका झाडावरून खाली उतरून त्या सैनिकांच्याच एका

घोड्यावर बसून ऐटीत दुसऱ्या वाटेनं घोडदौड करीत आहे. एकेक रीळ संपलं की पडद्यावर पांढरा स्वच्छ प्रकाश पडायचा एरवी तंबूत सगळीकडे पेट्रोलमॅक्सचे दिवे पेटत असायचे काही कंदिलही होते. चित्रपट सुरू झाला की दिवे मंद होऊन मालवायचे. लहान मुलं व मोठी माणसं श्वास रोधून चित्रपट पहायची. डोळे पडद्यावर व कान कर्णाकडे लागलेले असायचे. चित्रपट संपला तेव्हा बाहेर पडताना विलक्षण हुरहूर लागून राहिली होती कारण मी खराखुरा ठकसेन पाहिला होता.

❋

सहा

मी बेळगावात पहिला बोलका चित्रपट पाहिला. तो संध्याकाळ मी कधी विसरणार नाही. मी बेननस्मिथमध्ये इंग्रजी पहिलीत होतो. माझे काका व काकी सुटी घेऊन कोकणात गेले होते. गणेशचतुर्थीचे दिवस होते. बोगारवेसेत एका दगडी दुमजली इमारतीत तळमजल्यावर काकांचे कोकणातील मित्र रहात असत. त्यांच्या घरी काही दिवस आम्हा मुलांची त्यानी राहण्याची सोय केली. नवरा बायको व एक वयात आलेला तरुण मुलगा एवढीच मंडळी घरात होती. हा मुलगा बेननस्मिथ शाळेत खूप वरच्या इयत्तेत शिकत होता. दांडगा, उंच, अंगापिंडाने गच्च भरलेला, गोरटेलासा, देखणा, नाक, डोळे, हनुवटी, ओठ तरतरीत. त्याची सायकल होती. एका हातात पुस्तकं व दुसऱ्या हातात सायकल घेऊन चालतच तो माझ्याबरोबर शाळेत यायचा. डोक्यावरच्या केसाना सुगंधी पोमेड लावून केसाना भांग पाडायचा. अंगात कोट, हाफ खाकी पँट नाहीतर कधी धोतरसुद्धा नेसायचा. प्रथम त्याची भीतीच वाटायची अभ्यासात जेमतेमच होता. पण घरात सुतार-कामाच्या खूप वस्तू आणायचा. काहीना काहीतरी ठोकत, मोडत, जोडत, फोडत बसायचा. एका संध्याकाळी आम्ही घरी आलो. तो म्हणाला, चल, आपण स्टेशनग्राउंडपर्यंत फिरायला जाऊ. मी भीत भीत त्याच्याबरोबर

बाहेर पडलो. रंगूबाई पॅलेसकडून आम्ही सरळ चालत गेलो. आता त्या गल्लीची व स्थळांची नावं चटकन आठवत नाहीत. दोन तीन रस्ते एकत्र येऊन मिळत होते. बरोबर तिथेच एक पत्र्यांनी बांधलेलं सिनेमा थिएटर होतं. मला वाटतं त्याचं नाव ' कृष्ण ' थिएटर होते. आता तिथे रेडिओ थिएटर आहे. तर मी पुष्कळदा भटकत असताना त्या थिएटरवरून गेलो होतो. बाहेर चित्रपटाचे फलक व चित्रे लागलेली असत. ती मी जवळ जाऊन डोळे भरून पहायचा पण थिएटरात एकटचानं जाण्याचं धाडस होत नव्हतं. त्या थिएटरच्या आवारात माझा मित्र मला घेऊन आला. संध्याकाळ झाली होती. रस्त्यावरचे विजेचे दिवे पेटलेले होते. थिएटरच्या फाटकात गरम शेंगा व मक्यांची कणसं लोक विकीत होते खात होते. माझा मित्र मला म्हणाला, तू इथंच आवारात थांब. मी जरा जाऊन येतो. थिएटर लांबट पसरट होते. त्याच्या दारावर द्वाररक्षक उभे होते. कापडी पडदे दारावर सोडलेले होते. पीट, पहिला वर्ग, दुसरा वर्ग अशा अक्षरांच्या रंगीत काचा दारावर झगमगत होत्या.

आत सिनेमा सुरू होऊन बराच वेळ झाला होता. आतून पडद्यावरचा संवाद बाहेर ऐकू येत होता. माझ्या अंगात कोट होता. डोक्यावर टोपी होती. पाय अनवानी होते. मित्राच्या घरी चहा झाला होता पण शेंगा व कणसे खाण्याची हावही तोंडाला सुटली होती. खिशात जेमतेम आणा दोन आणे असतील नसतील. सिनेमा थिएटरात घुसून चित्रपट पाहण्याची अनावार ओढही लागली होती. बेळगावात आल्याला तीनचार महिने झाले होते. पण सिनेमाला सहकुटुंब जाण्याचा काकांचा बेत आजचा उद्यावर, परवावर असा पुढं पुढंच जात होता. मला स्पष्ट आठवतं. कृष्ण थिएटरमध्ये त्या दिवशी ' पतितपावन ' हा हिंदी चित्रपट लागला होता. बाहेर काचपेटीत राम–लक्ष्मण खांद्याला धनुष्यबाण लावून अरण्यातून चालले आहेत; एका चित्रात रामाचा पाय शिळेला लागतो; त्या शिळेतून अहिल्या उभी रहाते राम तिच्या मस्तकावर हात ठेवतो ती गुडघे टेकून नतमस्तक होते; अशी छायाचित्रं लावलेली होती. मी ती समरसून पहात होतो. इतक्यात मागून माझ्या मित्रानं आपला हात माझ्या खांद्यावर ठेवला मला म्हणाला, चल, झटपट आपण सिनेमा पहाणार आहोत. मित्रानं काय किमया केली होती

कुणाला ठाऊक ! शेवटच्या दाराकडील एका द्वाररक्षकानं पडदा हळूच बाजूला सारून आम्हाला थिएटरात सोडलं होतं. लोक चित्रपट पाहण्यात मग्न झाले होते. पत्र्याच्या खुर्च्या रांगेनं मांडलेल्या होत्या. अगदी टोकाच्या दोन खुर्च्यांवर आम्ही दोघे बसलो, सिनेमा पाहू लागलो. पडद्यावरील पौराणिक पात्रं थेट माणसासारखी हुबेहुब बोलत होती. चित्रपट हिंदी भाषेत होता. आश्चर्यच ! थेट अरण्यासारखे अरण्य. राम–लक्ष्मण धनुष्यबाण पाठीला लावून चालले आहेत. बरोबर कुणी ऋषीमुनी आहेत. जटाधारी, दाढ्या वाढलेल्या, अरण्यातील ती पायवाट आहे. संगीताचे सूर पडद्यावरून आसमंतात घुमताहेत. सर्वत्र शिलाखंड विखुरले आहेत. एका शिळेवर रामाचा पाय पडतो आणि चमत्कार होतो. शिळेतून अहिल्या अवतीर्ण होते. बाहेर छायाचित्रात पाहिलेला प्रसंग जशाचा तसा साकार होत होता. मी दंग झालो होतो आणि मित्रानं माझा हात ओढला म्हणाला, ऊठ निघ लवकर आम्ही तसेच बाहेर पडलो. मित्र पुढे, मी मागे. ❋

सात

संपूर्ण बोलका चित्रपट प्रथम बेळगावला पाहिला. तो म्हणजे 'सिंहगड' तो एकदाच नव्हे तर दोनदा पाहिला. एकदा सर्व मुलाना आम्हाला तो काकानी दाखविला. इंग्रजी पहिलीत असताना. आता 'रिझ' टॉकीज आहे त्या जवळपास किंवा तिथेच मला आठवते ते पत्र्याचे चित्रपटगृह होते तिथे 'सिंहगड' लागला होता. तो चित्रपट सुरु व्हायच्या अगोदर एक अनुबोधपट (आता समजतंय) दाखवला जात असे. मराठी कवी त्या बोधपटात आपापली कविता गाऊन दाखवायचे. त्यावेळी कवींची नावं नीट धारणेत रुतली नव्हती. पण कवी यशवंत, कवी गिरीश व प्रल्हाद केशव अत्रे ही नावं लक्षात राहिली होती. कवी कविता गात आणि त्या कवितेतील प्रसंग नाटचमय असा पडद्यावर साकार होत असे. अजून त्या कवितांच्या (काही) पहिल्या ओळी आठवतात. कवीची (गिरीश की मायदेव ?) कविता म्हटली जात होती.

फसल्ये ग बाई । सुख कपाळी माझ्या नाही
जन्मापासूनी अशी ही वटवट । सखे साजणी सारखी ही कटकट

ओळी कानावर येतानाच पडद्यावर त्या बाईचं कपाळी सुख नसलेलं चित्र डोळ्यासमोर येत असे तर आचार्य अत्रे आपली कविता गात होते.

परीटा येशील कधी परतून ?
काल दिलेल्या कपडचामधले
दोनचार हरवून
कोट रेशमी लग्नामधला
मानेवर उसवून

खरोखरच पडद्यावर एक परीट यायचा. त्यांच्या हातात इस्त्री केलेल्या कपडचांचा ढीग असायचा. लग्नातला मानेवर फाटलेला कोट प्रत्यक्ष दिसायचा आणखी कोणत्या कविता आठवत नाहीत.

मग चित्रपट सुरु व्हायचा. केशवराव धायबर, बाबुराव पेंढारकर, लीला, मास्तर विनायक ही नावं चांगलीच पाठ झाली होती. दररोज रस्त्यात जाहिरात वाटणारे भेटायचे. चित्रपटाच्या जाहिराती जमवून ठेवण्याचा नादच लागला होता. 'सिंहगड' चित्रपट सुरु झाला. प्रथमच पडद्यावर उदयभानूचा प्रवेश... आपला घोडा धावताना मागील दोन पायावर उभा करून व घोडचाचा लगाम दोन्ही हातानी खेचून उदयभानू मराठीत बोलायचा 'कोण ती सती जात आहे तिकडं ?...' मग एक स्त्री सती जात असल्याचे दृश्य उदयभानूचा त्या लोकांवर आपल्या मोगल सैनिकासह हल्ला. काही लोक घायाळ, काही पळून गेलेले. सती जाणारी स्त्री एकटीच असहाय्य उठलेली. जवळच रसरसून पेटलेली चिता नंतर उदयभानूकडून बळजबरीनं झालेले अपहरण. मेण्यातून वगैरे. पत्र्याच्या खुर्च्यावर बसून अनिमिष नेत्रानी तो चित्रपट वडील मंडळीबरोबर रोमांचित होऊन पाहिला.

सुप्रभाती सूर्य रिघे तिमिरपटल छेदाया

ही एका गाण्याची ओळ आजही आठवतं तर चांगलंच मनात भरून राहिलं ते गाणं होतं शेलारमामाचं.

चल ऊठ गडचा । चल वीर गडचा घेऊनी भाला ढाल गडचा
शूर शिपाई शिवाजीचा तू । मर्द मराठा मावळचा। चल ऊठ गडचा...

पहिला बोलका चित्रपट बेळगावातच मला तुकडचानं पहावा लागला

होता. शिवाय त्यातील पात्रं हिंदी भाषेत बोलत होती. प्रथमच संपूर्ण मराठी भाषेत बोलणारी पात्रे 'सिंहगड' पाहताना माझ्या दिपून गेलेल्या डोळ्यांसमोर मूर्तीमंत सजीवतेनं वावरत होती. तत्पूर्वीच मी हरीभाऊ आपटे यांची 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरी कोकणातच वाचली होती. संपूर्ण 'सिंहगड' चित्रपट दीर्घकाळ मी तो पाठ म्हणून दाखवीत असे



आठ

पहिला इंग्रजी बोलपट ही प्रथम बेळगांवाच पाहिला. तो इंग्रजी दुसरीत असताना. त्याच वेळी कँटोनमध्ये 'ग्लोब' चित्रपटगृहात लागला त्याचे नावही मी अजून विसरलेलो नाही. 'प्रिन्स ऑफ स्पेन' मग इंग्रजी मथळ्याखाली त्याचा मराठी अनुवाद असायचा. 'स्पेन देशाचा राजपुत्र' स्टेशन ग्राऊंडवर जाताना 'ग्लोब' टॉकीजची लांबट इमारत डोळ्यांना भूल पाडायची. टॉकीजच्या आवारात कोपऱ्यात कँटोनमेंटच्या बाजूनं एक झाड होते. त्या झाडाखाली ग्लोब टॉकीजची दुचाकी जाहीरात गाडी उभी असायची. तिचे दोन्ही बाजूंचे पांढरे फलक वर टोकाला निमूळते जोडलेले असायचे त्या फलकावर एका बाजूला इंग्रजीत निळचा शाईनं जाडजूड अक्षरे लिहिलेली असायची. दुसऱ्या बाजूनं मराठी अक्षरात त्या इंग्रजी जाहिरातीचं भाषांतर असायचं. ते दोन्ही फलक थांबून थांबून वाचताना खूप मजा वाटायची. कुणीतरी वर्गात सांगितलं की 'ग्लोब' मधला पहिलाच इंग्रजी चित्रपट सुरू झाला की पहिले तीन दिवस लोकाना फुकट दाखवणार आहेत. दुसऱ्या दिवशी मी गुपचूप चित्रपट सुरू व्हायच्या वेळेला संध्याकाळी फेरी मारली. कुठचे काय नि कसले काय ? मला गेटमधूनच एका राखणदारानं बाहेर पाठवून दिलं. दम भरला. खूप मोठे कुतूहल त्या चित्रपटांबद्दल मनात उसळत व घुसळत होते. म्हणून ग्लोब टॉकीजच्या आजूबाजूला भटकलो. तर रस्त्यावर पडलेल्या त्या चित्रपटाच्या जाहिराती गोळा केल्या. जाहिरातीच्या एका बाजूला इंग्रजीत मजकूर होता. दुसऱ्या बाजूला मराठीत. त्यात त्या चित्रपटाची अर्धवट गोष्ट लिहिलेली होती,

पण मग शेवट गुलदस्तात ठेवून लिहिलं होतं, 'पुढील गोष्ट ग्लोबच्या रुपेरी पडद्यावर पहा.' खूप चांगल्या चांगल्या मोटारी थिएटरकडे येत होत्या. त्या मोटारीतून सुंदर सुंदर माणसं बाहेर पडत होती. त्यांच्यासाठी 'ग्लोब'चं फाटक उघडलं जात होतं. लष्करातील इंग्रज साहेब व साहेबिणी उंची रात्र पोषाखात मोटारगाडयातून किंवा चालत येत होत्या. सायकलवरूनही खूप लोक येत होते. मनात धाकधूक होत होती. त्यांच्यासाठी फाटकाचं दार उघडलं जात होतं. ती मंडळी आत गेली की मिटलं जात होतं.

शेवटी फुकटातला चित्रपट फुकटातही न पाहता मी निराश व खिन्न होऊन घरात गेलो. 'ग्लोब' थिएटरच्या भितीवर चित्रपटाची पोस्टर्स लावलेली होती. तो स्पेनचा राजपुत्र मग एक स्त्री होती. ती बहुधा राजकन्या असावी. घराकडे येईपर्यंत व रात्री झोपल्यावरही मनाच्या पडद्यावर 'स्पेनचा राजपुत्र' साकार होत होता. माझ्या वर्गात एक बोरकर आडनावाचा विद्यार्थी होता. तो माझा दोस्त बनला. एके दिवशी 'ग्लोब'ला 'टारझन' सिनेमा लागला. 'टारझन' चित्रपट पाहिलेले वर्गातील काही विद्यार्थी रंगवून त्या चित्रपटाची गोष्ट सांगायचे. 'ग्लोब'च्या भितीवर मोठं पोस्टर लागलेलं. टारझन उंच झाडावर चढलाय आणि एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर झेपावतोय. उघडेबंब अंग पिळदार अंगयष्टी देखणा गोडुस चेहरा. एक गोरीला माकड ही त्याच्याबरोबर फांदीवर झेपावतोय. खूपखोल खाली दऱ्या खोरी– वाघ, सिंह, हत्ती. 'टारझन' चित्रपट पहायचाच असं बोरकरचं व माझं ठरलं. पण पैसे कुठं होते? काकांकडे एक शब्द टाकला तर ते अंगावरच ओरडले... इंग्रजीचित्रपटात तुला काय कळणार? पहिल्यांदा इंग्रजी शिक... आणि इतक्या लहान वयात इंग्रजी चित्रपट पाहू नकोस... ते चावट असतात... विचार करकरू नही मला 'चावट' या शब्दाचा अर्थ कळेना. माझे एक आजोबा कोकणात होते. ते तलाठी होते खूप चांगले माझ्यावर प्रेम करणारे पांढरा रूमाल डोक्याला बांधायचे. डोळ्यावर चष्मा, तरतरीत बोलणं. वळणदार मोडी लिपीत भरभर कागदावर लिहायचे, पुस्तकं वाचायचे आणि माझ्याकडून वाचून घ्यायचे. मी पत्र लिहिलं– मला पैसे पाठवा मनात भीती वाटत

होती ते रागावतील म्हणून पण एके दिवशी वेननस्मिथ हायस्कूलच्या दुसरीच्या वर्गातच पोस्टमन येऊन दारात उभा राहिला. मी शाळेच्या पत्त्यावरच पैसे मागविले होते. मनिऑर्डर तीन रुपयांची. माझ्या नावाची. तीन खणखणीत चांदीचे रुपये पोस्टमनने माझ्या हातात ठेवले. वर्ग चालू होता. शिक्षकानी सही वगैरे केली, सगळा वर्ग तटस्थ होऊन माझ्याकडे पहात होता. रविवारी तीन वाजताचा 'टारझन 'चा खेळ मी व बोरकर अगदी पुढे बाकावर बसून पाहिला. ते घनदाट अरण्य, नद्या, पर्वत-झाडे क्रूर जनावरे माकडे, अजगर, बापरे ! एकच वाक्य त्या चित्रपटातील लक्षात राहिलं. टारझनची प्रेयसी एका मोठ्या झाडावर बसून त्याला शिकविते... I love you दोन रुपये मी अमृतांजनाच्या डबीत ठेवले. घरी येऊन ती डबी चोरून घराच्या एका दगडी भिंतीला पडलेल्या बिळात मी ठेवली तर भसकन ती बिळातून खूप खोल खाली गेली अजूनही मला वाटते ती तिथं असेल.



नऊ

आठ साडेआठ वर्षानंतर परवा बेळगावला जाण्याचा योग आला. कृष्णा मेणसे यांच्या 'गोठलेली धरती... पेटलेली मने' या प्रवाससुंदर पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्तानं. मला मोठ्या सन्मानपूर्वक बेळगावच्या 'सार्वजनिक वाचनालया 'चं निमंत्रण आलं भेटीचं. मी पुलकित झालो. शाळेत असताना आणि नंतर महाविद्यालयात गेल्यावर बेळगावात याच वाचनालयात बसून मी वाचन केलं होतं. वर्तमानपत्रं, मासिकं, साप्ताहिकं... वाचनालयाच्या कार्यकर्त्या मंडळीनी एका छानदार बैठकीत माझा हृद्य असा आदरसत्कार केला. भावनेनं ओथंबून भरलेले माझे चार शब्द त्यानी ऐकून घेतले. नंतर अध्यक्ष संतराम पाटील यानी माझ्या हातात पुष्पगुच्छ दिला. आपल्या प्रेमाचं प्रतीक म्हणून सोनचाफ्याच्या फुलांचा तो धुंद करणारा

सुवर्णरंगी व सुगंधी पुष्पगुच्छ माझ्या हातात घेताना मी लहान लहान होत गेलो. शाळेत असतानाच बेळगाव पुनः माझ्या डोळ्यासमोर उभं राहिलं. ग्लोब टॉकीजजवळच्या मिलिटरी आवारातील नव्या घरात आम्ही रहायला गेलो होतो ते घर मला आठवलं. त्या घराजवळची बरॅक आठवली. त्या बराकीजवळची फाटकातून आत शिरताच डाव्या हाताला उभी असलेली माझ्या काकांच्या कचेरीची छोटीशी पण टुमदार इमारत आठवली.ती इमारत म्हणजे भिती सोडून दिल्या तर सगळ्या काचा, काचा आणि काचाच होत्या. अव्वल साहेबी पोषाख करून आमचे काका आत आपल्या टेबलावर फाईलींचा ढीग ठेवून एका जाडजूड लांबट वहीत लिहीत बसले की काचातून त्यांच्याकडे पहाताना आपण कोणत्यातरी पारदर्शी अद्‌भूत अशा तरल व स्वप्नसृष्टीतल्या वातावरणात वावरत आहो तसा भास व्हायचा. इंग्रजसाहेबही असायचा.

बरोबर थेट त्या कचेरीच्या दारात ते सोनचाफ्याचं उंच, भरदार व मदा टवटवीत झाड उभं होतं. संतराम पाटील माझ्या हातात सोनचाफ्यांनी ओतप्रोत भरून गेलेला पुष्पगुच्छ देत होते आणि माझ्या डोळ्यासमोर मात्र त्याच क्षणाला ते माझं बालपणीचं सोनचाफ्याचं झाड साकार होत जात होतं. सोनचाफ्याच्या फुलांचा मोसम सुरू झाला की हे झाड सोनचाफ्याच्या फुलांनी भरभरून आणि तरारून सभोवतालचा सगळा परिसर सुगंधमय करून सोडीत असे. या झाडाच्या प्रत्येक हिरव्या पानाआड एकएक तरी सोन्याच्या रसात विरघळत जाणारं सोनचाफ्याचं सुबक, छोटं, टपोरं, स्पर्शहळुवार, मऊमऊ, फूल दडलेलं असायचं. त्या झाडाचा बुंधा सरळसोट नीट उभा होता आणि फार रुंदही नव्हता. आम्हा मुलांच्या दोन हातांची मिठी तो बुंधा सहज पेलू शकत होता. आम्ही भरभर भरभर त्या झाडांवर चढत असू माकडासारखे. बेळगावात हिंडताना त्यावेळी कुठंतरी हॉटेलात किंवा घरीदारी ग्रामोफोनच्या तबकडीवर लागलेलं ग ण कानावर येई...

ठेवीले पाहून दारी
मंजुळे गे सोनचाफ्या...

ते गाणं म्हणजे एक हळुवार गोड प्रेमगीत होतं हे खूप उशीरा लक्षात आलं. पण बालजीवनात 'मंजुळा' आणि 'सोनचाफा' हे शब्द मात्र

अंत:करणात कुठंतरी खूप सुगंधी व सागरसंगीत थैमान घालायचे. एकदा का आम्ही भावंडं किंवा मिलिटरी आवारातील मिलिटरी व सरकारी माणसांचीच मुलं सोनचाफ्याच्या झाडावर चढलो की फांद्याफांद्यात शिरून जास्तीत जास्त सोनचाफी तोडून खाली टाकण्याची आमच्यात चढाओढ सुरू होत असे. झाडावर चढत असतानाच झाडाखाली प्रत्येकाचा भूप्रदेश आम्ही ठरवून घेत असू. त्या भूप्रदेशात पडतील ती ज्याची त्याची फुलं झाडावरून खाली उतरल्यावर ज्याने त्याने गोळा करून घरी न्यायची असा आमचा पूर्ण लोकशाहीवादी दंडक होता हे आता मला कळून येतेय. एकेकाचा केवढातरी मोठा सोनचाफ्याच्या फुलांचा ढीग जमायचा. जणू पिवळ्या जर्द सोन्याचे दागदागिनेच आम्ही सोन्याच्या लंकेवर स्वारी करून लुटून आणलेले होते. ते सरकारी झाड असल्यामुळे आवाराबाहेरची कुणीच बिनसरकारी मंडळी त्या झाडापर्यंत येऊ शकत नव्हती. कधी कधी मात्र त्या झाडाकडे आम्ही फिरकतसुद्धा नसू. झाड सोनचाफ्यांनी बहरलेलं असायचं. फुलं पानांआडून डोकी बाहेर काढून जणू केविलवाणेपणानं आमच्याकडे पहायची तो फूल फूल फुलायची. मग त्यांच्या पाकळ्या अवजड व अवतीर्ण होऊन हळूहळू जमिनीवर गळायच्या. गंधमंद होत.

❋

दहा

मी बेननस्मिथ हायस्कूलमध्ये इंग्रजी पहिलीत शिकत होतो. १९३२ साल आणि त्याचवेळी मला वाटतं, मराठी भावगीत गायनाचा जमाना सुरु झाला होता. माझे काका घरात एकदोन गाणी मूडमध्ये असले की हळूहळू गुणगुणायचे. आमच्या घरमालकांच्या घरात ग्रामोफोन होता. त्या ग्रामोफोनवरही गाणी म्हटली जात होती. घराच्या आवारात, रस्त्यात, गल्ली बोळातून फिरताना, चित्रपटगृहात, अनपेक्षितपणे कुठूतरी वातावरणात तरंगत येणारे गाण्याचे सूर, कुणी रस्त्यातून गात जाणारी माणसंसुद्धा...

त्यावेळच्या लोकप्रिय कदाचित पहिल्या वहिल्या भावगीतांचे सूर, शब्द व लय कानात शिरत होती व मनात रेंगाळत होती. मला माझ्या पाठ्य-पुस्तकातील कविता त्या त्या वृत्तात आळवून जुळवून मोठ्याने म्हणायला फार आवडत असे. तशीच ही भावगीतं आता कानावर येत होती. खूप लहानपणीच अंथरुणातून पहाटेला उठण्याची सवय मला लागली होती. दिवाळीचे दिवस होते तेव्हा तर सगळीकडेच बेळगाव शहरात भावगीतांच्या सुरांना नुसता ऊत आला होता. कळत नकळत एक भावगीत माझ्या आपो-आप तोंडपाठ होत गेलं होतं. त्या दिवशी खूप सकाळीच मी उठलो होतो. घराबाहेर येऊन दारासमोरच्या छोट्याशा बागेत डोळे चोळीत व तोंडात चूळ भरीत उभा राहिलो होतो. गवळी आपली म्हैस घेऊन दारात दूध काढायला येणार होता. हवेत नाजूक उत्तेजक गोड गारवा होता. बागेत एक वाढलेलं डाळिंबाचं झाड होतं त्याच्या जमिनीकडे झुकलेल्या फांद्यावर वाटोळी लांबट, हिरव्या जाडसर सालीची दोन तीन फळं लोंबत होती. फाद्यांफाद्यांवर लालसर पिवळी इवलीशी डाळिंबाची फुलंपण झुबक्या झुबक्यानं फुलली होती. बुलबुल पक्षी डाळिंबाच्या एका उंच ताठर फांदीवर बसून शीळ घालीत होता. शाळेच्या बागेत हिंडत असतानाच बुलबुल-पक्षी ओळखायला मी शिकलो होतो. पोरगासा मी. माझ्या अंगात एक खाकी चड्डी व अंगात आखूड हाताचा सदरा होता. मी पुनः घरात गेलो. मोरीत जाऊन तोंड धुतलं, दात घासले, हातपाय स्वच्छ केले. पुन्हा मी घराबाहेर येऊन बागेत डाळिंबाच्या झाडाला टेकून उभा राहिलो. आकाश कसं स्वच्छ निरभ्र व सुगंधमय वाटत होतं. आपोआपच माझ्या मनात चित्तवृत्ती फुलत होत्या. खूप उल्हास व उत्साह वाटत होता. उत्स्फूर्तपणे माझ्या ओठातून व गळ्यातून एक भावगीत बाहेर पडत होते. हळूहळू मी गाण्याच्या धुंदीत आलो होतो आणि माझे गाण्याचे सूर चढत वाढत आसमंतात पसरत जात होते.

डोळे हे जुल्मी गडे
रोखुनी मज पाहू नका
काशिदा मी काढू कशी,
त्यात होती फार चुका...

सगळंच भावगीत मी म्हणत नव्हतो. सगळं मला पाठही येत नसावं. पण या चार ओळीवर मी पुनः पुनः येऊन ठेपत होतो. माझी घराकडे पाठ होती. आसपास माणसाची जाग नव्हती. डाळिंबाच्या झाडाला टेकून मी उभा धुंद होतो. पटकन कुणीतरी माझा कान पिरगळल्याचा भास मला झाला. कचकन् माझा कान खूप दुखावला होता. माझे ओठ झपकन मिटले होते. गळा सुकला होता. मी वळून मागे पाहिलं. माझे काका हातात एक लांब वेताची छडी घेऊन बागेत आले होते. डाव्या हातानं त्यानी माझा कान पिरगाळला होता व उजव्या हातानं सपकन् माझ्या दोन्ही उघड्या पायावर छडीचे चमचमीत कातडीला झोंबविणारे प्रहार केले होते. त्यांचा मिलिटरी खाक्या मला ठाऊक होता. ते तोंडानं एकसारखं ओरडून म्हणत होते, '...मूर्खा... चावट गाणी म्हणायला शिकलास... घाणेरडी गाणी म्हणतोस... याचसाठी का मी तुला कोकणातून शिकायला इकडे आणला? एवढा तू बिघडशील असं मला वाटलं नव्हतं... समोर बंगल्याच्या दारात कोण उभी आहे पाहिलंस का...' मी डोळे सताड उघडीत व थरथरत समोर पाहिलं. बंगल्याच्या मालकांच्या कुटुंबातील कुणीतरी खानदान तरणी मुलगी बंगल्याच्या दारात उभी होती. माझ्याकडे पहात. बेळगावातील ती सुंदर भावतरल व रंगगंधधुंद सकाळ मला वाळवंटातील दुपार वाटू लागली होती. माझ्या ध्यानीमनीही जे नव्हते ते माझ्या बोकांडी माझे प्रेमळ काका मोठमोठ्याने ओरडून पुनः पुनः मारीत होते. मी काय चावटपणा केला होता? मी म्हणत होतो ते गाणं घाणेरडं होतं म्हणजे काय होतं? मी कसा काय एकाएकी बिघडून गेलो होतो? सपासप माझ्या पायावर छडी बसत होती. माझ्या डोळ्यात अश्रू गोळा झाले होते. माझा गळा भावनावेगानं दाटून आला होता. माझं ओठ थरथरत होतं आणि देह सगळा थरथर कापत होता... 'पुनः तू हे गाणं म्हण... म्हणजे बघतो तुझं... तुझी रवानगी पुनः कोकणातच करून टाकतो...' काका मला दम भरीत होते. इतक्यात ती समोर उभी असलेली तरुणी लगबगीने पुढे आली होती. छडीचा वर उगारलेला काकांचा हात तिनं अलगद वरच्यावर पकडला होता. ती प्रेमळ हळुवार शब्दात काकाना म्हणाली... 'किती सुंदर गळा आहे त्याचा. किती छान गातोय तो... त्याला कशाला मारता? काय केलंय त्यानं मारण्यासारखं?' काका गप्प झाले होते. जशीच्या तशी आजही मला ती मुलगी– ती सकाळ आठवतेय. ❋

अकरा

मृत्यू मी लहानपणी पाहिला होता. अगदी मराठी दुसरी की तिसरीत असताना. माझ्या जन्मगावी. नेरूरला आमच्या अवाठात. नेरुरला आमची दोन घरे. एक देऊळअवाठात दुसरे चव्हाट्यावर. लहानपण आमचं देऊळ-अवाठातच गेलं. आमच्या घराला लागूनच भीमा मावशीचं घर होतं. तिची आई खूप म्हातारी. एकटीच अंगणात तुळशीवृंदावनाकडे वाती वळीत बसलेली लहानपणी मी पुष्कळदा पहात असे. आमच्या आजीशी गोष्टी करायलाही ती आमच्या अंगणात येत असे. देहानं खूप जीर्ण झालेली. अंगावर कातडीला चऱ्या, चुऱ्या आणि घडचा पडलेल्या. लाल रंगाचं अंग-वस्त्र ती नेसायची. केस पिकून कापूस झालेला. छान हळूवार मऊ प्रेमळ बोलायची. कधी आम्हा मुलांवर खसकन रागवायचीसुद्धा. मला आठवतं. तिला लाडूआत्या किंवा लाडूबाई म्हणायचे. तर मराठी दुसरी तिसरीतला तो मी केवढासा होतो. आमच्या घराला लागूनच हाकेच्या अंतरावर आमची मराठी शाळा होती. आजही ती तिथं तशीच आहे. त्यावेळच्या माझ्या वयाची मुलं आजही त्या शाळेत शिकताहेत. संध्याकाळी तशीच शाळेच्या मागच्या पटांगणावर (पटांगण कसलं ! शेतजमिनीचा एक लांबरुंद तुकडा) मुलांचा सामुदायिक परवचा चालतो. बाई त्याना 'बे एक बे... बे दुणे चार' मोठ्याने सांगतात (आमच्या वेळी बाई नव्हत्या.) मग शेकडो मुलं मुली मोठा गळा काढून एकसूरात परवचा दणाणून म्हणायला लागतात. शाळा आणि घर यांच्यामध्ये आमच्या घराच्या भितीलगत उगवलेले व प्रचंड वाढलेले व विस्तारलेले मांदकूर आंब्याचे झाड होते. आजही ते तसेच उभे आहे. फक्त मध्यंतरी आलेल्या (गेल्या पंधरा वीस वर्षात) चक्री-वादळाच्या तडाख्यानं त्याच्या काही फांद्या पिळवटून मोडून पडल्या आहेत.

त्याच्या अवाठातील तेवढाच एका अंगाचा भाग ओकाविका दिसतो. एरवी आपल्या हिरव्यागार दाट पानांची सावली त्याच्या खालून पायवाटेने जाणाऱ्या मुलामाणसा गुराना देत ते स्थिरावलेलं आहे. शाळा दिवसातून दोनदा भरायची. सकाळी, दुपारी दहा वाजता सकाळी शाळा सुटायची दुपारी दोन वाजता पुनः सुरू व्हायची. दहा वाजता असाच इतर मुलांबरोबर घराकडे आलो. दसऱ्या दिवाळीकडचे दिवस असावेत. दारातील अंगण केलेलं होतं अंगणातून समोरचं भीमा मावशीच्या घराचं अंगण चटकन् डोळ्यात भरायचं. मी थबकलो. माझी इवलीशी पावलं शेणानं सारवलेल्या जमिनीला चिकटून बसली. मी पहातच राहिलो लाडूबाई बोलत नव्हती, हालत नव्हती, चालत नव्हती, पहात नव्हती. तिचे डोळे गच्च मिटलेले होते. तिच्या अंगावर शुभ्र धोतरासारखं वस्त्र होतं. आणि एका पाटावर ती बसली होती. तीन चार मोठ्या माणसानी तिला चारी बाजूनी धरलं होतं. तिच्या पुढ्यात पितळेचं घंगाळ होतं. ते घंगाळ पाण्याने भरलेलं होतं. घंगाळात तांब्या बुडवून कुणाचा तरी हात लाडूबाईच्या अंगावर घळघळ पाणी ओतीत होता. घंगाळ्याच्या कडयांचा आवाज हवेत उमटत होता. त्या तीन चार पाच माणसातून माझ्या वडिलाना मी ओळखलं. मी पहातच राहिलो. मावशीच्या घरातून मोठ्यानं रडलेलं बाहेर ऐकू येत होतं.

'अरे पहात काय राहिलास ?... घरात पळ... लहान मुलानी असलं काही पाहू नये...' माझी आई माझ्या बचकुटीला धरून मला घरात नेत होती. माझे पाय चालता चालत नव्हते जमिनीवर सरपटत होते. मग घरात नेऊन आईनं मला अगदी जवळ घेतलं आणि लाडूआजी देवाघरी गेल्याचं डोळ्यात पाणी आणून म्हटलं.

ही त्या दिवशी कदाचित मला झालेली माझ्या जीवनातील पहिली मृत्यूची जाणीव असावी. इथून बेळगावला इंग्रजी पहिलीत असताना असाच संध्याकाळचा काकांच्या घरात एकटाच मी घराबाहेरच्या बाकडयावर आकाशाकडे पहात बसलो होतो. दिवाळीचे दिवस होते, आकाशातून एक पिवळा धमक आकाशदिवा उडत चालला होता आकाशात आकाशदिवा कसा उडवतात हे काकांच्या घराच्या दारातच दोनचार दिवस अगोदर मी

पाहिलं होतं रात्री लोक जमले होते. त्यांनी रंगीत कागदाची एक मोठी अगडबंब पिशवी तयार केली होती. त्या पिशवीच्या तोंडाला बांबूच्या पातळ पट्ट्यांचं एक वाटोळं वेटांळ चिकटविलेलं होतं. त्या वेटोळ्याच्या मधोमध एक काठी घट्ट बांधलेली होती. त्या काठीच्या मधोमध कापडी चिंध्यांचा एक काकडा बांधलेला होता. रॉकेल तेलाच्या बाटल्या त्याच्यावर ओतून तो ओलाचिंब झाला होता. मग सभोवार कागदी पिशवी हातानी वर उंच धरून तो तेलाचा काकडा पेटविण्यात आला. काकड्यातून हळूहळू धूर पिशवीत भरू लागला. पिशवी ताठर होत हळूहळू तट्ट फुगली. मग अगदी सरळ ताठ झाली. वर हेलकावे खाऊ लागली. कुणीतरी तितक्यात ओरडलं 'सोडा...' आणि सटकन् सर्वांचे हात निसटले. कागदी पिशवी आपल्या जाळासह वरवर आकाशात जाऊ लागली. प्रथम सरळ रेषेत नंतर झपकन् इकडे तिकडे सरकत हा हा म्हणता आकाशात खूप उंच गेली. इवली इवली दिसू लागली. आकाशातल्या चांदण्यामध्ये आणखी एका चांदणीची भर पडली. लोकानी टाळ्या वाजवल्या. मीही टाळ्या वाजवल्या आनंदाने नाचलो, हसलो, तर असाच तो आकाशदिवा त्या दिवशी आकाशातून चालला होता. मी एकाग्र होऊन तो पाहात होतो. उगीचच तो पहाताना मनाला कसलीतरी हुरहुर वाटत होती हृदय भरून येतं. घरची व आजोळची माणसे आठवत होती.

'**अरे**, एकटाच काय बसलायस'... माझी काकी माझ्याजवळ येऊन मला म्हणत होती... 'चल घरात चल...' तोपर्यंत आकाशदिवा आकाशात अदृश्य झाला होता. मी जड पावलानी घरात गेलो. बघतो तर काकाही टेबलाकडे टेबलदिवा बारीक करून गंभीरपणे बसले होते. मी जाऊन खोलीत उभा राहिलो तर ते म्हणाले, 'बस रे. उभा का?... तुला वाईट वाटणारच. पण मला सांगितलंच पाहिजे. तुझा मामा मुंबईत मरण पावला. बाबुलनाथ. तुझ्या बापाचं मुंबईहून पत्र आलं आहे. बस. रडू नकोस.' कधी नव्हे तो काकानी माझ्या पाठीवरून हात फिरवला. मी काकांचे ते शब्द ऐकले आणि मला काही सुचेना. म्हणजे आमचा

बाबुलनाथमामा– आम्ही त्याला 'बाबेमामा' म्हणत असू– देवाघरी गेला की काय ?... मग मघाशी आकाशदिवा चालला होता त्या आकाश-दिव्यात तर तो बसलेला नसेल ना ? मला तो आकाशातून हाका तर मारीत नव्हता ? 'अरे, प्रभाकर... अरे, प्रभाकर...' माझ्या कानावर कशी नाही त्याची हाक येऊन आदळली ? मग मीही त्याला 'ओ' दिली असती. मग मला संध्याकाळपासून सारखी हुरहुर का लागून राहिली होती? म्हणजे बाबेमामा अदृश्यरूपानं माझ्या जवळपास कुठं वावरत होता की काय ? आता रात्री झोपताना दिवे मालवतील. काळोख होईल. मी एकटाच बिछान्यात तळमळत राहीन... माझा बाबेमामा...! आमचा लाडका बाबेमामा...! माझं मन आक्रंदन करू लागलं होतं पण डोळ्यातून टिपूसही बाहेर येत नव्हतं. मी अगदी चिडीचिप्प गप्पगार काकाकाकीच्या पुढचात उभा होतो. सगळ्या खूप लहानपणापासूनच्या बाबेमामाच्या आठवणी मनात घोंगावत होत्या. मधाच्या पोळ्याभोवती मधमाशा घोंघावतात तशा. आजोळहून दोन डोंगर चढत व दोन डोंगर उतरत बाबेमामा आमच्या घरी आम्हा भावंडाना आजोळला न्यायला यायचा. हसतमुख, देखणा, वाटोळा लांबट चेहरा. डोक्यावर कुरळे काळेभोर केस. अंगात कोट, धोतर, हातात डॉक्टरची बॅग, आजोळला तो डॉक्टरी करायचा. पोटभर आणि तोंडभर खळखळून हसायचा, मुंबईला फेरी मारून यायचा. तिथं गंधर्व वगैरेंची नाटकं पाहून यायचा. संध्याकाळी आजोळला असलो की तो अंगणात बसून नाटकातील गाणी स्वतः मोठ्यानं गायचा लोकाना हवाहवासा वाटायचा आणि त्यालाही गावातले लोक हवेहवेसे वाटायचे. आजोळची वाट त्याच्या बरोबर चालताना तो वाटेत गोष्ट पण सांगायचा. गायचा आजही त्याच्या आवाजातील ती गंधर्व व दीनानाथी गाणी टेप केल्याप्रमाणे माझ्या कानामनात आपली गुणगुण तालासुरावर उमटवीत असतात... 'नाथ हा माझा मोही खला... शिशुपाला भारी झाला...' हे त्यातील त्याचं आवडतं गाणं असावं. तो ते सारखं म्हणायचा. दुसरं मला आठवतंय... 'परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागली...' हे गाणं तो दवाखान्यात रोग्यांची तपासणी करतानासुद्धा म्हणायचा. त्या गाण्याची गंमतच झाली होती. घरातच कुणी तरी त्या गाण्याचं विडबंन गीत रचलं होतं. (हे आता कळतं)... कुणीतरी

गावातील बाप्ये किंवा तरणे ताठे लोक आमच्या आजोळच्या दारातून (दारातच रहदारीचा रस्ता होता) गात जायचे मोठमोठ्याने... 'असूनी खास डॉक्टर घरचा। म्हणतो चोर त्याला... परवशता पाश दैवे...' वगैरे. बाबेमामा खळखळून मोठ्यांदा हसायचा. कसा गेला होता तो अकस्मात देवाघरी ! त्याला मरण आलं होतं. म्हणजे काय झालं होतं ? आता तो आपल्याला आयुष्यात कधीच भेटणार नाही का ? बोलणार नाही ? हसणार नाही ? गाणार नाही ?... दिवे मालवले गेले. झोपण्याच्या खोलीतील माझ्या डोक्याकडची खिडकी उघडी होती. मी बिछान्यात तळमळत तडफडत होतो. आत आत मी खोल खोल बुडत चाललो होतो. बाबेमामा ! डोळे उघडे होते. येईल का हळूच खिडकीतून बाबेमामा माझ्याजवळ ? बिछान्यात ? थोपटील का मला ? गोष्ट सांगेल का ? मी कुशीवर परतलो आणि खिडकीतून बाहेर पाहिलं. खिडकीतून फक्त आकाश दिसत होतं. त्या आकाशाला रंगच नव्हता. त्या बिनरंगी खिडकीएवढ्या एकाकी आकाशातून पुनः एकदा पिवळाधम्म आतून चांदणीसारखा पेटलेला आकाशदिवा तरंगत डुलत, हालत, पळत चालला होता. तो आकाशदिवा झपाट्यानं माझ्या खिडकीजवळ येत होता. मी डोळे घट्ट मिटून घेतले आणि पुनः चटकन् उघडले. भपकन् पेटत तो आकाशदिवा जळतच कुठंतरी जमिनीवर कोसळला होता. मोठ्यानं ओरडून सर्वांना जागं करण्याचं भानही मला उरलं नव्हतं. ती बेळगावी रात्र आजही मला जाळते, छळते.

बारा

आठ वर्षानंतर परवा बेळगावला गेलो. बहिणीच्या घरात पाऊल टाकताच पहिली चौकशी केली ती बाबुराव पवारांची. माझे मेहुणे मला म्हणाले, बाबुराव पवार वारले. वर्ष दोन वर्षं झाली. अरेरे ! बाबुराव गेले ! माझ्या मनात पाल चुकचुकली. झरझर झरझर बेळगावातील दिवस मला आठवू

लागले. कुडाळगावातील कुडाळ हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मी काकाकडे बेळगावला आलो होतो. दीनवाणा, बापुडवाणा होऊन. एक तर काका मिलिटरी अकाऊण्टस्‌मध्ये नोकरी लावतील ही आशा. दुसरं म्हणजे त्यानी मनावर घेतलं तर ते कॉलेजातही माझं नाव घालतील ही अपेक्षा. झालं तसंच. मी लिंगराज कॉलेजात जाऊ लागलो. दग्र्याकडून बाहेर पडून ग्लोब टॉकीजच्या रस्त्यानं कँटोन्मेन्ट गाठायचं. मग सरळ रस्त्यानं (ठळकवाडी, शहापूरकडून येणारा) चालू लागायचे. डाव्या हाताला वाटेत एक मोटर गॅरेज, शंभू आप्पाजी फोटो स्टुडिओ, मच्छी मार्केट, उजव्या हाताला चर्चची इमारत, पुन। रस्त्याच्या दुतर्फा बटलर लोकांची दुतर्फा बैठी बसकी घरे. ती संपतात तोच एक मॅटर्निटी हॉस्पिटल. उजव्या हाताला. आणि त्याला लागूनच 'पार्वती मोटर स्टॅण्ड.' या मोटर स्टॅण्डवरूनच सावंतवाडीला जाणाऱ्या गाडया सुटायच्या. कॉलेजमध्ये जाता येताना वाटेतच हा स्टॅण्ड लागायचा. लांबट हिरव्या रंगाच्या मोटार गाडया येताहेत, जाताहेत. मध्येच थांबून पहायला मजा वाटायची. कुणी ना कुणी तरी ओळखीपाळखीचा कोकणी माणूस हटकून त्या स्टॅण्डवर भेटायचा. त्या स्टॅण्डवरच रस्त्याच्या अगदी कडेला ठळकपणे बाबुराव पवार आपलं विडया, सिगारेटी, तंबाखूचं दुकान काढून त्या पेटीवजा दुकानात एकटेच बसलेले असायचे. त्यांच्या पुढ्यात काचेच्या बरण्याही होत्या आणि त्या बरण्यातून चकली, लाडू, चिवडा आणि त्यानी घरी खास केलेली व पातळ कागदात गुंडाळलेली चिक्कीसारखी गावठी चॉकलेटे पण असायची. हळूहळू केव्हातरी स्टॅण्डवर रेंगाळताना बाबुरावांच्या दुकानातही मी डोकावू लागलो. कुतूहलानं एकदा त्यांच्याकडून चॉकलेटे विकत घेतली. (खरी दुसरी उंची चॉकलेटेही त्यांच्याकडे होती. पण, माझ्या खिशाला ती परवडणारी नव्हती.) तर ती गुळमट, गोड व जिभेवर बराच वेळ रेंगाळत राहणारी चॉकलेटं मला खूप आवडली. एक आणा दिला की दोन तीन तरी तसली चॉकलेटे बाबुराव हातावर टेकवायचे. शिवाय त्यांच्या दुकानात सोडा, लेमन आणि रंगीत सरबताच्या बाटल्याही होत्याच. बाबुरावांचं बरं चालायचं.

बाबुराव दिसायला मोठे रुबाबदार व मराठमोळे होते. डोक्यावर उंचशी काळीजर्द टोपी. अंगात निळसर सदरा. जाडजूड कापडाचा. पायात ठाक-

ठीक कसून कासोटा मारलेलं जाडं भरडं धोतर. पायात करकरणारी वहाण चेहरा लांबट. हळुवार. भाववाही. नाक तरतरीत, घवघवीत. मर्दानी काळेभोर. मोठे डोळे. जणू पाण्यातून ओले ओले होऊन नुकतेच वर काढल्यासारखे दिसणारे हसरे ओठ भाळप्रदेश रुंद. आखीव कानाच्या पाळ्या डोळ्यात भरणाऱ्या. उठावदार. निमुळती तरळ हनुवटी. बाबुरावांच्या चेहऱ्यात कोणतेतरी वेगळेच माणसाच्या संवेदनाना सूक्ष्म स्पर्श करणारे भाववाही रसायन होतं. ते सुखी आहेत की दुःखी; ते खूप खोल चिंतेत गढलेले आहेत की चिंतामुक्त आहेत. ते प्रेमळ आहेत की रागीट; धनसंपन्न आहेत की धनशून्य, काहीच चटकन कळायचं नाही. मग माझा व त्यांचा संवाद सुरु झाला. बाबुराव नेमकं व मोजकं बोलायचे. त्यांच्या आवाजात एक सुरांचा लयदार चढउतार असायचा. आवाज मऊ पण मर्दानी असायचा. काही विनोद घडला तर ते गळ्यातल्या गळ्यात व ओठातल्या ओठात. खसखसून पण गुदमरल्यासारखे हसायचे. जणू आपलं हसू बाहेर फुटेल व चोहीकडे पसरेल अशी त्याना भीती वाटत असावी. मी कोकणात जायला लागलो किंवा कोकणातून यायला लागलो की पहिला मुक्काम माझा बाबुरावांच्या दुकानातच व्हायचा. नंतर तर बाबुराव पैसेच घ्यायचे नाहीत. चहा मागवायचे सोडा लेमन प्यायला द्यायचे. चॉकलेटांची पुडी कोटाच्या खिशात कोंबायचे. मी लिंगराज कॉलेजमध्ये वर्गात बसलो की, बाबुरावानी खिशात कोंबलेलं चॉकलेट चघळीत व्याख्यान ऐकायचो. कॉलेजजवळ रस्त्याच्या उजव्या हाताला एक दगडी फरशांची चाळ होती. लहानशा प्रवेशद्वारातून आत गेलं की चौक लागायचा. त्या चौकात दुतर्फा सभोवार घरांचे हुंबरे होते. आत आत लांबट घरं होती. कोपऱ्यावरच्या तिथल्या एका घरात बाबुराव रहायचे. दिवसासुद्धा त्या घरात काळोख असायचा. एकदा बाबुराव मला आपल्या घरात घेऊन गेले. बायको मुलामाणसांची त्यानी ओळख करून दिली. जणू मी त्यांच्या घरचा झालो. तेही कुणी माझे जवळचे नातेवाईक झाले. मी माझ्या मनातील सगळी वादळं बाबुरावांकडे मोकळी उघडी करायला लागलो. खूप कोंडमारा झाला, गुदमरायला लागलो. असह्य वाटू लागलं की, मी बाबुरावकडे पळायचा. बाबुराव निमूटपणाने पण ओलावल्या मुद्रेनं सगळं ऐकून घ्यायचे. मग हळुवार माझ्या

खांद्यावर हात ठेवून म्हणायचे... 'हेही दिवस निघून जातील... आधी माणसानं दुःखच भोगलं पाहिजे. मगच सुखाची किंमत कळते...' नंतर मी कॉलेज सोडलं (प्रथम वर्ष करून) तरी पण पुष्कळदा बेळगावात येण्याचे योग येत असत. केळकर बागेत चौकात बाबुरावानी सोडा वॉटर फॅक्टरी व कोल्ड्रींक हाऊस सुरू केले होते की ते कुणाचे चालवीत होते आठवत नाही पण बेळगावातील आयुष्याच्या पंचविशीतिशीतील बऱ्याच संध्याकालीन बैठका बाबुरावांच्या कोल्ड्रींक हाऊसमध्ये व्हायच्या. जीवनात बऱ्यावाईट अनुभवाचं भलं मोठं भांडार साठलेलं होतं. बाबुराव लहानपणी (म्हणजे कुमार वयात पाहिलेले) होते तसेच माझ्या मोठेपणीही होते. लग्न झाल्यावरही दोन तीनदा ते भेटले होते. परंतु शेवटपर्यंत कळलं नाही ते म्हणजे एवढंच !

खरंच, माझे जिव्हाळ्याचे ज्येष्ठ सुहृद, जिवाभावाचे बरेमागते, जीवनभर धडपड धडपड करीत राहणारे बाबुराव पवार सुखी होते की दुःखी ? माझा दुःखभार मात्र माझ्या ऐन तारुण्यात त्यानी शब्दांची व मायेची फुंकर माझ्यावर घालून त्यानी खूप हलका हलका केला होता.

❋

तेरा

बेळगावच्या किती आठवणी मनात भरून राहिल्या आहेत. सांगायला किंवा लिहायला बसलो की किती सांगू नि लिहू असं होऊन जातं. पण सगळ्याचं सांगणं कसं शक्य आहे ? आणि जरुरीचं तरी आहे का ? आज उतरणीला लागलेली जीवनाची गाडी त्यावेळी नुक्ती कुठं चढतीला लागली असावी. इंग्रजी पहिली दुसरीतील आठवणी या बेळगावच्या अगदी पहिल्या आठवणी. मिलिटरीचा ब्युगुल आजही सारखा कानात गुंजत रहातो. त्याचं ते चढउताराचं मृदुमर्दानी संगीत आजही कानामनात घुमतं. ब्युगुलाबरोबर आम्ही झोपून उठत होतो. ब्युगुलाबरोबर आम्ही रात्री झोपत होतो.

मिलिटरीचं एक गोळीबाराचं शिक्षण देणारं ठिकाण आम्ही रहात होतो त्या घराच्या मागच्या बाजूला होतं. बेळगाव स्टेशनापासून जवळच. परवा बेळगावात गेलो तेव्हा रिक्षातून मी पाहिलं. आजही ते तसंच तिथं आहेसं वाटलं. गोळीबाराचा दिवस असला की त्या ठिकाणी चारी बाजूला लाल झेंडे लागायचे. डेंजर सिग्नल्स. आत खाली खोलगट जमीन खणलेली होती. तिला कडयासारखी वरवर जाणारी भित होती. त्या भितीवरही जमिनीच्या सपाटीवर आणखी एक दगडी उंच भित बांधलेली होती. आमच्या घराच्या मागील दारातून ती उंच भित खूपच उंच वाटायची व डोळ्यात भरायची. पलिकडे गोळीबार सुरु असायचा. खाली भुईसपाट पडून बंदुकीचं शिक्षण घेणारे सैनिक आपल्या बंदुकानी समोर खोलगट भागात भितीलगत लावून ठेवलेल्या लक्ष्यावर गोळ्या सोडायचे. त्याच्यावर देखरेख करायला व त्याना मार्गदर्शन करायला रुबाबदार खाकी गणवेषातील काळे गोरे साहेब असायचे. कधी कधी आम्ही पोरं त्या ठिकाणाला वळसा घालून पलिकडच्या बाजूला जात असू व उंच वाढलेल्या आंब्या, वडा, फणसांच्या झाडाआडून गोळीबाराचा तो प्रकार पहात असू. थट्, थट् थाड, थट् असे आवाज हवेत घुमायचे. मनात यायचं आपणही हातात बंदूक घ्यावी व गोळी चालवावी. कधीकधी गोळीबार करणाऱ्या त्या सैनिकांवर साहेब लोक खूप रागवायचे त्याना 'फायर. करायचे. गोरे साहेब तर थाडकन् थोबाडीतही द्यायचे व बुटाची लाथ मारायचे. दिवसभर चाललेला गोळीबार संपला की चिडोचूप होऊन जायचं सामसूम मग आम्ही पोरं धावत धावत त्या खोलगटीत उतरायचो. खाली उभ्या भितीत आणि खणलेल्या मातीत गोळ्या लागून भोकं पडलेली असत. आम्ही भराभर ती भगदाडातील माती हातानी वर उपसून काढीत असू व त्याखाली खोल आत दडलेलं बंदुकीच्या गोळीचं शिसं गोळा करीत असू.

एकदा रात्री त्याच गोळीबाराच्या ठिकाणावर कुठल्यातरी एका मिलीटरी विभागाचा अधिकारी व सैनिक लोकानी एक मजेदार कार्यक्रम रात्रभर साजरा केला. तो ख्रिसमस किंवा 'मिलिटरी डे' सारखा दिवस असावा. गोळीबाराच्या दिवशी सभोवारच्या लाल झेंड्यामुळे भयावह दिसणारी ती

जागा त्या दिवशी झगमगणाऱ्या पेट्रोमॅक्सच्या व विजेच्या दिव्यानी सुंदर व उत्सवी दिसत होती. रात्री जेवणे वगैरे झाल्यावर आमचे काका आम्हा मुलाना त्या मिलिटरीच्या रात्रसमारंभाला घेऊन गेले. आतून बाहेरून खूप आरास केली होती. समोरच मंडप घातलेला होता. त्या मंडपाच्या मधोमध नाटकाचं स्टेज उभारण्यात आलं होतं. हिरवा, निळा व लाल पडदा सोडलेला होता. स्टेजच्यासमोर, पलिकडे व आजुबाजूला स्टेडियमसारख्या वरवर रचल्या गेलेल्या खुर्च्या मांडलेल्या होत्या. अर्धवर्तुळाकार. थंडीचे दिवस होते. गोरेसाहेब आपल्या मंडमांसह पुढच्या रांगेत बसले होते. आम्हाला काकांबरोबर तिसरी की चौथी रांग मिळाली होती. मोठमोठे भारतीय लष्करी अधिकारीही सहकुटुंब नटून आले होते. सुगंधी द्रव्याचा घमघमाट हवेत पसरत होता. लोकांचं येणंजाणं वाढत होतं. पण 'सिव्हीलियन फारच थोडे लोक होते. साहेब आणि साहेबिणीना डोळे भरून आम्ही पोरे पाहून घेत होतो, ते लोक रात्रीच्या दिव्याच्या झगमगाटात अद्‌भूत वाटायचे. केव्हा तरी पडदा वर झाला होता. नाटक सुरु झालं होतं. उर्दू, हिंदी व इंग्रजी असा काहीतरी तो 'चावट' फार्स होता. (हे आता कळतंय) त्यातला एक प्रसंग आजही आठवतोय. त्या नाटकातील स्त्रियांच्याही भूमिका पुरुषानीच केल्या होत्या. नाटकातील ती स्त्रीपात्रे (आजही मला जाणवतंय) 'झनानी' न वाटता 'मर्दानी'च भासायचित तर प्रसंग असा की 'ती' घरात आहे. तिचा नवरा 'तो' बाहेर कुठंतरी गेला आहे. इतक्यात दार वाजते. ती दार उघडते. तिचा 'प्रियकर' आत येतो. तिचा आणि त्याचा प्रणय सुरू होतो. ती ऐन रंगात येतात. आणि दारावर थाप पडते. खाडखाड बूट वाजतात. ती ओळखते. नवरा आलाय आणि मग प्रियकराला दडवून ठेवण्यासाठी तिची (व 'त्या'चीही) एकच धांदल उडते. या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात ती दाणदाण धावतात. आणि स्टेज सगळे दणाणून जाते. मग तिला एक डाळकूट दिसते. ते डाळकूग ती गुंडाळते व कोपऱ्यात उभे करून ठेवते. त्या गुंडाळीत आत तिचा प्रियकर लपून बसलेला असतो, शेवटी ती नवऱ्याला दार उघडते. त्याला कसलातरी संशय येतो. आडदांड धिप्पाड लष्करी गणवेष घातलेला तो पुरुष ! बायको त्याचे कपडे उतरते. तो घरगुती पांढरे स्वच्छ कपडे घालतो.

लुंगी नेसतो आणि बायकोला विचारतो... 'ते डाळकूट असे काय विचित्र दिसतेय ?' वगैरे आणि बायको लगेच नवऱ्याच्या गळ्यात दोन्ही हात घालते. त्याला 'माय डियर' म्हणते. त्याला बिलगते. हसते, बोलते आणि मग नवरा खुषीत. येऊन गाणे म्हणू लागतो. सगळ्या प्रेक्षक वर्गाची हसून हसून पुरे वाट होते. आम्ही मुलेही खूप हसलो. आजही ते गाणे, ती रात्र, ते शब्द, तो हास्याचा लोळपोट गडगडाट मला आठवतो... ते द्वंदगीत होते...

तो : मेरी बिब्बी कितनी अच्छी
कैसा चट मसालेदार
ती : मेरा बिब्बा कितना अच्छा
कैसा चट खारेदार...

ह्या गाण्याने त्या रात्री मजाच मजा आली होती. ते 'नाट्य' विसरूनही मला विसरता येत नाहीय.

❋

चौदा

इंग्रजी दुसरीत असताना बेळगावला स्टेशन ग्राऊंडवर एक सर्कस आली होती. तिचे नाव 'जी. ए. सर्कस ऑफ बॉम्बे' असं असल्याचं आठवतं त्याच सुमारास कधीतरी बेळगावात एक नाटक कंपनीही आली होती एक उर्दू नाटक कंपनीही आली होती व तिचे नाटकाचे फलक सगळीकडे लावलेले असत. उर्दू लिपी खालोखाल देवनागरी लिपीत मोठ्या ठळकपणे काळ्या-कुट्ट शाईने नाटकाचे नाव लिहिलेले असे. 'शरीफका खून' हे एका नाटकाचे शीर्षक मला आजही आठवते. तर मराठी नाटक मंडळी आपले खेळ 'हंस' चित्रपटगृहामध्ये करीत असे. सर्कसच्या तंबुकडे आम्ही मुले दररोज फेऱ्या मारीन असू. हत्ती घोडे, उंट माकडे, वाघासिंहाच्या वरखाली चढत उतरत जाणाऱ्या डरकाळ्या. तंबूच्या आत काय अद्‌भूत प्रकार

चालले असतील याचे कल्पनेने रचलेले खेळ सर्कस बँडचं धुंद संगीत. सर्कस केव्हा दाखवतात म्हणून आशाळभूतपणे आम्ही आमच्या काकांकडे पहात होतो. एके दिवशी सकाळीच चहाच्या वेळेला काकानी घरात जाहीर करून टाकलं. आज रात्री सर्वांनी सर्कसचा शेवटचा 'शो' पहायचा. आमच्या घराच्या आवतीभोवती मिलिटरी मंडळींचा शेजार होता. एक दोन सुभेदार होते, कुणी सुभेदार मेजर होते. कुणी अकाउंटंट होते. मराठी कुटुंबं होती. तशीच मद्रासी पण होती. त्या रात्री ही पांच सहा कुटुंबं एकत्रच सर्कस पहायला निघाली. आमच्या काकानी रुबाबदार साहेबी पोषाख घातला होता तीच गोष्ट इतर पुरुषांची होती. आम्ही सगळी मुलं एकत्र आलो होतो. बायकामंडळींचा आणखी एक गट होता. तर सर्कस तळावर गेल्यावर सर्वांनी आमच्या काकांकडेच पैसे दिले व त्यानीच सर्वांची तिकीटं काढली. ती त्यांनी स्वत:जवळ ठेवली त्या तिकिटांवर 'लॉटरी नंबर' असायचा. सर्कस संपायला आली की सर्कस मालक लॉटरीची तिकीटं फोडीत असे. आमच्या वर्गात एक मुलगा होता. त्याच्या वडिलाना सायकल फुटली होती. ती सायकल चालवीत तो शाळेत यायचा. आमच्या काकांनी सर्व तिकीटांचे नंबर तपासले. शेवटी एक बक्षीस लागले. हिरव्या निळ्या रंगाची व सुंदर कुसरकाम केलेली काचेची 'फुलदाणी'... सर्कस सुटल्यावर सर्व मंडळीनी ती 'फुलदाणी' काकानाच दिली. रात्रीचे बारा वाजून गेले होते. आम्ही घरी आलो. नोकराने सर्व लहानमोठ्यांचे बिछाने घालून ठेवले होते. मच्छरदाण्या लावल्या होत्या. आम्ही मुलं एका मच्छरदाणीत शिरलो. कुणी तरी मस्ती केली. घर शांत होतं. काकांचा मूड गंभीर होता. त्यांच्या टेबलावर 'फुलदाणी' दिव्याच्या प्रकाशात सुंदर शोभून दिसत होती. मस्ती करताना मच्छरदाणी एकदम तुटून पडली. त्याचवेळी आमच्या काकांचा रागाचा पारा वर चढला. पुढंमागं न पाहता त्यानी टेबलावरची ती 'फुलदाणी' उचलली व आमच्या दिशेने भिरकावून दिली. नशीब ! आम्ही सगळ्यानी चटकन् खाली बिछान्यात घसरून दिलं. पांढऱ्या शुभ्र दगडी भिंतीवर ती फुलदाणी दाणकन् आपटली आणि खाळकन् तिचा चक्काचूर झाला. ते रात्रीच्या मायावी प्रकाशात (घरात एक मोठा चांदीचा जुन्या पद्धतीचा दिवा होता) विखुरलेले व

रत्नासारखे अद्‌भूत व जादूचे दिसणारे त्या 'फुलदाणी'चे काचेचे 'अवयव' कितीतरी वेळ रात्रभर माझ्या डोळ्यांची भूलभुलावण करीत होते. मात्र सर्कसमध्ये एक विदूषक आपले दोन्ही कान मजेदारपणे पुढेमागे हालवीत असे. हळूहळू 'प्रॅक्टीस' करून मीही माझे कान हलवायला शिकलो होतो. एके दिवशी मी मुलांचा सभोवार घोळका करून माझे कान हालवून दाखवीत होतो. त्याचवेळी काका घरात आले होते व त्यानी माझें दोन्ही कान उपटले होते. नंतर काही मी माझे कान हालविल्याचं मला आठवत नाही परंतु ती भग्न 'फुलदाणी' आजही दृष्टीसमोर तरळतेय.

असेच एका रात्री काकानी नाटकाला जायचं ठरविलं. शेजारची मराठी मंडळीही बरोबर होती. मला आठवतं आम्ही नाट्यगृहात वरच्या सज्ज्यात बसलो. होतो अर्धवर्तुळाकार सज्जा होता तो. त्याला हिरव्या रंगाचे लोखंडी गज होते. रात्री पडदा वर गेला. नाटक सुरू झालं. आधुनिक सामाजिक नाटक होतं. (हे आता लक्षात येतय) त्या नाटकातील स्त्री पुरुषपात्रं रंगभूमीवर आली की खूप मजा वाटे. हुबेहूब रस्त्यात, सलूनमध्ये, हॉटेलात, मोटारगाडीत, मैदानात, घरीदारी दिसत तशीच ही माणसं दिसत होती. एक 'हॉटेल'चाही 'सीन' होता. मला वाटतं स्त्रीभूमिका पुरुषांनीच केल्या होत्या. त्यातील एक विनोदी पात्र अजूनही स्मृतीपटावर जिवंतपणे तग धरून आहे. अंगानं ते पात्र काडी पैलवान होतं. त्याच्या गळ्यात मफलर होता. अंगात साहेबी पॅन्ट व डबाल...चा कोट होता. डोक्यावर विपुल लांबसडक केस होते व ते विस्कटलेले होते. त्याच्या डोळ्यावर रंगीत काचांचा चष्मा होता. त्याच्या पायात पांढरे सफेद की काळे पंपशू होते. ते पात्र सारखे तरुण बायकांच्या मागून असायचे. आणि एक देखावा असा होता की ते पात्र एका तरुण मुलीशी काहीतरी फाजीलपणा करीत होते. ते ओबडधोबड आडवेतिडवे हावभाव करून एक इंग्रजी गाणंपण म्हणत होते. त्या गाण्याची एक ओळ आजही मला आठवते... तो गात होता, 'मेन ॲण्ड विपिन आर वन...' आणि त्या स्त्रीपात्राने पहाता पहाता थाडकन् आपल्या पायातील वहाण काढून त्या पुरुषपात्राच्या थोबाडीत मारली होती. नाट्यगृहात एकच हंशा पिकला होता. हास्याचे वर खाली सगळीकडे कल्लोळ उठत होते. आम्ही मुलंही

खूप पोट धरधरून हसलो. नंतर नाटक संपल्यावर घरी जाताना वडील माणसं एकमेकाशी बोलत होती. 'या नाटकाला मुलाना आपण आणायला नको होतं. नाटक चावट होतं...' चावटपणाचा अर्थ नकळत कुठंतरी त्या रात्री बिछान्यात झोपी जाताना मला कळला असावा



पंधरा

बेननस्मिथ हायस्कूलमध्ये मी इंग्रजी पहिली व दुसरी इयत्ता पूर्ण केली. दुसऱ्या इयत्तेनंतर घरात ठरलं की मी पुनः कोकणातच पुढील शिक्षण घेण्यासाठी जावं. इयत्ता दुसरीची वार्षिक परीक्षा जवळ आली होती व काकानी मला आपला हा निर्णय सांगितला. मी माझ्या पोरवयात तो ऐकला आणि सुन्न झालो. म्हणजे मी बेळगाव सोडणार होतो. पुनः कधीही मला बेळगावला यायला मिळणार नव्हतं. मी एक कोकणी माणूस· थोडा वेळ घाटावर आलेला. पुनः कोकणातच जाणार. माझ्या डोळ्यासमोर बेननस्मिथ हायस्कूलमध्ये गेलेली दोन वर्षे पारदर्शकपणे तरळू लागली. किती एका वेगळ्या जगात माझे दिवस मजेत आणि आनंदात गेले होते. वर्गातील माझे मित्र, आम्हाला प्रत्येक वेगवेगळ्या विषयाला शिकविणारे वेगवेगळे शिक्षक, शाळेची इमारत, बाग, जिद्दीर, चिंचेचं झाडं, शाळेच्या बागेचे माळी, चित्रकला शिक्षक व चित्रकलेची विशिष्ट खोली. सुतारकाम शिकण्याची खोली. आवारातील टमाटे, पेरू मखमलीची फुलं. फुलांचे ताटवे प्रगोयशाळा. आम्ही दुसरीची परीक्षा दिली. मला फक्त एकाच विषयाला बसावं लागलं. गणिताला. नंतर आमच्या वर्ग शिक्षकानी आम्हाला वर्गात बसवून निर्णय सांगितला. मग म्हणाले, आता, पुढील वर्षी तुम्ही शाळेत याल तेव्हा शाळेत नवे प्रिन्सिपॉल अमेरिकेहून येतील. त्यांचे नावही त्यानी मग खुर्चीवरून उठून फळ्यावर लिहिलं. ते नाव होतं मॅक् लाफ लीन. शिक्षकानी आम्हाला ते नाव वहीत लिहायला सांगितले व नावाचा उच्चार सर्वांकडून

सामुदायिक करवून घेतला. मी या मॅक् लाफ लीन साहेबाना कधीच पाहिलं नाही. कारण इंग्रजी तिसरीत मी आमच्या कोकणातील इंग्रजी शाळेत दाखल झालो होतो. पण प्रिन्सिपॉलसाहेबांचे ते नाव सतत कितीतरी महिने कोकणातील शाळेतही माझ्या कानात प्रतिध्वनित होत होते. आमच्या वर्गात एक मोठा धिप्पाड मुलगा होता. तो मधून मधून पागोटे घालूनच शाळेत यायचा. त्याच्यापुढे आम्ही पोरंच वाटत होतो. पण तो माझा चांगला मित्र झाला होता. तो आखाड्यात कुस्त्या खेळायचा. गोड हळूवार बोलायचा. फार सुंदर मर्दानी हसायचा. मी त्याला म्हटलं– मी आता पुनः या शाळेत येणार नाही. तर त्याला खूप वाईट वाटलंसं दिसलं. दुपारच्या सुटीत तो मला शाळेच्या गेटजवळ बसलेल्या आलेपाकवाल्याकडे घेऊन गेला आणि कागदाच्या पुरचुंडीतून आंबट, तिखट व लिंबू पिळलेला मजेदार आलेपाक त्यानं मला खाऊ घातला. एक माझ्या वर्गात माळ्याचा मुलगा होता. त्याचा बाप मिलिटरीत साहेबांच्या बगिच्यात काम करीत होता. त्या मुलानं एकदा मिलिटरीच्या बागेत मला नेलं. तिथं स्टॉबेरीची झाडे होती. त्यावरील स्टॉबेरी काढून त्यानं मला खायला दिली. नंतर सुंदर फुलं गोळा करून त्याने त्याचा गुच्छ केला. पानं तुरे लावून मग मला त्यानं तो भेट म्हणून दिला.

शिक्षकानाही मी भेटून सांगितलं. मी काही पुनः या शाळेत शिकायला येणार नाही. त्यावेळचे काही शिक्षक मला आजही आठवतात. ते मला म्हणाले, तू ही शाळा सोडू नकोस. तुझ्यासारखा मुलगा आम्हाला हवा आहे. तू गेलास तर तुझी आम्हाला खूप आठवण येईल. काळी टोपी घालणारे, पायात जाडजूड करकरणाऱ्या घाटी वहाणा, धोतर कासोटा मारलेले अंगानं मजबूत, सायकलने येणारे शिक्षक. त्यानी माझ्या पाठीवरून मायेनं हात फिरविला. ते आम्हाला मराठी विषय शिकवायचे. 'युद्धात गुंतला अर्जुन । इकडे काय झाले वर्तमान ।' ही कविता त्यानी रंगून शिकविलेली मला कधीही विसरता आलेली नाही. तर शाळेच्या माळ्यालाही मी कोकणात जाणार व पुनः येणार नाही म्हणून मी सांगितलं. तर त्यालाही खूप वाईट वाटेलसं दिसलं. तो कधी नव्हे तो शाळेच्या पुढच्या व मागच्या दाराच्या सर्व बागातून मला स्वतः घेऊन गेला. माझ्या चड्डीच्या खिशात

त्याने पेरू कोंबले. मला बोटचेपे इवलेसे टमाटे पटापट तोडून खायला दिले. मला त्यानं फुलेपण दिली. त्याचवर्षी नंतर बेननस्मिथ हायस्कूलचे प्रिन्सिपॉल झालेले श्री. रेड्डी हे शिक्षक अमेरिकेला जाऊन आले होते. वरच्या वर्गात मुलांसमोर त्यांचे एक अमेरिकन प्रवासावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. तळमजल्यावरच्या एका खोलीत वरील वर्गातील एक माझा शाळेत सांभाळ करणारा (आमच्या नेहमी घरात येणारा... क्रिकेट व हॉकी खेळणारा) मुलगा मला त्या व्याख्यानाला घेऊन गेला. मी अगदी शेवटच्या बाकावर गरीब गाय होऊन चिडीचीप बसलो होतो. समोर बसलेली सगळी विद्यार्थी मंडळी अंगार्पिडाने भरलेली, उंच, सुटाबुटात व गृहस्थ वाटत होती. रेड्डी सरही निळचा रंगाच्या सुटातच व्यासपीठावर आले ते रंगाने काळसरच होते. गळचात टाय ते दुसरे ' काळेसाहेब 'च वाटत होते. लकलखीत पॉलीश केलेले बूट पायात होते. वेळ दुपारची होती. काही शिक्षक शिक्षकही पुढील बाकावर बसलेंले असावेत. त्याचं भाषण सुरू झालं. माझ्या कानावर फक्त शब्द पडत होते. त्यावेळचे मिशनरी लोक बोलत असत अशा मराठी भाषेत ते आपले अमेरिकेतील अनुभव सांगत होते. मला एक त्यातील त्यानी सांगितलेली घटना अंधुक आठवतं बोटीनं ते महासागरावरून प्रवास करीत होते. आणि रात्री बोटीच्या डेकवर त्यानी व इतर काही प्रवाशानी भूत पाहिलं होतं. त्या भूताचं अद्‌भूत वर्णन ते बराच वेळ करीत होते. मी ती भूताची कहाणी भयचकित होऊन ऐकत होतो. काही काळ तर मला माझ्यासमोर रेड्डीसर बोलत नसून कुणी भुताटकीचाच प्रकार करीत आहे को काय असं वाटत होतं. समजू लागल्या क्षणाला लहानपणापासूनच भूत माझ्या मागे लागलं होतं. घाटावरचं भूत, मिलिटरीतील भूत आणि ते त्या दुपारचं बेननस्मिथ शाळेतलं भूत ! मी बेननस्मिथ शाळा सोडल्यानंतर क्वचितच पुनः त्या शाळेला भेट द्यायला गेलो असेन. पण भुतावरचे त्या व्याख्यानातील तेवढेच क्षण कसे मनात सजग आहेत. ती शाळा मला तसे पाहिले तर कधीच सोडून गेलेली नाही व तसेच बेळगावही.



सोळा

मी इंग्रजी दुसरीनंतर बेळगाव सोडलं. पुनः कोकणात गेलो. मॅट्रिक होईपर्यंतची ती पाच वर्षे कोकणातच गेली. कोकणातील पाच वर्षांची हकीकत पुढे केव्हातरी. परंतु १९४० साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मी पुनः बेळगावातच माझ्या काकांकडे आलो. तेच काकांचं मिलिटरी कँपमधील जुनं सरकारी घर. घराच्या तशाच त्या दगडी भिती. तेच पेरूचे झाड तसेच दारात उभे होते. तीच लांबलचक बरॅक. एक थेट घराजवळची आणि दोन बराक्री कंपाऊंडात दोन टोकाना अलिकडे पलिकडे पसरलेल्या. दारात छोटीशी बाग. मी आता त्याचं नाव विसरलो पण एक तरणा आणि दांडगा माळी बागेची देखभाल करायला सकाळचा येत होता. सोनचाफ्याचे झाड तसेच काकांच्या कचेरीसमोर उभे होते. कचेरीची काचेच्या तावदानाची इमारत तशीच कंपाउंडात दर्ग्याच्या बाजूने उभी होती. घराच्या मागच्या बाजूला तीच वडाची पसरलेली प्रचंड दाटीवाटी. फणसाचे झाड, काजूचे झाड आणखीही काही किरकोळ झाडंझुडपं. कंपाऊंडाच्या पलिकडचं तेच तसंच हॉकीचं मैदान. त्या मैदानावरच्या कोपऱ्यातलं आंब्याचं आणि सावरीचं झाड. दोन्ही झाडं तशीच ताजीतवानी आणि ताठ उभी होती. पाच वर्षानी मोठा होऊन मी पुनः एकदा बेळगावात आलो होतो. एका सकाळी काकानी मला पैसे दिले आणि म्हटलं– जा लिंगराज कॉलेजात जाऊन तुझं नाव घालून ये... खरं म्हणजे मिळाली तर मिलिटरी अकाउंटस्‌मध्ये नोकरी करायला मी आलो होतो. काका म्हणाले, 'नोकरी कशाला ? अजून, लहान आहेस. शिकता येईल तेवढं शिकून घे निदान ग्रॅज्युएट तरी हो... आमच्यासारखं नको तुझं जीवन व्हायला... कारकुनाची नोकरी धरली तेव्हा धड आम्ही मॅट्रिकसुद्धा झालो नव्हतो...' कॉलेजात जाता

आलं तर आर्टस्‌कडें जायचं माझं मी मनानं ठरवलं होतं. कॉलेजात जायचं. शिकायचं– कॉलेजकुमार व्हायचं ! कॉलेजकुमार व्हायचं ! कॉलेजकुमार आणि कुमारिका यांच्याबद्दल अगोदरच कितीतरी 'रोमॅण्टिक' कल्पना डोक्यात तयार झाल्या होत्या. शाळेत असतानाच ना. सी. फडकेंच्या कादंबऱ्या वाचनात आल्या होत्या.

काकांचीच सायकल घेऊन मी सकाळी दहाच्या सुमाराला लिंगराज कॉलेजच्या आवारात शिरलो. माझ्याचसारखी काही तरुण मुलं व मुलीसुद्धा सायकलवरून कॉलेजच्या आवारात येत होत्या. ती लांब, पसरट, कॉलेजची दगडी इमारत विचित्र वाटत होती. इमारतीच्या मधोमध इमारतीत शिरायच्या पायऱ्या होत्या. त्या पायऱ्यांसमोरच सायकल स्टँड होता. मी सायकल स्टँडमध्ये सायकल उभी केली आणि खाली तळमजल्यावर असलेल्या कार्यालयात गेलो. कन्नड पद्धतीचा पोशाख व पगडी घालून एक कारकून महाशय एकटेच एका टेबलासमोर बसले होते. त्यांचा चेहरा उग्र संतापी दिसत होता मी भीतभीत त्यांच्याकडे गेलो. आदबीने मराठीत त्याना म्हटलं, मला कॉलेजात नाव घालायचं आहे. फॉर्म हवाय. वगैरे. ते माझ्याकडे ढुंकूनही पाहिनात. खाली मान घालून एका मोठ्या हिशोबाच्या वहीत लिहीत राहिले. मी आणखी एकदा नम्रपणे त्याना विनंती केली. क्षणातच खासकन् त्यानी आपलं तोंड उघडलं आणि वसकन् कन्नड भाषेतच ते माझ्या अंगावर ओरडले. ते तावातावाने माझ्याशी कानडीत बोलत होते आणि मी त्यांच्याशी पडक्या आवाजात मराठीत बोलत होतो. मराठी–कानडी भाषिकवादाचा त्यावेळी आणि त्या क्षणाला मला पुसटही जाणीव नव्हती. कुणीतरी तितक्यात आणखी एक कारकून कार्यालयात आले. चटकन् त्यानी माझ्या घामाघूम झालेल्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि 'काय पाहिजे ?' म्हणून चक्क अस्सल मराठीत विचारलं. मला त्यानी नंतर फॉर्म दिला. तो माझ्याकडून नीट भरूनही घेतला. मी फीचे पैसे दिले वगैरे.

पण तत्पूर्वीची बेळगावातील एक आठवण सांगितली पाहिजे. कोकणात कुडाळ गावी मी इंग्रजी सहावीत होतो. शांतारामबापूंचा 'माणूस' चित्रपट त्यावेळी फार गाजत होता. वर्तमानपत्रात, साप्ताहिकात, मासि-

कात सगळीकडे एकच विषय प्रभातचा चित्रपट 'माणूस'!, 'माणूस' चित्रपट पहाण्याची फार उत्सुकता लागली. काही वर्गमित्र कोल्हापूर बेळगावला गेले व 'माणूस' चित्रपट पाहून आले. 'अरे कशाला उद्याची बात। बघ उडुनी चालली रात' हे गाणं कानावर येऊ लागलं. अकस्मात दिवाळीच्या की नाताळच्या सुटीत काकानी बेळगावला बोलावलं. मी लगेच बेळगाव गाठलं. 'हंस' थिएटरमध्ये 'माणूस' चालू होऊन खूप आठवडे झाले होते आणि तरीही रोज चित्रपटाला गर्दी होत होती. मी एकटाच दुपारचा 'हंस' थिएटरवर गेलो. चार आणे हातात घट्ट पकडून तिकीटाच्या खिडकीवर गेलो. तर ही गर्दी ! जो तो एकमेकाला मागे खेचीत होता. सगळी भली दांडगी माणसं. माझ्यासारख्या काडी पहिलवान कोकणी माणसाचा तिथे निभाव लागेना. तरीपण तिकीट हे काढायचंच व चित्रपट हा पहायचाच असा मी निर्धार केला होता. मी गर्दीत चिरडला जात होतो. पुढंमागं होत होतो. (त्यावेळी 'क्यू' आला नव्हता) पण मग जागेवरून मात्र मी हटत नव्हतो. देहाला दणकत दणके बसत होते, पण मग एकदाचा कसा बसा माझा हात तिकिटाच्या खिडकीपर्यंत जाऊन पोचला. मी मूठ उघडली चार आणे दिले. मुठीत हिरवं चार तिकीट आलं. 'हंस' थिएटरात मी घुसलो. जागा पकडली. चित्रपट सुरू झाला. चित्रपट संपेपर्यंत जागेला खिळून बसलो होतो. शेजारीपाजारी बसलेले लोक गरमागरम शेंगा फटाफट फोडून खात होते. चित्रपट संपला, भारावून मी बाहेर पडलो. तेव्हापासून आत्महत्त्या करायला निघालेल्या नायकाला वठणीवर आणणारे बुवासाहेब मनात घर करून राहिलेत ते आजपर्यंत. ❋

सतरा

माझं लिंगराज कॉलेज सुरू सुरू झालं आणि दिवस भराभर जाऊ लागले. लिंगराज कॉलेजमधील पहिला आठवडा आजही छानदारपणे डोळ्यासमोर तरळतो. एक आठवडाभर मला कॉलेजात कुणीही मित्र नव्हता. बेननस्मिथ हायस्कूलमध्ये असताना वर्गात असलेले दोघं तिघेजण घोळक्यात

मला दिसत. पण ती जवळ जाऊनही काही केल्यानं मला आपली ओळख देत नव्हते. मीही मग कधीच त्यांच्या वाटेला गेलो नाही. कॉलेज सुरु झालं. त्याच्या पहिल्याच की दुसऱ्या दिवशी पहिल्या मजल्यावर जिथं आमचा वर्ग भरू लागला, त्या वर्गातच कॉलेजमधील सर्व मुलामुलींची सभा घेण्यात आली. ती सभा म्हणजे महाविद्यालयाच्या नव्या वर्षाचे प्रिन्सिपॉल डॉ. नंदीमठ यानी केलेले उद्‌घाटन होते. शेकडो विद्यार्थी दाटीवाटीनं त्या सभागृहात बाके समोर ठेवून बसले होते. डाव्या हाताला मुली होत्या. वेळ दुपारची होती. वर्गात सुगंधी फुलांचा व अत्तराचा घमघमाट सुटला होता. हळू मोठ्या आवाजात विद्यार्थी एकमेकाशी बोलत होते. आणि तेवढ्यात च डॉ. नंदीमठ यानी खोलीत प्रवेश केला. समोर ऐसपैस पसरलेलं व्यासपीठ होतं. व्यासपीठावर दोन्ही बाजूना खुर्च्या मांडून ठेवल्या होत्या- मधोमध प्राचार्यासाठी विशेष खुर्ची होती. डॉ. नंदीमठांनी अंगात पिवळसर सूट घातला होता. गळ्यात रंगीत टाय होती. त्यांची मूर्ती ठेंगणी ठुसकी पण तरतरीत होती. डोक्यावर मात्र त्यांच्या दक्षिणी पद्धतीची पगडी होती. डोळ्यावर चष्मा होता. रंगाने ते काळेसावळे दिसत होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या मागून व्यासपीठावर एकेक प्रोफेसर पायऱ्या चढत होते व आपापली खुर्ची घेऊन बसत होते. ' प्रोफेसर ' या शब्दाचं कॉलेजात पाऊल टाकल्यापासूनच मला अद्‌भूत वाटू लागलं होतं. इंग्रजीचे प्रोफेसर, मराठीचे प्रोफेसर, इतिहासाचे प्रोफेसर... मी आश्चर्यचकित होत होतो. केवढे अगाध व प्रचंड असेल एकेका प्रोफेसराचे ज्ञान ! बापरे ! हे लोक आता आपल्याला वर्षभर वेगवेगळे विषय शिकविणार. अर्थात विज्ञान– विषयाच्या प्राध्यापकांशी त्याचा काही संबंध नव्हता. काही प्राध्यापक उंच, देखणे व ऐटदार होते. सर्वांनीच सूटबूट घातले होते. पण सुटाबुटावर कन्नड पद्धतीची पगडी घालणारेही किती एक प्राध्यापक होते. दोन चार वयस्कर प्राध्यापकांनी मात्र लांब काळे पांढरे पायघोळ कोट घातले होते. त्या गळाबंद कोटांची बटने थेट खालपर्यंत बंद होती. त्यांच्या डोक्यावर रुमाल बांधलेले होते. लालधारीचे पांढरे रुमाल. तर एक दोघानी काळ्याभोर वाटोळ्या टोप्या घातल्या होत्या. ही खूपच प्रचंड ज्ञान असलेली ऋषीमुनीच्या तोडीची मंडळी असावी असे मला वाटले. प्रथम एक उंच गोरेगोमटे प्राध्यापक

उभे राहिले. समोर त्यावेळी ध्वनिक्षेपक वगैरे काही नव्हतं. मळखाऊ रंगाचा काळसर सूट त्यानी अंगात घातला होता. पण त्यांचे कपडे बिन-इस्तरीचे आणि सैल वाटत होते. त्यांच्या डोक्यावरचे केस त्यानी छान विंचरलेले होते. किंचित तिरका भांग त्यानी पाडला होता. त्यांचा चेहरा नाजूक, बायकी व भावमय वाटत होता. इंग्रजीत ते बोलू लागले. मी प्रथमच इंग्रजी भाषण अखंडपणे ऐकत होतो. घोळक्यात शेजारचा कुणीतरी म्हणाला... डॉ. अय्यंगार बोलताहेत... ते नाव माझ्या कानातून मनात घुसले. नेहमीच्या शिक्षकांच्या नावापेक्षा हे नाव वेगळं होतं. मला त्यांचं सगळंच भाषण समजलं नव्हतं. पण त्यांची इंग्रजी भाषा बोलण्याची लय, शैली व वाणीतील मार्दव व प्रसन्नपणा मला खूप आत स्पर्श करीत राहिला.

नंतर डॉ. नंदीमठ बोलले.. मघापासून त्यांचा करडा, अधिकारी व गंभीर दिसणारा चेहरा ते बोलू लागले आणि वेगळाच दिसू लागला. चेहऱ्यावर हास्य उमटलं, बोलण्यात खेळकरपणा व खोडकरपणा जाणवू लागला. इंग्रजी भाषा चटकन आकलन होत नव्हती. तरीसुद्धा ते विनोदी शैलीने बोलत होते ते जाणवलं. जुने जाणते वरच्या वर्गातील वयानेदेखील मोठे असलेले कॉलेजविद्यार्थी खळखळून हसत होते व व्याख्यात्याना दाद देत होते. डॉ. नंदीमठ व्यासपीठावर बसलेल्या लहान-मोठ्या, नव्याजुन्या, प्राध्यापकांची ओळख विद्यार्थी श्रोत्याना चटकदारपणे करून देत होते आणि व्यासपीठावर बसलेले प्राध्यापकही गालातल्या गालात प्रसन्नपणे हसत होते. नेमकं ते त्या प्राध्यापकांबद्दल काय बोलत होते हे त्यावेळी मला कळत नसूनही तुकड्या तुकड्यानी डॉ. नंदीमठाचं भाषण मला मजेदार वाटत होतं. प्राध्यापकांची ओळख करून झाल्यावर मात्र पुनः एकदा ते गंभीर झाले आणि शिक्षण म्हणजे काय ? ते कशा-साठी घेतलं पाहिजे ? केवढा मोठा भविष्यकाळ तुमच्यासमोर उभा आहे व तो तुमची कशी वाट पहातोय... थोर थोर लोक इतिहासात कसे होऊन गेले, त्यांची चरित्रं तुम्ही डोळ्यासमोर ठेवली पाहिजेत...शिक्षणाबरोबरच त्यानी मग संस्कृती (Culture) म्हणजे काय तेही आम्हाला ढंगदार इंग्रजीत सांगितलं मी ती भाषणं ऐकताना रंगलो होतो. कारण समारोप करण्यासाठी आणखी एक मद्रासी प्रोफेसर उभे राहिले होते. त्यानी मद्रासी पद्धतीचे हेल

काढीत इंग्रजीतच एक छोटंसं भाषण आम्हाला ऐकवलं. डॉ. नंदीमठांवरच त्यानी एक कसलीतरी कोटी केली आणि नंदीमठांबरोबरच सगळे प्राध्यापक व्यासपीठावर खळखळून हसले. म्हणजे कॉलेज हे एकूण असं असतं याचा अंदाज मला या पहिल्या सभेतच करता आला. वाईट वाटत होतं की, एकहीजण अजून आपल्या ओळखीचा झाला नव्हता. जिन्यात, वाचनालयात, लॉबीत, फाटकावर, मैदानात, नोटीसबोर्डाकडे समोरासमोर समवयस्क मुलं येत होती. त्यातली कन्नड बोलणारी मुलं आपोआपच बाजूला पडत होती. मराठी बोलणारी मुलं मात्र मराठी मुलांशी आपण होऊन बोलत नव्हती. कुणी पहिल्यांदा तोंड उघडायचं हेच कुणाला कळत नसावं. पहिल्या वर्षासाठी असलेल्या विषयांची व पुस्तकांची यादी मी कॉलेजानं दिलेल्या अभ्यासपुस्तिकेत पाहिली. जगाचा इतिहास ! इंग्रजी कवितासंग्रह आणि जेन ऑस्टिनची कवितासंग्रह आणि जेन ऑस्टीनची 'प्राइड अॅण्ड प्रेज्युडिस' ही कादंबरी ! संस्कृतसाठी भारताचं 'प्रतिमा नाटकम्' आणि कालिदासाचा 'रघुवंश.' मराठीसाठी आगरकरांचे निबंध, वामन मल्हारी जोशी यांची 'इंदू काळे सरला भोळे' ही पत्रात्मक कादंबरी आणि कविता (कुणाच्या होत्या आता आठवतच नाही),

सभा संपताच तसाच मी खडेबाजारात एका बुक डेपोत गेलो. माझ्या खिशात पुस्तकासाठी पैसे होते. मी पहिल्यांदा 'जगाचाइतिहास' (इंग्रजी) विकत घेतला. एक जाडजूड वजनदार पुस्तक हातात घेऊन बेळगावच्या रस्त्यातून चालताना मीच एक मोठा इतिहासकार आहे असं मला वाटत होतं. त्या पुस्तकाची आठ रुपये किंमत मी दिली होती. घरी आलो आणि इतिहासाच्या पुस्तकावर पहिल्याच कोऱ्या पानावर मी माझं नाव घातलं. इतर पुस्तकंही हळूहळू घेतली. वह्या घेतल्या. मी कॉलेजकुमार झालो.

अठरा

लिंगराज कॉलेजचं ते एक वर्ष मोठं अविस्मरणीय ठरलं. पण त्या स्मृती रेखाटण्यापूर्वी काही बेळगाव वास्तव्यातील शालेय स्मृती ज्या प्रकर्षानं आठवताहेत त्या टिपून ठेवाव्यात असं मला वाटतंय. आम्ही मिलिटरी कँप-मध्येच रहात होतो. आमच्या घराच्या दारात उभं राहिलं की समोर ग्लोब टॉकीज, जवळच हॉकीचं मैदान, पलीकडे रस्ता, रस्त्याला लागूनच पलिकडे स्टेशन ग्राऊंड, असे दृश्य दिसायचं. तर डाव्या हाताला सोनचाफ्याच्या झाडाकडून वळसा घेत गेलेल्या आवारातील पायवाटेनं पाहिलं की फाटका-पलिकडून रहदारीचा रस्ता शहराकडे जाताना दिसायचा. त्या रस्त्याला लागून मशागतीनं केलेला अमा जमिनीचा लांबट पसरलेला तुकडा. त्याच्यावर हिरवंचार बोटभर गवत वाढलेलं असायचं. मुलांची टोळकी येऊन त्या जमिनीत फुटबॉल, हॉकी व क्रिकेट खेळायचे. पलिकडे दर्गा. दर्ग्यापलिकडे सेंटपॉल हायस्कूल. लष्कराचा नागरी विभाग. सिव्हिल लाईन्स गन बो स्ट्रीट. वडा पिंपळाचं प्रचंड वाढलेले पुराण वृक्ष. तर फाटकाकडून जो रस्ता वळण घेऊन शहराकडे जात होता. मिलिटरी कॅंपमधून निघून त्या रस्त्यानं पुष्कळदा लष्कराचं संचलन होताना दिसायचं. तुकड्या तुकड्यानं खाकी ताठ गणवेष घातलेले सैनिक खांद्यावर बंदुका ठेवून, बंदुकावर आपला एक हात व दुसरा हात पुढेमागे हालवीत व पायातील स्वच्छ पॉलिश केलेले काळचा रंगाचे बूट जमिनीवर टपटपा आपटीत, मध्येच त्या रस्त्यावर अवतीर्ण व्हायचे. लष्करी बँड ढंगदारपणे त्यांच्यापुढे वाजत असायचा. सहसा तो रविवारचा दिवस असायचा. दुपार संपत आलेली असायची. आम्ही पोरं अभ्यासाला बसलेली असायची किंवा अभ्यास संपवून आपा-पल्या हॉकी स्टिक्स आम्ही कानाकोपऱ्यातून बाहेर काढीत असू

चहापाणी होताच चार पाचच्या सुमाराला आम्ही हॉकी मैदानावर धाव घ्यायचो. तर त्याच अवधीत कानावर मिलिटरी बॅंडचे सूर उमटू लागायचे. टपटप पावलांचा सामुदायिक आवाज एका लयात ऐकू यायचा. कुणाचा तरी दणकट खणखणीत आवाजात झालेला हुकूम हवेत थरथरायचा. आम्ही पोरं मग धावत फाटकापर्यंत जायची. ' क्विक् मार्च ' करीत जाणारी ती तुकडी छोटीशीच वीस पंचवीस तीस सैनिकांची असायची. तिच्यापुढे कधी गोरा तर कधी काळा लष्करी अधिकारी, रुबाबदार व मोठा देखणा लष्करी गणवेष चढवून व सैनिकाना हुकूम देत, सरळ नाकासमोर पहात चालायचा. त्याच्याचबरोबर सर्व सैनिकांच्या गळचात पांढऱ्या शुभ्र फुलांचे गोंडेदार हार असायचे. पाहता पाहता त्या सैनिकी तुकड्या ग्लोब टॉकीजच्या उजव्या रस्त्यानं स्टेशनच्या बाजूला वळायच्या. एका लयीत, सुरात शिस्तीत व हालचालीत चालताना कधीकधी ते सैनिक मोठ्यानं गाणी म्हणत जायचे... एक गाणं आजही आठवतं ते असं होतं...

लेफ्ट राईट लेफ्ट राईट जॉर्जमया ।
अंग्रेजका बावटा देखकर
जर्म भगाया ॥

मग वडील माणसं आपापसात बोलताना आम्हाला ऐकू यायचं. मराठा बटालियनची अमुक कंपनी लढाईवर पाठविण्यात आली होती. त्या दिवशी आम्हाला न राहवून वडील मंडळीना आम्ही पोरानी विचारलं की आम्हाला ती सांगायची, दूर खैबरखिंडीत, पेशावरकडे, इपीचा फकीर म्हणून कुणी फार मोठा पराक्रमी पठाण होता. तो इंग्रजांचा एक नंबरचा दुष्मन होता तो दऱ्याखोऱ्यात व अवघड अशा पर्वतांच्या पहाडातून रहात होता. त्या पहाडात त्यानं पठाणांची फौज तयार केलेली होती. ती फौज इंग्रजाना सळो की पळो करून सोडीत होती. इपीच्या फकिराला जिवंत पकडून आणण्यासाठी किंवा ठार मारण्यासाठी इंग्रज सरकारनं बक्षिसं ठेवली होती. इंग्रज सैनिक इपीच्या फकिरासमोर नामोहरम झाले म्हणून पराक्रमी अशा मराठा सैनिकांची रवानगी त्या भागात इंग्रज सेनाधिकारी करीत आहेत. इपीचा फकीर दिसतो कसा, बोलतो कसा, पहाडासारखा उंच व धिप्पाड आहे, तो किती अद्‌भूत आहे, शिवाजी महाराजांसारखा गनिमी युद्धात कसा निष्णात

आहे. तो कधीच कुणाऱ्या दृष्टीला पडत नाही पण त्याचा आवाज दऱ्या-खोऱ्यातून व पहाडातून कसा घुमतो, त्याचे साथीदार पठाण इंग्रजांच्या बंदुकातून निघालेल्या गोळचा पोटात ठेवून कसे लढतात, अचूक नेमबाजी करताच पोटातून बाहेर आलेलं आतडं एका हातानं पोटात लोटून व दाबून हातानं बंदूक कशी चालवतात, या रोमांचित करणाऱ्या पठाणी पराक्रमाच्या गोष्टी वडील मंडळी खूप रंगात येऊन आम्हा मुलाना सांगायची. मग वडील मंडळीपैकी कुणीतरी आम्हाला अगदी कानात कुजबुजल्यासारखं हळू आवाजात म्हणायचं... इंग्रज लोक विमानातून इपीच्या सैनिकांवर बाँब टाकतात. पठाण लोक पहाडा पहाडातून रहातात. त्यांच्या मोहल्ल्यावर बाँब टाकतात. बायकामुलं, म्हातारी, कोतारी, कुत्री, गुरं बाँबचा स्फोट झाला की मरतात. जखमी होतात. बाँब हा शब्द मी प्रथमच ऐकला. तो त्या बालवयातच विमानातून इंग्रज लोक पठाणी वस्तीत विषारी धूर सोडतात. मग माणसं विषबाधा होऊन हळूहळू झिजून व खंगून मरतात. आता समजतं की वडील मंडळीच्या वर्णनातून इपीच्या फकिराबद्दल व पठाण लोकाबद्दल ओतप्रोत अभिमान भरून राहिलेला असे. इंग्रजाबद्दल नकळतच आम्हा मुलांच्या मनामध्ये सुद्धा राग व चीड निर्माण होत असे. आम्ही मुलं बेळगाव शहरात नेहमीच पठाण लोकाना पहात असू. गोरे-गोमटे, लालबुंद, उंचचउंच, धिप्पाड, डोक्याला विशिष्ट पठाणी पगडी, पायात पायघोळ पायजमा, सैल आणि वाटोळा फुगलेला, अंगात लांब गुडघ्यापर्यंत येणारी सैलसी पयरण आणि त्यावर नक्षीदार पठाणी जाकिट; गुंडचा न लावता मोकळं सोडलेलं... पायात तसेच नक्षीदार टोकाकडे वळलेले ढंगदार पठाणी जोडे...हातात छत्री दुकटचा दुकटचानं हे पठाण पुष्कळदा रस्त्यारस्त्यातून हिंडताना दिसायचे... भेटायचे... कधी आम्हा मुलाना पळवतात... आपल्या देशात घेऊन जातात... रानटी लोकांना देऊन टाकतात... असं वडील मंडळीच आम्हाला सांगायची. पण इपीच्या फकिराची गोष्ट ऐकल्यावर का कुणाला ठाऊक. पण मला तरी पठाणाची भीती वाटेनाशी झाली व पठाण जवळचा वाटू लागला.



एकोणीस

लिंगराज कॉलेजमधील त्या प्रथमवर्षातील आठवणी आजही बकुळ-फुलांसारख्या माझ्या मनात सुगंधमय होऊन राहिल्या आहेत. बकुळफुलं कालांतरानं कोमेजतात. परंतु लिंगराज कॉलेजमधील त्या पहिल्यावहिल्या अशा माझ्या कॉलेजजीवनाच्या आठवणी मनात ताज्यातवान्या व तल्लख होऊन राहिल्या आहेत. प्रथम आठवतात ते आम्हाला वेगवेगळे विषय शिकविणारे वेगवेगळे प्राध्यापक. इंग्रजी, मराठी, इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन, जगाचा इतिहास, संस्कृत, (जगाचा इतिहास दोनशे गुणांचा दोन विभागात) असे विषय होते. हे विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांपैकी आजही मनात घर करून राहिले आहेत. आमचे इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. के. आर श्रीनिदास अय्यंगार. इतर दोन इंग्रजीचे प्राध्यापक होते. पण डॉ. अय्यंगार यानी आमच्या अंतःकरणात जी जागा मिळविली ती त्याना लाभली नाही. डॉ. अय्यंगार मला जीवनभर व्यापून राहिले आहेत. ते आम्हाला इंग्रजी कविता शिकवीत असत. दोन प्रकारचे इंग्रजी कवितासंग्रह आम्हाला अभ्यासाला होते. एकात जुनी इंग्रजी कविता होती व दुसऱ्यात अद्ययावत नवी इंग्रजी कविता होती. दोन्हीही कवितांचे प्रकार डॉ. अय्यंगार सारख्याच समररसतेने शिकवीत असत. त्यांच्या तासाच्या वेळेला प्रथमवर्षाची आम्ही सर्व विद्यार्थी मंडळी (विद्यार्थिनीही) वेळेवर वर्गात आपापल्या जागा घेत असू. डॉ. अय्यंगार यांचा वर्गात प्रवेश होत असे. तो मला कधीच चुकवावासा वाटत नसे. उंच एकशिवडी शरीरयष्टी, लवचिक, सपातळ चालताना, व्यासपीठावर चढताना, व्याख्यान देताना लपलपतेय अशी वाटणारी. चेहरा किंचित लांबोळा, गोरापान, डोक्यावर पातळ, कापलेले काळेभोर केस व त्यांचा आखून रेखून मधोमध पाडलेला नाजूक

भांग. नाक, डोळे, जिवणी, ओठ विलक्षण भावबाही. देखणा चेहरा. देखणं पण नाजुकसं वाटणारं व्यक्तिमत्त्व. अंगात सुती कापडाचा सावळचा रंगाचा सूट. (गळ्यात टाय असायची का? आठवत नाही. बहुधा नसावी.) चेहऱ्यावरचे भाव किंचित हसरे. पण बरेचसे खिन्न गूढ वाटणारे. प्रकाश छायेसारखे भासणारे. पुढे डॉ. अय्यंगार यानी एक-दोन शैलीच्या कविता शिकविल्या. मला डॉ. अय्यंगारांचं दर्शन शैलीसारखं वाटायचं. कवितेचं पुस्तक हातात घेऊन ते खुर्चीवरून उठायचे. (तत्पूर्वी हजेरी व्हायची) आणि टेबलासमोर येऊन किंचित टेबलाच्या कोपऱ्याला टेकून ते उभे राहायचे. सौम्य शांत पण लयदार स्वरात ते कविता वाचायचे. सगळा वर्ग मंत्रमुग्ध होऊन त्यांचं काव्यवाचन ऐकत असायचा. मग ढंगदार मुलायम शैलीत त्या कवितेवरचं भाष्य ते आम्हाला समजणाऱ्या संपन्न इंग्रजी भाषेत करावयाचे. स्वतःतच ते बोलता बोलता रंगून व हरवून जायचे, जणू आमच्यासमोर इंग्रजी कविता लिहिणारा आंग्ल कवीच मूर्तीमंत अवतीर्ण झालेला असायचा.

डॉक्टर अय्यंगारानीच आम्हाला पहिल्या (की दुसऱ्या) व्याख्यानात इंग्रजी भाषा कशी आत्मसात करायची याचं रहस्य खुलासेवार सांगितलं. इंग्रजी वाचा, इंग्रजी ऐका व इंग्रजी बोला. असा मंत्र त्यानी आम्हाला दिला. आम्ही पहिल्या कॉलेजवर्षाला प्रारंभीच कोणतं इंग्रजी वाचावं तेही त्यानी आम्हाला सांगितलं. ते म्हणाले, 'आपल्या कॉलेजची मॉंटफर्ड लायब्ररी आहे. त्या लायब्ररीचा पुरेपूर फायदा तुम्ही घ्या. प्रथम तुम्ही ग्रंथालयाकडे जाऊन मिळेल ती इंग्रजी रहस्यकथा त्याच्याकडून मागून घ्या आणि ती वाचायला लागा.' एडगर वॅलेस, कॉनन डायल याची नावे त्यानीच सांगितली. एडगर ॲलन, पो ही त्यानी वाचायला सांगितला. मला आठवतं मी त्याच दुपारी मॉंटफर्ड लायब्ररीत गेलो आणि एका इंग्रजी रहस्य कथेचं पुस्तक घेतलं. खाली तळमजल्याला वाचनालयात खिडकीकडची जागा पाहून मी ते पुस्तक आठवडाभरात वाचून काढलं. ती रहस्यकथा झपाटून टाकणारी होती. हळूहळू तिच्यातील पात्रे व घटना लक्षात आल्या. अडलेले नवे शब्द शब्दकोशातून जमतीलतसे व तितके मी समजून घेत होतो. पण बरंच काही इंग्रजी कळत नव्हतं. तरीही त्या कथेतील 'रहस्य' बुद्धीला वेड

लावीत होतं. आजही त्या कथेतील एक वाक्य (त्या कथेचा शेवट करणार) मी विसरलो नाही ' Revenge is a wild justice ' असं ते वाक्य होतं किती तरी वेळा माझ्या वर्गमित्राना फावल्या वेळात मी ती कथा सांगितली. आणखी नंतर इंग्रजी रहस्यकथा वाचण्याचा मला आजवरही न सुटणारा छंद लागला.

इंग्रजी वर्गात तर आम्ही ऐकतच होतो. पण कॉलेजजवळच ' रेक्स ' टॉकीज होतं आणि घराशेजारी ' ग्लोब ' टॉकीज होतं. त्यां एका वर्षात या दोन टॉकीजमध्ये आम्हाला अनेक दर्जेदार इंग्रजी चित्रपट पहायला मिळाले. ' ग्लोब ' टॉकीजचे मालकचालक हे माझ्या काकांचे स्नेही होते व त्यामुळे आम्हा मुलांना ' ग्लोब 'मधील कोणताही इंग्रजी चित्रपट केव्हाही फुकटच पहायला मिळत असे. ' गॉन विथ द विंड ', ' मेरी अँटयनेट ', ' प्राईड अँड प्रेजुडाईस ', ' विझा ऑफ ओझ ', ' गुडबाय मिस्टर चिप्स ' असे बोलपट तेव्हा मी ' ग्लोब 'मध्ये पाहिले तर ' रेक्स 'मध्ये लॉरेल हार्डीचे चित्रपट आम्ही पाहिले. आणि हळूहळू इंग्रजी बोलायलाही आम्ही लागलो. डॉ. अय्यंगारनी वर्षारंभीच दिलेला ' इंग्रजी भाषेच्या वशीकरणाचा ' ' फॉर्म्युला ' वर्षाअखेरीस बरेच यश आम्हाला देऊन गेला होता. ते डॉ. अय्यंगार फार मोठे लेखक व पंडित आहेत हे कॉलेजमध्येंच हळूहळू वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून कळले. लिटन स्ट्रॅचीवर त्यांनी इंग्रजीत लिहिलेला ग्रंथ मुद्दाम मॉंटफर्ड लायब्ररीत जाऊन पाहिला.

आपला तास संपला की, डॉ. अय्यंगार धिम्या लयीत मंद हळुवार पावले टाकीत वर्गाबाहेर जायचे. कधी बेळगावच्या रस्त्यात भेटले तर त्यांना आम्ही दुरूनच पहात असू. रस्त्याच्या डाव्या अंगाने थेट रस्त्याच्या कडेने ते चालायचे. त्यांची मान खाली लवलेली व दृष्टी आपल्या चालणाऱ्या पावलांकडे वळलेली असायची. ते आजूबाजूला कुठेही पहात नसत. आपल्या तंद्रीत व विचारात जपून पावले उचलीत चाललेले आम्हाला दिसत. कधी कधी ते लुंगी नेसत व त्यावेळी मग ते मद्रासी आहेत याची जाणीव होत असे. सबंध वर्षभरात एकदाच डॉ. अय्यंगार इंग्रजीच्या तासाला काळा झगा व डोक्यावर चौकोनी पसरट टोपी घालून वर्गात आले. आम्ही त्यांचं ते भारदस्त ध्यान पहातच राहिलो. तेव्हा ते म्हणाले, माझ्याकडे तुम्ही आश्च-

र्याने पाहू नका. कॉलेजमध्ये मुंबई राज्याचे पब्लीक इन्स्पेक्टर श्री. मूस (इंग्रज गृहस्थ) येणार आहेत असं आजच आम्हाला कळलं. कुठच्या तरी पेटीतले काळे डगले आम्ही भराभर बाहेर काढले. यू नो... ते आम्हाला मिस्किलपणे हसत म्हणाले, 'माझा झगा डॉ. नंदीमठनी घातला व मी नंदीमठांचा घातला...' एवढं बोलून ते थांबले व वर्गात एकच हशा पिकला.

जिराल्ड मॅनली हॉपकीनची एक कविता डॉ. अय्यंगारनी आम्हाला शिकवली व नव्या इंग्रजी कवितेचं वळण नीट आमच्या लक्षात आणून दिले. पुढे भविष्यकाळात तीन चार वर्षांनी माझ्या जीवनाच्या अत्यंत संघर्षमय व दुःखदायक काळात मी डॉ. अय्यंगारना (त्यावेळी ते तिरुपती विद्यापीठात होते) पत्र लिहिलं व माझी मनोव्यथा सांगितली. लगेच त्यांचं मला दीर्घ पत्र आलं. माझी 'ॲगनी' त्यांनी अचूक ओळखली होती. केवढा केवढा तरी धीर त्यांनी मला दिला व अंधारातून प्रकाशाकडे जाणारी वाट मला दाखवली. आजही ते पत्र माझ्या त्या वेळच्या दैनंदिनीत शब्दन् शब्द लिहिलेले (उतरून घेतलेले) टिकून राहिले आहे.

❊

वीस

लिंगराज कॉलेजमधील त्या वेळचे आणखी लक्षात राहिलेले प्राध्यापक म्हणजे आम्हाला 'जगाचा इतिहास शिकविणारे प्रा. श्रीकंठन्. डॉ. अयंगार आयुष्यात नंतर मला पुष्कळदा दुरून जवळून भेटले. पण लिंगराज कॉलेज सोडल्यानंतर आजतागायत प्रा. श्रीकंठन् मला कधीच भेटले नाहीत ते कुठे आहेत, काय करीत आहेत, काहीच कळलं नाही. त्यांचं पहिलंच व्याख्यान आजही जणू माझ्या कानात घुमून राहिलंय. 'इतिहास म्हणजे काय?' या विषयावर त्यानी आपलं व्याख्यान आम्हाला दिलं 'हिस्टरी इज हॉट

हिस्टरी ईज कोल्ड.' ही त्यांची वाक्ये इतिहासाचा विचार करीत असताना नेहमी माझ्या मनात उमटत असतात. डॉ. श्रीकंठन् फार उंच नव्हते व फार ठेंगूही नव्हते. अंगापिंडाने लठ्ठपणाकडे झुकणारे असे ते भरगच्च भरलेले होते. सूट अंगात असायचा. गोरटेला प्रसन्न हसतमुखी चेहरा. छाप पाडणारा. ते ठामपणे ढंगदार आक्रमक इंग्रजीत बोलायचे. पहिल्याच व्याख्यानाच्या वेळी त्यानी आम्हाला स्पष्टपणे सांगून टाकलं की लक्षपूर्वक तुम्ही माझी व्याख्याने ऐका व टिपणे घ्या. जगाच्या इतिहासावरची कोणती पुस्तके वाचायची ते त्यांनी सांगितले. पण कोणतेही इतिहासाचे महागडे इंग्रजी पुस्तक विकत घेऊ नका, असेही त्यांनी निक्षून सांगितले. आणि ते खरेच होते. पहिल्या त्यांच्या काही व्याख्यानातच आमची जगाच्या इतिहासाची भरघोस ओळख झाली. माझी दोनशे पानांची वही त्यांच्या व्याख्यानाच्या टिपणानी भरून जाऊ लागली शिवाय ते एक वेगळा व्यवसाय वहीत लिहायला देत असत व स्वतः तपाशीत असत. मला पुष्कळदा त्यानी A+ हा शेरा दिला तेव्हा मला झालेला आनंद विलक्षण होता. माझे मित्र माझी इतिहासाची वही मागून नेत असत. मला 'जगाचा इतिहास' हा विषय आवडला. आठ रुपयाचं जाडजूड पुस्तक मी विकत घेतलं होतं. जगाच्या इतिहासाचं. मी ते नंतर वाचू लागलो आणि आढळून आलं की प्रा. श्रीकंठन् जो जगाचा इतिहास आम्हाला शिकवीत (सर्व संस्कृती त्यानी आम्हाला धडाधड तोंडपाठ सांगितल्या) त्यापुढे हे पुस्तक तुटपुंजं होतं. म्हणून मी ते नवं कोरं पुस्तक घेऊन खडे बाजारातील बुकडेपोमध्ये गेलो. ज्या गृहस्थाकडून मी ते पुस्तक विकत घेतलं होतं ते खुर्चीवर बसले होते. मी त्यांना म्हटलं हे पुस्तक मला परत करायचं आहे. त्यांनी पुस्तक हातात घेतलं. पाने चाळली. माझ्याकडे पाहिलं. म्हणाले, निम्मी किंमत देईन. मी म्हटलं, पुस्तक तर जसंच्या तसं कोरं आहे. ते म्हणाले, पण पहिल्या पानावर तुम्ही तुमचं नाव घातलं आहे. मी मी काय बोलणार ? चार रुपये खिशात टाकीत व पुस्तक हातावेगळे करीत मी बाहेर पडलो. नंतर आठवतात ते म्हणजे मराठीचे प्रा. म. अ. करंदीकर. पुढे आयुष्यात दोन चारदा त्यांची भेट गाठ पडली. त्या काळात आम्ही काही विद्यार्थी सावरकरभक्त होतो व मराठी लिहिताना

सावरकर लिपीत आम्ही लिहीत होतो. सहामाही परीक्षेत मी सावरकरी लिपीत लिहिले म्हणून प्रा. करंदीकरांनी माझे गुण कमी केले होते. वर्गात उत्तरपत्रिका वाटताना त्यानी तसे जाहीरपणे बोलूनही दाखविले होते. एकदा मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करायला कॉलेजमध्ये नरसिंह चिंतामण केळकर आले होते. त्यांची पगडी व भारदस्त बोलणं खोल लक्षात राहिलंय. अश्लीलता म्हणजे काय ? या विषयावर ते बोलले होते. मी माझ्या स्वाक्षरी पुस्तकात त्यांची सही घेतली तेव्हा ' यतो धर्मः ततो जयः' हा संदेशही त्यानी लिहून त्या खाली आपली डौलदार सही केली होती. ते स्वाक्षरी पुस्तक आजही माझ्याजवळ टिकून आहे.

हळूहळू माझ्या वर्गात मला जवळचे मित्र मिळाले. फार नाहीत. एक होते म्हणजे रमाकांत साळगांवकर. त्यांची व माझी मैत्री आजही उत्कट अशी चालू आहे. नंतर ते पोलीस अधिकारी झाले व गेल्या वर्षी निवृत्तही झाले. हा माझा मित्र लाघवी, प्रेमळ व व्यवहारचतुर होता. देखणा. भरदार व्यक्तिमत्त्व असलेला. एन. सी. सी. चा तो आमचा नेता होता. रुबाबदार दिसायचा. त्याच्या खिशातही पैसे असायचे. त्याचे काका गोंधळी गल्लीत रहायचे. तेही अधिकारी होते. मोठे शिस्तप्रिय व करडे, एकदा सहामाही परीक्षेत आम्ही उत्तर पत्रिकेला जोडायला देतात ती ' सप्लीमेंटस ' खूपशी चोरून साळगांवकरांच्या घरी आणली. छानदार जाडजूड आखीव कागद होते ते. मी मोजू लागलो तर त्यात मराठी विषयाच्या दोन प्रश्नांची उत्तरे लिहिलेले कागदही त्यामधून आले होते. आमचं बोलणं रमाकांतच्या काकानी ऐकलं आणि त्यानी आमची चांगली हजेरी घेतली. म्हणाले, आता असाच कॉलेजमध्ये जा आणि प्रिन्सिपॉलना भेटून आपला गुन्हा कबूल कर. त्यांना ते प्रश्नोत्तराचे कागद मराठी विषयाच्या उत्तर पत्रिकेत घालण्याची विनंती कर. पळ. पळ. सकाळची वेळ होती. आम्ही अर्धापाऊण तास अगोदरच उत्तर पत्रिका देऊन आलो होतो. दोन प्रश्नांची उत्तरे म्हणजे चांगलेच गुण कमी होणार होते. तसाच धावत पळत कॉलेजमध्ये गेलो. तळालाच मॉटफर्ड ग्रंथालयाजवळ डॉ. नंदीमठांची कचेरी होती. दार उघडून मी कसाबसा त्यांच्या पुढ्यात उभा राहिलो. खुर्चीत बसून समोरच्या टेबलावर ते लिहीत होते. माझ्याकडे करड्या नजरेने

यानी पाहिलं. भीतभीत चाचरत कापत माझा गुन्हा त्याना सांगितला. पळवून नेलेले कागद त्यांच्या टेबलावर ठेवले. उत्तराचे कागदही टेबलावर ठेवले. क्षणभर डॉ. नंदीमठ काहीच बोलले नाहीत. मग कठोर आवाजात म्हणाले, हीच संस्कृती तू कॉलेजमध्ये येऊन शिकलास काय ? ते इंग्रजीत बोलत होते. ते म्हणाले, घराकडून उत्तरे लिहून तर तू आणली नाहीस ना ? मलाही बनविण्याचा तुझा डाव दिसतोय. माझा तुझ्यावर विश्वास नाही, माझे कागद तर प्रिन्सिपॉलनी जप्त केले व. पण मला तिथेच तावडतोब एक रुपया दंड केला व आपण उठेपर्यंत आपल्या खोलीत एका कोपऱ्यात मला उभे करून ठेवले. नंतर एक चकार शब्दही ते माझ्याशी बोलले नाहीत. दुसरा वर्गातला मित्र होता तो म्हणजे नाथ पै. पै ठळकवाडीहून कॉलेजात यायचा. ग्लोब टॉकीजकडे आमची नेहमी गाठ पडायची. मी त्या काळात हाडकुळा व किरकोळ देहाचा होतो. तसाच पैही होता. एक साधारणसा सुती कोट, लेंगा, पयरण त्याच्या अंगात असायची. त्याच्या डोळ्यावर चष्मा व हातात नेहमी जाडजूड पुस्तके असायची. मी, साळगांवकर, पै असे आमचे त्रिकूट ' कॅफे लाईट 'मध्ये चहा व म्हैसूरपाक खात बोलत बसे. कॉलेजमध्ये होणाऱ्या वादविवादामध्ये नाथ पै हिरीरीने भाग घ्यायचा. सगळी डिबेटस् इंग्रजीत होत असत. नाथ आपले भाषण अगोदरच लिहून काढायचा. प्राध्यापकाना भेटून ते तपासून घ्यायचा. नंतर तोंडपाठ करून आम्हा मित्रांसमोर त्याची तालीम करायचा. संध्याकाळचे रेसकोर्सच्या दिशेने कधी आम्ही फिरायला गेलो तर निवांत जागी बसून नाथचे पुढील आठवड्यात' होणारे भाषण आम्ही आधी ऐकत असू. एकदा Home is the only place for women हा वादविवाद कॉलेजमध्ये फार रंगला होता. एका तरतरीत धीट विद्यार्थिनीने पुरुषवर्गावर चांगलाच हल्ला चढवला होता. आणि शेकडो विद्यार्थी तो वादविवाद ऐकत होते. सगळे प्राध्यापकही होते. कुणीतरी बोलणाऱ्या त्या विद्यार्थिनीच्या अंगावर पेपर बॉल मारला लगेच तिच्या बाजूनी पेपरबॉल फेकले गेले. पुढे ती मुलगी कॉलेजमध्ये ' पेपरबॉल ' या नावानेच ओळखली गेली. मुंबईहून त्यावेळी ' आशा ' नावाचे साप्ताहिक निघायचे. कॉलेजच्या वाचनालयात ते यायचे. त्या साप्ताहिकात ' कॉलेजजगत् ' म्हणून एक विभाग असायचा. निरनिराळ्या कॉलेजमधील

मजेदार वृत्त त्यात असायचे. त्या दिवशी मीही 'पेपरबॉल'चं ते वृत्त लिहून (मिस्कीलपणे) आशाला पाठवलं. निनावी. दुसऱ्या आठवडचात 'आशा' उघडून पाहिलं तर ते वृत्त आलं होतं. पुढे वर्षभर मीच 'आशा'ला लिंगराज कॉलेज वृत्त पाठवीत होतो. कॉलेजच्या खूप गंमती जंमती त्यात यायच्या. काही उडाणटप्पूंचा त्यात खास उल्लेख असायचा. नियतकालिकातील माझे पहिले स्तंभलेखन लिंगराज कॉलेजमध्ये विद्यार्थी असतानाच मी लिहिले. ते कॉलेजमध्ये तेव्हा फार गाजले.

आठवणींची बकुळफुले हुंगताना मी आता खूप मागेमागे म्हणजे अगदी बालपणात जायचं ठरवलंय आणि मध्यंतरीचा दीर्घकाळ पडलेला लेखन-खंड साधण्याचा पुनः प्रयत्न करतोय. अगदी माझं लहानातील लहानपण मला आठवतं ते म्हणजे पुणे शहरातील. म्हणजे मी त्यावेळी चारपाच वर्षांचा होतो. माझे वडील पुणे येथे सरकारी नोकरी करीत होते. आम्ही (नंतर आईवडिलांकडून कळलं) नारायण पेठेत एका एकमजली घरात रहात होतो ते मला पक्कं आठवतं. आम्ही वर माडीवर रहात होतो आणि आमच्या खाली एक मारवाड्याचं भुसारी दुकान होतं. त्या दुकानाला वळसा घालून माडीवर येण्यासाठी जिना चढावा लागे. हा जिना दगडी होता. जिना संपला की आमच्या घराचं दार बंद किंवा उघडं समोर यायचं. जिना चिंचोळा. अरुंद. आमच्या वरच्या घराला समोरून गच्ची होती व गच्चीसमोर एक पत्र्याचं छप्पर उतरत रस्त्यापर्यंत पसरलेलं होतं. पण रस्ता जरा पुढं होता व अलिकडे मारवाड्याच्या दुकानासमोरचं अंगण होतं. मारवाडी व मारवाडीण दुकानाच्या मागं आमच्याच इमारतीत बिऱ्हाड करून रहात असत. गच्चीसमोरचा छप्पराचा पत्रा नागमोडी वळणा वळणाचा होता. या गच्चीत माझी बालजीवनातील मित्रमंडळी जमायची. मला माझा बालमित्र नारायण आठवतो. तो समोरच रस्त्यापलिकडे रहायचा. त्याचे वडील शिपीकाम करायचे. मला आता नीट आठवत नाही पण पुण्यातील एका नगरपालिकेच्या शाळेत मी बिगरी व पहिलीची दोन वर्षं शिकत होतो. त्या शाळेचा सभोवार असलेला दुहेरी लोखंडी कठडा मला स्पष्टपणे आठवतो. आमचा वर्ग त्या कठड्याच्या जवळपास होता. कठड्याच्या आतून कोपऱ्यावर शाळेच्या

आवारात एक उंच पिंपळाचे झाड वाढलेले होते. त्या पिंपळाची हालती पानं त्या बालवयातही माझ्या मनाला मोहून टाकीत. त्या पिंपळाच्या सखलवटीत दगडांचा बांधलेला पार होता. त्या पारावर एक पेरूवाली बाई हिरव्या रंगाचं लुगडं नेसून (पदर डोक्यावर घेतलेली) व समोर पेरू, भाजलेल्या शेंगा, रेवडी आणि असेच काही खाण्याचे जिन्नस ठेवून बसायची. शाळा सुटली किंवा मधली सुटी झाली की आम्ही पोरं धावत पळत त्या बाई-जवळ जायचो. माझ्या चड्डीच्या खिशात आईनं ठेवलेला पैसा किंवा ढब्बू पैसा असायचा. कधी कधी नसायचादेखील. पण ती पेरूवाली मला हटकून एखादा पेरू द्यायची किंवा माझ्या चड्डीच्या किंवा पयरणीच्या खिशात शेंगा टाकायची. मी शेंगा खात खात मग चालत घरी यायचो. म्हणजे तशी आमच्या घरापासून ती शाळा जवळच असली पाहिजे. रस्त्यातून येताना एका वाटेवर गुलमोहोरांची झाडं भेटायची. त्यांच्यावर गुलमोहराची फुलं चौफेर झुबक्या झुबक्याने फुललेली असायची. मग आम्ही मुले खाली पडलेल्या लालबुंद फुलांच्या सडयातून फुलं उचलून एकमेकाच्या फुलांबरोबर 'कोंबडा कोंबडीचा' चा खेळ खेळत असू. रस्त्यात शिवाय वैदू लोक पुकारा करीत जात असलेले दिसायचे. पुष्कळदा आमच्या अगदी जवळून जायचे. त्यांची मला भीती न वाटता गंमत वाटायची. डोक्यावर उंच टोकदार टोपी. मला वाटते रंगीत. पाठीपोटाला त्यांच्या पोटापेक्षाही मोठी असलेली झोळी. पायांना घट्ट बसणारी तंग तुमान. पायात टोकाला टोकदारपणे वाकलेले लाल रंगाचे पुणेरी जोडे आणि दुडदुडत उडचा मारीत चालण्याची त्यांची गमतीची चाल.

मला त्यावेळचं बिगरी पहिलीत जाणारं माझं ध्यान आठवतं. एक चड्डी, सदरा, चड्डीच्या बाहेर येणारा, अंगात कोट व डोक्यावर काळी टोपी हातातं लाकडी चौकट असलेली. दगडी पाटी आणि अंकलिपीसारखं छोटं पुस्तक. वर्गात आम्ही सगळेच खाली फरशीच्या जमिनीवर (जाजम टाकलेला मला वाटतं) चौकोनी चार भिंतीना टेकून व मांडी वालून बसत असू. मला त्यावेळचे आमचे एक शिक्षक आजही जसेच्या तसे आठवतात. त्यांचं नांवही आठवते. ते होते आमचे चंद्रचूड मास्तर. ('चंद्रचुड' या शद्वामुळे ते माझ्या लक्षात राहिलेत की काय कुणाला ठाऊक !) ते वर्गात कोपऱ्यातील एका

खुर्चीवर बसायचे त्यांच्यासमोर चार खुरांचं लाकडी टेबल असायचं. ते लांब गळाबंद कोट घालायचे. त्या कोटावर बटबटीत काळीभोर वटणं गळचापासून पायापर्यंत असायची खाली स्वच्छ शुभ्र धोतर पायात पुणेरी वहाणां. डोक्यावर पुणेरी पगडी. पण हरदासी पद्धतीची नव्हे. डोळ्यावर चष्मा. गोरेपान व उंच. चंद्रचड मास्तर गोड व प्रेमळ बोलायचे. एकदादेखील चुकून कधी मला त्यानी मारल्याचं मला आठवत नाही. ते आम्हाला गणित, मराठी, पाढे आणि काही काही शिकवायचे. ते वर्गात आम्हाला सचित्र गोष्टी सांगायचे. आमच्याकडून समूह गाणी म्हणून घ्यायचे. त्यानी एक गाणं साभिनय शिकवलं होतं. ते आठवलं की मी अलगद लहान लहान होत पुनः मी चंद्रचूडसरांच्या बिगरींच्या वर्गात जाऊन बसलो. ते गाणं होतं...

कावळा म्हणे तो काळा
पांढरा शुभ्र तो बगळा
मग (कावळचाने) पैशाचा साबू आणूनी...

इथपर्यंतच्या ओळी मला आठवतात. मधून मधून मी त्या गुण गुणतो. नंतर त्यानी ' मुंगी कबूतरा 'ची सांगितलेली गोष्ट आठवते. त्यानी प्रथम आम्हाला एक मोठं चित्रकारानं काढलेलं चित्र दाखवलं. त्याचित्रात तलावाकाठी उभं असलेलं झाड होतं. झाडावर कबूतर बसलं होतं. खाली पाण्यात तरंगणाऱ्या झाडाच्या पानावर मुंगी बसलेली होती. आणि बंदुकीने नेम मारणारा शिकारी वगैरे... चंद्रचूडसरांनी आम्हाला ती गोष्ट इतकी रंगवून सांगितली होती की आम्ही सगळे बालबच्चे गुंग होऊन गेलो होतो. तेव्हापासून मुंगी व कबूतर या दोन प्राण्यांबद्दल माझ्या मनात जो आदरभाव निर्माण झाला तो आजतागायत टिकून आहे. पण एकदा गंमतच झाली. वार्षिक परीक्षा जवळ आली. नंतर परीक्षा झालीसुद्धा. आम्हाला वर्गात बसवून चंद्रचूडसरांनी शब्द घातले, गणिते घातली. मला वाटते बेरीज वजाबाकी. माझा आणि गणिताचा का कुणाला ठाऊक बालपणापासूनच छत्तीसाचा आकडा. माझीच सगळीच गणितं चुकली असावीत. मला त्या वयात ' परीक्षा ' म्हणून ' परीक्षे 'ची काहीच कल्पना नव्हती. पण मग एका सकाळी रिझल्ट ऐकायला आम्ही सगळी मुलं वर्गात जमलो. आमच्या

शाळेत मुली नव्हत्या. माझं नाव पुकारल्यावर मी चंद्रचूडसरांच्या टेबलाकडे गेलो. त्यानी माझ्या हातात दोन जाडजूड पानाचं प्रगती पत्रक दिलं. त्याच्या दुसऱ्या पानावर 'पास' 'नापास' लिहिलं होतं. 'नापास' हा शब्द तेवढा लाल शाईत ठळक लिहिला होता. माझ्या हातातील पत्रकात 'लालशब्द' होता नापास ! मी ते पाहून हसलो रडलो काही मला आठवत नाही. पण घरी येऊन पोहोचण्यापूर्वी एका गुलमोहोराच्या झाडाखाली थांबून व बोटाला थुंकी लावून मी 'नापास' मधला 'ना' खोडून टाकला. आणि घरी आल्यावर बिनधास्त वडिलांच्या हातात गुणपत्रक ठेवलं. त्यांनी लगेच ओरडून आईला माझा प्रताप सांगितला. पण कुणीही माझ्यावर रागावलं मात्र नाहीत. उलट वडिलांनी ते माझं प्रगतीपत्रक जपून ठेवलं. इतकं की काही वर्षापूर्वी माझे वडील दिवंगत झाल्यावर त्यांच्या खोलीत त्यांची पेटी पहात असता त्या पेटीच्या तळाशी ते पत्रक सुखरूप ठेवलेलं मला मिळालं. त्यावेळी वयाची पन्नाशी मी ओलांडली होती.

❊

एकवीस

पुण्यात लहानपणी बिगरीच्या दिवसात आमच्या माडीवर दुपारचे माझे बालमित्र गोळा व्हायचे. म्हणजे आम्ही सगळे तसे नागडेउघडेच असायचो. घरात चुलीकडे आई कामात तरी असायची किंवा शेजारणीकडे पलिकडच्या घरात गेलेली असायची. वडील ऑफिसात. 'ऑफिस' हा शब्द बालपणापासूनच कानावर सतत पडत आलेला व मनात खोल रुजलेला. आम्ही बालमंडळी गच्चीत जमायची. गच्चीत जायचं दार बंद उघडं ठेवायची. गच्चीला लागून आतून एक मोठी खोली होती. तिला लागून आत दुसरी एक छोटी खोली व तिला जोडलेलं स्वयंपाक घर. त्या स्वयं-

पाकघराला एक छोटा गच्चीचा तुकडा. तिथून खाली पाहिलं की दगडी फरशांचा चौक दिसायचा. त्या चौकाभोवती तीन–चार घरं आडवी तिडवी उभी. गच्चीत आम्ही मुलं जमलो की तुटक्या फुटक्या बांगडीच्या रंगीबेरंगी काचा जमवलेल्या एकमेकाला दाखवायचे. नारायण मग म्हणायचा, 'चला, मी तुम्हाला सिनेमा दाखवतो. ' ऑफिस 'सारखा ' सिनेमा' हा शब्ददेखील मनात घट्ट रुजलेला.तर नारायण हाताची सैल मूठ आमच्या डोळ्यासमोर धरायचा. हातांच्या बोटात तो एक तुटकी बांगडीची काच ठेवायचा. त्या काचेचं एक तुटकं सपाट टोक आत मुठीत रंगीतपणानं दिसायचं. मग नारायण आम्हाला म्हणायचा, त्या काचेकडे एकटक पहात रहा. गंमतच वाटायची. मूठभर सगळा काळोख. आतून व तिथं फक्त एक रंगाचा ठिपका दिसायचा. ते दृश्य अद्‌भुत वाटायचं. मग नारायण म्हणायचा, हे दिसतंय ना? ते दिसतंय ना? त्या रंगाच्या ठिपक्याखेरीज काही दिसायचं नाही पण आम्ही आपले सगळे हुं! हुं!' म्हणायचो. एके दिवशी नारायण म्हणाला, चला तुम्हाला खराच हालता चालता सिनेमा दाखवतो. आम्ही सिनेमा पहायला आत खोलीत बसलो. दुपारची वेळ होती. खोलीची दारे खिडक्या नारायणानं सर्व बंद करून घेतली. खोलीत सिनेमासारखा काळोख झाला. आईवडिलांबरोबर थिएटरात सिनेमा पहायला गेलो होतो. म्हणजे ही १९२६, २७ २८ सालची गोष्ट आहे. त्यावेळी सिनेमा मुका होता. पडद्यावर माणसांच्या. जनावरांच्या, गाडी घोडयांच्या हालचाली व्हायच्या. तर एक दृश्य आईच्या कुशीत बसून घनदाट अंधारात पाहिलेलं नीटपणे आठवतं. एक छान गोड प्रेमळ दिसणारी बाई असते. एक आडदांड रानवट पुरुष हातात पिस्तूल घेऊन येतो. तिला गोळी घालतो. तिच्या छातीतून भळाभळा रक्त वहाते. अर्धवट तिचे हसरे डोळे मिटतात व ती खाली कोसळते. तर खराखुरा हालता सिनेमा पहायला, मिळणार म्हणून आम्ही सगळी पोरं भितीकडे तोंड करून गुपचूप बसलो. भित पांढऱ्या रंगाची होती. नारायण एकटा गच्चीत गेला. तत्पूर्वी त्यानं आमच्याकडून एक एक दगडी पेन्सिलीचा तुकडा गोळा केला होता. नारायणनं गच्चीच्या दाराची फटी एवढी जागा उघडी ठेवली होती. काय आश्चर्य! त्या फटीतून काळोख्या खोलीत पांढऱ्या भितीवर एक विचित्रसा छाया-प्रकाशाचा खेळ सुरु झाला. नारायण गच्चीत पुढेमागं जाऊ लागला की

पुढे मागेजाणारी त्याची सावली थेट भितीवर पडायची. एक जत्रेत विकत घेतलेली व फटफट आवाज करणारी छोटी बैलगाडी नारायण गच्चीत फिरवायचा आणि तिची ती मजेदार हालचाल भितीवर उमटायची. गच्चीबाहेर पलिकडे रस्त्याच्या कडेला उभी असलेली हिरवी पिवळी झाडे वाऱ्याने सळसळायची. तर त्या झाडांच्या सावल्याही भितीवर हालत रहायच्या.

❋

बावीस

एकदा दुपारी सगळी पोरं आम्ही गच्चीत कठड्याला टेकून उभी होतो. त्यापैकी मी तर संपूर्ण नागडाच उभा होतो. कशी काय मला हुक्की आली कुणाला ठाऊक ! मी सरळ कठड्याच्या लोखंडी फटीतून खाली पऱ्यावर मुतून दिलं. पन्हाळातून जावं तसं मुताचं पाणी पऱ्यावरून नागमोडी घसरत खाली जाऊन थेट मारवाड्याच्या दारात टपकलं. माझा तो उत्साह पाहून इतर बालकानीही माझं अनुकरण सुरू केलं. आम्ही जिन्याच्या दाराला आतून कडी घातली नव्हती. आमची सगळ्यांची चाललेली बाललीला पहात आम्ही मजेत गच्चीत उभे होतो. आणि धाडकन् कुणीतरी आमच्या मागचं दार उघडलं. मागं वळून आम्ही पाहतो तर खालची उंच, धिप्पाड, रागीट मारवाडीण बाई आमच्यासमोर उभी. तिने कमरेभोवती घातलेला अघळपघळ घागरा खाली जमिनीवर लोळत होता. तिची छाती जाडजूड रुंद होती. तिचे दोन्ही हात टणक मुसळासारखे होते. दोन्ही हातात कोपरापर्यंत बांगड्याच बांगड्या होत्या. डोक्यावरून तिनं ओढणी घेतली होती. ती काय बोलली, काय ओरडली क्षणभर आम्हा पोरांना काहीच कळलं नाही. तिचा तो भयानक अवतार पाहून आम्हाला

परत मुतायला झालं एवढं मात्र खरं. एकदम एक पाऊल दाणकन् पुढं टाकून सगळ्या पोरांतून तिनं मलाच आपल्या दोन्ही हातानी घट्ट पकडलं व आपल्याकडे आडदांडपणे खेचलं. आणि सपासप आपल्या दोन्ही हातानी माझ्या दोन्ही गालावर ती थापटे मारू लागली. एक एक थापट अशी बसायची की मी कळवळून ओरडायचो. रडायचो. वर खाली उडचा मारायचो. पण तिची पकड घट्ट असायची. मग माझ्या दोन्ही कुल्यांवर तिनं थापटे मारायला सुरुवात केली. मी कळवळतोय. रडतोय. ओरडतोय. पण त्या महामायेला काही माझी दया आली नाही. इतक्यात भीतीनं की रागानं कुणाला ठाऊक मला पुनः जोराजोरानं मुतायला झालं आणि चुकवून सरळ रेषेत त्या मारवाडणीच्या अंगावरच मी मुतून दिलं. अरे बापरे ! आता काही माझी धडगत नव्हती. ती आपल्या मारवाडी भाषेत जोरजोरानं ओरडू लागली. दोन्ही पाय आपटून थैमान घालू लागली. तिच्या पायात तोडे की काय होते. त्याचा आवाज होऊ लागला. मला काहीच कळेना. माझी आई शेजारी गेली होती. पण माझ्या किंकाळ्या ऐकून की काय ती धावत जिना चढून वर आली. माझी ती केविलवाणी दशा व मारवाडणीचा तो भुतावतार पाहून ती दारातच थबकली. पण मग चटकन् पुढं होऊन तिनं मला मारवाडणीच्या हातातून हिसकून आपल्याकडे ओढलं. आपल्या पदरानं माझं तोंड व अंग पुसलं. मी पहातो तर बाकीची पोरं केव्हाच गुल् झाली होती. मग आईचं व मारडणीचं काय बोलणं झालं मला काही समजलं नव्हतं. पण ती मारवाडीण आजही मला आठवते. इतकंच नव्हे तर ती कधी कधी लहानपणी तिच्या हातून मार खाताना मी जशी तिला पाहिली होती, तशीच स्वप्नात येते आणि मी दचकून जागा होतो. क्षणभर मग मला माझं गेलेलं बालपण आठवतं. एक अनावर व अनामिक हुरहूर उगीचंच माझा छळ मांडते. पुनः लहान व्हावं, पुनः एकदा त्या मारवाडणीच्या राकट हातांचा मार खावा. मग माझ्या आईनं धावत यावं नि मला आपल्या कुशीत घ्यावं असं उतावीळपणे वाटू लागतं. पण त्या माराच्या कडवट आठवणीतही एक गोड गोड आठवण हळूच डोकं वर काढतं, आणि ती मारवाडीण (नक्कीच त्या काळात ती आपल्या तारुण्यात व जवानीत होती) माझ्या मनाचं घर

अस्ताव्यस्त व अक्राळविक्राळ व्यापीत पुनः माझ्या स्मृतीत वस्तीला येते. ती गोड आठवण म्हणजे मी माझ्या आईच्या कुशीत पलंगावर आईच्या हळूवार हाताने आंजरला गोंजारला जात होतो. आणि तितक्यात तीच मारवाडीण पुनः तशीच वर आली होती. मी घाबरून तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं. पण माझी भीती दूर पळाली. माझ्या आईच्या चेहऱ्यासारखाच तिचा चेहरा मला हसरा, प्रेमळ व लाघवी भासत होता. ती पटकन वाकली आणि आईच्या कुशीतून तिनं मला आपल्या कुशीत ओढून घेतलं. माझ्या गालाचे पापे घेतले. आणि हळूच माझ्या हातात गोड गोड जरदाळू व खारकांची कागदी पुडी ठेवून ती निघून गेली.

❋

तेवीस

पुण्यात बिगरीच्या दिवसात लहानपणी मी चोर पाहिला. मध्यरात्री प्रत्यक्ष आमच्या घरात शिरुन चोरी करताना मी त्याला पाहिला. ती रात्र मी अजूनही विसरलेलो नाही. आम्ही माडीवर रहात होतो. तर जिन्यातून आल्यावर घरांत प्रवेशद्वार होतं प्रवेशद्वारातून ज्या खोलीत पाऊल पडे तीच आमची झोपायचीदेखील खोली होती. तिलाच लागून गच्ची होती. एक गच्ची लांब व मोठी होती. तर त्याच खोलीच्या दुसऱ्या बाजूला एक छोटी गच्ची होती. म्हणजे गॅलरीच. तिला लोखंडी दाडयांचा कठडा होता. सहसा त्या कठड्यातून गच्चीत उभा राहून मी खालचं रस्त्यातलं जग पहात असे. त्या गॅलरीत जायला एक दार होतं. मोठ्या गच्चीत जायला दुसरं दार होतं. तर ती दारं बंद करुन रात्री आम्ही मंडळी त्या खोलीत झोपत होतो. झोपण्याच्या दोन खाटा होत्या, त्या खाटाना मच्छरदाणी जोडली जात असे. झोप लागेपर्यंत आईच्या कुशीत झोपत (माझ्या आणखी दोन भावंडाबरोबर) मी

मच्छरदाणीतून टकमक पहात जागा असे. खोलीच्या मधोमध एक लाकडी छोटचा स्टुलावर अर्धपेटता कंदील ठेवलेला असे व दुसऱ्या स्टुलावर पाण्याचा तांब्या व त्याबर फुलपात्र ठेवलेलं असे. वडील एका खाटेवर मच्छरदाणीत झोपायचे. त्या रात्री अशीच केव्हांतरी आम्हा सर्वांना गाढ झोप लागली असावी आणि धाडकन् स्टुल व पाण्याचा तांब्या खाली जमिनीवर पडल्याचा आवाज झाला. त्या आवाजानं सर्वांनाच जाग आली. पण मी मात्र भलताच जागा झालो आणि टकमका मच्छरदाणीतून बाहेर पाहू लागलो. दुसऱ्या स्टुलावर कंदील मंदपणे पेटत होता. एका अनोळखी माणसाची आकृती खोलीत वावरताना मी टक लावून पाहिलं. इतक्यात आईने हळूच एका हातानं मला आपल्याजवळ ओढलं आणि मला ती थोरटू लागली. पण काही बोलली नाही. वडिलांनाही जाग आली होती. त्या काळात वडील एक निळसर रंगाचा कोट अंगात घालीत ते मला पक्कं आठवत. तो कोट समोरच भितीवर खुंटीला टांगलेला होता. ती अनोळखी आकृती त्या कोटाजवळ गेलेली व काही हालचाल करीत असलेली मी पहात होतो. किलकिल्या मांजरचोर डोळ्यांनी इतक्यात काहीतरी गडबड झाली. वडील जोरजोरानं खाकरले आणि त्या अनोळखी इसमाची एकच धांदल उडाली. वडिलांचा कोट तसाच आपल्या अंगावर टाकून त्या चोराने छोटचा गॅलरीचं दार उघडल आणि लोखंडी कठड्यावरून खाली रस्त्यावर उडी टाकली. तोपर्यंत वडील उठले होते व त्यानी 'चोर' 'चोर' म्हणून शेजाऱ्यापाजाऱ्याना हाका मारल्या होत्या. पुढे काय झालं मला आठवत नाही. पण दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या घरी पोलीस आले होते. मला वाटतं त्या काळात पोलीस निळा गडद गणवेष घालीत असावेत. एका इसमाला त्यानी मुसक्याना दोऱ्या बांधून आणला होता. तो चालताना लंगडत होता. पोलिसांच्या एका हातात वडिलांचा निळा कोट होता. म्हणजे मी चोर व पोलीस यांना माझ्या बालजीवनात प्रथमच एकाचवेळी पहात होतो. मग त्या चोराभोवती मोठी मंडळी जमली होती. काळसर देहाचा ठेंगूसा असा तो चोर होता. त्याच्या कमरेला एक मळकट पंचा गुंडाळलेला होता. बाकी त्याचा सगळा देह उघडाबंब होता त्याचा चेहरा रडवेला वाटत होता. डोक्यावर त्याच्या काळेभोर लांबसडक केस होते. पुढं काय झालं तेही त्या बालजीवनात मला कळलं नाही. 'झोप, झोप

नाहीतर चोर येईल हां ' असं आई मग खूप दिवस म्हणायची. पण मला मात्र त्या चोराबद्दलच त्या वेळीही विलक्षण कणव व आपुलकी वाटत होती. एवढं आजही जाणवतं. पोलिसांची मात्र भीती वाटत होती.

पुण्यातील लहानपणाची आणखी एक आठवण म्हणजे मी एकदा पैसा गिळला होता तो. वसंत नावाचा आमच्या नात्यातलाच माझ्यापेक्षा वयानं थोडा मोठा असा माझा बालमित्र अधून मधून आमच्या घरी त्याच्या आई-बरोबर खेळायला यायचा (आजही आम्ही दोघे एकमेकांचे जिवाभावाचे स्नेहसंबंध राखून ठेवले आहेत) तर संध्याकाळची वेळ होती. आम्ही मुलं गच्चीत खेळत होतो. पहिल्यांदा आम्ही गोट्यांचा खेळ खेळलो. त्यावेळी गोट्या मला खूप आवडायच्या विशेषत: पांढऱ्या रंगाची दगडीवाटोळी गोटी व तिच्यावर आखलेल्या लाल रेषा अशी गोटी असली तर ती गोटी मला जादूचीच गोटी वाटायची. त्या काळात आमच्या घरात एक जादूची आंगठी होती. त्या आंगठीच्या खडचात वेगवेगळचा अंगानी पाहिलं की राम, लक्ष्मण सीता, हनुमान दिसायचे आणि घरात खिडक्याना व आतल्या दाराना काचेच्या लांब रंगीत नळ्यांची व मण्यांची लोंबणारी तोरणे बांधलेली असत. तर आम्ही गच्चीत खेळता खेळता वसंताने आपल्या खिशातून राणीछापाचा एक तांब्याचा पैसा अलगद माझ्या हातावर ठेवला. मला तो पैसा इतका आवडला की मी तो माझ्या मुठीत घट्ट आवळून धरला. वसंतानं तो पैसा परत मागितला. तेव्हा तर गपकन तो पैसा मी माझ्या तोंडात दाताखाली घट्ट धरून ठेवला आणि मग माझ्याकडून तो काढून घेण्यासाठी वसंतानं माझ्या अंगाशी झटपट केली. तेव्हा दोन्ही ओठ घट्ट दाबून मी तो पैसा तोंडातच पुढं सरकवला. झपकन् तो माझ्या गळचातून माझ्या पोटातच गेला. वडीलमंडळी मधल्या खोलीत बसून गप्पागोष्टी करीत होती. तितक्यात वसंत धावतच घरात गेला आणि ओरडला, ' प्रभाकरनं पैसा गिळला ' झालं, घरात ही सर्वांची धांदल ! गडबड बडबड ! गोंधळ ! धावपळ. वसंतच्या आईनं व माझ्या वडिलांनी मी पैसा ओकावा म्हणून खूप प्रयत्न केले. मग ठरलं की लगेच मला इस्पितळात घेऊन जावे. मला ती संध्याकाळ अनेकदा आठवते. दारात आलेला टांगा. त्या टांग्यात मधोमध मला घट्ट धरून बसलेली वसंताची आई व माझे

वडील. मग एका इस्पितळात झालेला आमचा प्रवेश. ते सलून इस्पितळच असलं पाहिजे असे मला वाटतं. मग मला एवढंही आठवतं की संपूर्ण नागडा असा मी एका काळोख्या खोलीत एका बिछान्यावर पडलो होतो आणि कुठल्यातरी भयानक यंत्रातून माझ्या पोटावर कसला तरी प्रकाश टाकला जात होता. मग मला पुनः अंगात कपडे घालून टांग्यातून घरी नेण्यात आलं. घरी गेल्याबरोबरच वडिलांनी निळचा लांब मानेच्या बाटलीतलं एरंडेल तेल माझं नाक एका हातानं दाबून दुसऱ्या हातानं माझ्या तोंडात ओतलं होतं. मग रात्रभर वडील गच्चीत तस्त ठेवून मला शौचाला बसवीत होते. पण पैसा काही पडत नव्हता. कधी तरी रात्री मला झोप लागली असावी. पण पहाटेच मी पोटात मुरडा येऊन जागा झालो आणि गच्चीत शौचाला पळालो. वडील जागे होतेच. त्यांनी तस्तात मला बसवले. आणि मग आनंदानं वडील कसे आईला हाका मारीत होते ते मला आजही आठवतं. माझ्या पोटातला पैसा तस्तात पडला होता. माझ्या बिगरीतील प्रगती-पत्रकाप्रमाणंच माझ्या वडिलांनी आपल्या लाकडी पेटीत जपून ठेवलेला तो गुळगुळीत तांब्याचा पैसा आजही माझ्याजवळ शाबूत आहे.

❋

चोवीस

मी सहा वर्षाचा होतो तेव्हा माझ्या वडिलांनी पुणे शहर सोडलं आणि आम्ही सगळी मंडळी पुनः कोकणात आमच्या नेरूर गावी मुक्कामाला आलो. शहरातलं जीवन एकाएकी संपलं होतं आणि माझं जीवन सुरू झालं होतं. पण मला त्याचं फार सुखदुःख वाटलं नसावं. फार मजाच वाटत असावी. पुणं सोडण्यापूर्वीची घरात चाललेली धांदल धावपळ मला चांगली आठवते. माझी आते, माझ्या वडिलांची एकुलती एक धाकटी बहीण

आमच्याबरोबर रहायची. आम्ही भावंडं, आई, वडील घरात होतो घरात सामानाची बांधाबांध चाललेली होती. कुणीतरी भेटायला यायचे. आमची शेजारची स्त्री–पुरुष मंडळी घरात यायची व आम्हा लहान मुलांना जवळ घ्यायची. खडीसाखरेचे खडे खायला द्यायची. पाठीवरून मायेचा हात फिरवायची. मग घरातील सर्व मंडळींचा फोटो काढून घ्यायचं ठरलं. त्या दिवशी सकाळपासूनच घरात कोण धांदल! आमचा फोटो काढणार म्हणून मोहल्यातील मित्रपरिवाराला मी सांगत सुटलो– उघडाबोडका कधी नागडा सुद्धा. सकाळीच वडीलांनी आम्हाला बाजारात नेलं आणि माझ्यासाठी व माझ्या धाकट्या भावासाठी त्यांनी खास असा काळा पांढरा 'सेलरसूट' विकत घेतला. तो सेलरसूट घालून संध्याकाळी माझा फोटो निघणार होता. सेलरसुटात मी छान दिसत होतो. घरी आणल्यावर आईनं माझ्या अंगात तो घालून पाहिला होता. मोठ्या आरशासमोर मला उभं केलं होतं. दुपारी जेवणानंतर आईनं बळे बळे मला बिछान्यात झोपवलं होतं. पण झोप लागतच नव्हती. केव्हा एकदा फोटोसाठी स्टुडिओत जातो. असं झालं होतं. संध्याकाळी केव्हातरी आईवडिलांनी आम्हा भावंडांना फोटोसाठी सज्ज केलं. टांग्यात बसून आम्ही फोटो स्टुडिओत गेलो. स्टुडिओत वर जाण्यासाठी लाकडी जिना होता. स्टुडिओतलं वातावरण काळोखमय काळं काळं वाटत होतं. सगळीकडे काळे पडदे होते. फोटोग्राफरनं कपाळावरून काळा फडका घातला होता. आम्हा सगळ्या मंडळीना त्यानं खुर्च्याबाकांवर बसवलं होतं. पण मी मात्र आई वडिलांच्या मागे सेलरसूट घालून मधोमध उभा होतो. माझी आते माझ्या बाजूला मला धरून उभी होती. माझ्या केसांचा मधोमध भांग पाडला होता. मला मजा वाटत होती. पुणे सोडताना आमचा तो कौटुंबिक फोटो काचेत भरून वडिलांनी कोकणात आणला होता. मी खूप मोठा होईपर्यंत खूप वर्षं तो फोटो गावातील आमच्या घरात पुढील दाराच्या पडवीतील भितीवर लोंबकळत होता. पण मग पुढे केव्हा तो तिथून निसटला व पुढं त्याचं काय झालं हे मला कधीच कळलं नाही. मात्र तो फोटो हृदयात आजही टिकून आहे.

कोकणचं नेरूर गावातील सगळं वातावरणच पुण्यापेक्षा खूप वेगळं व मोकळं होतं. आमची गावात दोन घरं होती. एक देऊळ अवाठातील

आमच्या मराठी शाळेजवळचं. दुसरं थोडंसं दूर देवतळच्यापलिकडचं गावातील चव्हाट्यावर होतं. आम्ही देऊळ अवाठातील घरात रहायलो गेलो. ते घर खूप जुनं होतं. चव्हाट्यावरील घरात वडिलांनी दवाखाना घातला होता व डॉक्टरकी सुरू केली होती. आमचं जुनं घर मातीचं होतं छोटंसं. पुढच्या दारची पडवी. तिला लागून एक छोटी खोली. पडवीतून आत गेलं की मधली वळय म्हणजे ऐसपैस लांबट चौकोनी खोली. बायकामुलांना बसण्याउठण्यासाठी. तिला लागूनच शाळेच्या बाजूनं एक छोटी काळोखी खोली. तिच्यात घरातील चूल पेटायची. भितीला टेकून घडवंची व तिच्यावर भांडीकुंडी, डबे, पेटचा वगैरे. एका कोपऱ्यात पाण्याचा उभट वाटोळा हांडा. त्यावर झाकण. आई आते सकाळीच उठून देवाच्या विहिरीवर जायची व कळशी घागरी भरभरून त्या हांडचात पाणी ओतायची. वळईच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक खोली होती. ती मात्र भर दिवसासुद्धा काळोखानं दाट भरलेली असायची. आम्ही मुलं लपंडाव खेळताना त्या खोलीत हटकून दडून रहायची. त्या खोलीबद्दल मला आणखी एक विशेष जिव्हाळा होता. त्या खोलीतच माझी आई बाळंत होऊन माझा जन्म झाला होता. वळयीतून मागीलदारला गेले की न्हाणीघर होतं. न्हाणीघराला लागूनच दुसऱ्या टोकाला कोंबड्यांची खोली होती. आमच्या आजीनं घरात कोंबडी बाळगली होती. आम्ही कोकणात येण्यापूर्वी माझी आजी– वडिलांची आई– एकटीच त्या घरात रहायची. लहानपणीच मातृसुखाला हरवलेला माझा एक चुलत भाऊ आजीबरोबर लहानाचा मोठा होत होता. न्हाणी घरात माती दगडांची उंच व रुंद बांधलेली भक्कम चूल होती. त्या चुलीवर मातीचं वाटोळं गरगरीत मोठचा पोटाचं मोठं भडकं ठेवलेलं असे. त्या मडक्यात सगळ्यांचं आंघोळीचं पाणी तापायचं. फक्त पावसाळ्यात आणि हिंवाळ्यात, उन्हाळ्यात आम्हा पोराबाळांसह सगळी मंडळी देवाच्या विहीरीवर थंड पाण्याची आंघोळ करायची. घरच्या मागीलदारी कोपऱ्यावर एक फणसाचं झाड वाढलेलं होतं. जवळच आडवाटेवर एक सिताफळाचं झाड वाढून जमिनीपर्यंत वाकलं होतं. पण त्याची सिताफळं आम्हा मुलांना कधीच मिळत नसत. पण मजा होती ती आमच्या या जुन्या घराच्या पुढच्या दारात, घरापुढे लांबरुंद अंगण होतं. माती थापटून थापटून व सारवून मुलायम

केलेलं. खळखळचात डाव्या बाजूला मातीच्या एका उंचवटचावर खूप उंच वाढलेला एकुलता एक माड उभा होता. तर दुसरा माड जरा दूर खळचाबाहेर उंच उभा होता. तर उजव्या हाताला शाळेच्या बाजूनं आमच्या घराला लागूनच मादकूर या कलमी आंब्याचं जाडजूड बुंधा असलेलं वयस्कर झाड आपल्या फांद्या झुबकेदारपणे चौफेर पसरवीत प्रचंड वाढलं होतं. खळचासमोरच एका रेषेत एक चिंचेचं झाड सरळसोट पण विपुल वाढलेलं होतं. त्या झाडाला येणाऱ्या चिंचा मधासारख्या चवीला मधुरगोड असायच्या. आजही आहेत.

❋

पंचवीस

लहानपणी नेरूरला आमची आजी होती. वडोलांची आई गोरी गोरी उंच, देखणी, तरतरीत, सदा कामात गुंतलेली. काम संपलं की पितळी खलबत्ता घेऊन त्यात पानं कुटत बसलेली. भल्या पहाटेला ती उठायची. देवाची नौबत व्हायच्या अगोदर. घरापासून जवळच कलेश्वराचं देऊळ होतं व देवळाच्या तटाला लागूनच नौबतखाना होता. नौबतखाना वर उंच होता. माडीवर बाहेरून वर जायला दगडी पायऱ्यांचा जिना होता. खालून देवळाच्या आवारात जाण्यासाठी प्रदेशद्वार होतं. भलं लांब रुंद. अर्धवर्तुळाकार. त्या प्रवेशद्वाराला आतून दोन्ही बाजूला कबुतरांची खुराडी होती. रात्रंदिवस त्या खुराडचात कबुतर घुमत असायची. जमिनीवर त्याची शीट पडून सगळीकडे त्याची घाण झालेली असायची. एक प्रकारचा कुजट कुबट दुर्गंध सुटलेला असायचा. नौबतखान्याला लागूनच वाजऱ्यांचं घर होतं. बाबुराव, भाऊ, शंकर या नावाचे वाजंत्री आपल्या सनईवादनासाठी फार प्रसिद्ध झाले होते. पहाटेला सनईचे सूर नौबतखान्यातून बाहेर वातावरणात

पसरायचे, पण आमची आजी नौबती अगोदरच झोपून उठायची. ती घरात वळईत झोपायची. आम्ही सगळी मुलं बाहेरच्या पडवीत जोपायचो. पडवीत एक चोफाळा होता. लाकडी. त्या चोफाळ्यावर मी झोपायचो. आजी पहाटेला उठली की मागील दारी तोंड वगैरै धुऊन पडवीत खलबत्ता समोर ठेवून बसायची. एका कोपऱ्यात. व्हायनाकडच्या. व्हायन म्हणजे मुसळानं तांदूळ किंवा भात कांडायचं जमिनीत पुरलेलं दगडी बिळ. रॉकेल-तेलाचा दिवा टमटम पेटलेला असायचा. हातात पितळी दांडी घेऊन व खलबत्त्यात सुपारी पानाची घडी टाकून आजी पानं कुटायची. ती दांडी खलबत्त्यावर आपटून खणखण असा आवाज व्हायचा. मला त्याचवेळी अचूक जाग यायची. मी बिछान्यातूनच किलकिले डोळे करून आजीकडे एकटक पहात रहायचा. आजी आपले दोन्ही पाय पुढच्यात पसरून डाळकुटावर बसायची. दोन्ही कानांवरून ती आपल्या डोक्याला फडका बांधायची. कानात कानेटी जाऊ नये म्हणून तिचा हा बंदोवस्त असायचा. घरात पुष्कळदा दिवसा रात्री कानेट्या फिरायच्या. बारीक मोठ्या. त्या असंख्य पायांवर सरपटत जायच्या. त्या कानात शिरतात, चावतात, विषारी असतात, असं आमच्या कानावर यायचं. म्हणून कानेटी दिसली रे दिसली की आम्ही तिला काठीनं चिरडून मारून टाकायचो. आजी पान कुटता कुटता हळूहळू पण गोड आवाजात भूपाळ्या म्हणायची.

'हरिभजनाविण काल घालवू नको रे
अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे...'

ही सोहिरोबा आंबिये यांची भूपाळी ती म्हणायची, तशीच

'धाव पाव सावळे विठाई, का मनी धरीली अढी
अनाथ मी अपराधी अंबे...'

जनाबाईचे गाणेदेखील ती आर्त, करुण व उदास स्वरात घोळवून घोळवून म्हणायची. संत चरणी रज । लागता सहज । वासनेचे बीज । जळुनी जाय. हा अभंगही ती आळवून गायची. मी त्या गाण्याच्या सुरात वाहून व न्हाऊन जायचा. हळूच मग मी उठून आजीच्या कुशीत रिघायचा. ती मला मायेनं जवळ घ्यायची. म्हणायची, इतक्या लवकर का उठतोस ? जा जाऊन झोप. बाकीची भावंडं व घरातील वडील माणसं गाढ झोपलेली

असायची. मला तेव्हापासून पहाटे उठायची जी सवय ती आजतागायत. तर त्याच वेळी घरात आणि घराबाहेरही घुडीघुप काळोख असायचा. आणि मग बाहेर काळोखात तडतुम तडतुम डमरू वाजल्याचा आवाज खणखणून घुमायचा. त्याचवेळी वासुदेव घुमत फिरत अवाठात आलेला असायचा. मोठमोठ्यानं तो गायचा. त्याचं गाणं काय होतं हे लहानपणी मला काहीच समजत नसे पण तो आमच्या घराच्या खळचात आला की आजी उठून पडवीचं मधोमध असलेलं एकुलतं एक लाकडी दार उघडायची. आपल्या एका हातात ती रॉकेलचा डबा घ्यायची. त्या डब्याच्या टिमटिम प्रकाशात काळोख अधिकच उग्र होऊन मला खायला गिळायला बघायचा. त्या काळोखाचं गूढ मला आत बाहेर व्यापून रहायचं. मी आजीला घट्ट बिलगायचो. तर बाहेर खळचात आलेल्या वासुदेवाच्या हातात मिणमिण पेटणारा एक इवलासा कंदील असायचा. त्या कंदीलाची वात त्या विश्वव्यापी गडद काळोखात मला आणखीनच गहनगूढ वाटायची. वासुदेवाकडे तर मी डोळे टवकारून व धडधडत्या काळजानं सारखा पहात रहायचो. त्याच्या डोक्यावर निमुळत्या टोकाची वाटोळी व उंच टोपी असायची. त्याच्या अंगात मानेपासून पायापर्यंत देह झाकणारा मळकट डगला असायचा. त्याच्या एका हातात डमरू व मोरपिसांचा झुपका असायचा. काही मोरपिसं त्याच्या टोपीला उभी आडवी खोचलेली असायची. त्याच्या पायात चाळ बांधलेले असायचे. मग तो गर्रकन आपल्याच अंगाभोवती फिरून छान चाळ खुळखुळवीत नाचायचा. गाणी म्हणायचा मग घराच्या ओसरीवर बसायचा, त्याचा आणि आजीचा थोडा वेळ संवाद व्हायचा. मला अजूनही आठवतं की खूप प्रेमळपणानं ती दोघं एकमेकाशी बोलायची. आजी वासुदेवाला माझ्याबद्दलही काही काही सांगायची. तो माझ्याकडे गोड हसून बघायचा, तितक्यात मग नौबतीवर काठी पडायची. वासुदेवाच्या हातावर आजी पैसा ठेवायची.



सव्वीस

नेरूरला देऊळ अवाठातील आमच्या घराशंजारीच गावची जुनी पुराणी मराठी शाळा होती. आजही ती तशीच उभी आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ ती तिथं आहे. त्याच मातीच्या भिंती. तीच बाहेरची रस्त्याकडील पडवी. त्या पडवीला पुढून व डाव्या उजव्या अंगानं आडव्या उभ्या सागवानी कांबी ठोकलेल्या. शाळेच्या दारातूनच रहदारीचा रस्ता जातो. शाळेच्या एका अंगाला दगडी पार बांधलेला प्राचीन पिंपळ. आपल्या हिरव्या समृद्ध पर्ण वैभवानं सदैव सळसळत राहाणारा. उंच घनदाट. तर त्या पिंपळाकडूनच देवालयाकडे वाट गेलेली. वाटेच्या एका बाजूला देवतलाव, त्या तलावाला वळसा घालून रहदारीचा रस्ता चव्हाट्यावर गेलेला. शाळेच्या दारातच रस्त्यापलिकडे उथाळी. उथाळी म्हणजे जमिनीचा रस्त्यापासून खूप खाली खवदाडात उतरलेला उथळ भाग. त्यात शेतीचे नुणगे. पावसाळ्यात हिरवेचार तरारून येणारे. उन्हाळ्यात कोरडे पडणारे. त्या कुणग्यांच्या शेजारून वहात जाणारा गावातील ओढा वहाळ. त्या वहाळाच्या पलिकडे एक उंच टेकडी. उंच उंच झाडांनी व वेलींनी गच्च भरलेली. गडदगूढ व भयाण वाटणारी तिथंच देऊळअवाठ, मांगरवाडा, सोनारवाडा, वगैरे भागासाठी स्मशान राखलेलं. मग त्या स्मशानाला उद्देशून मुलांमुलांमध्ये वर्गात आणि वर्गाबाहेर भुताखेतांच्या गोष्टी चालायच्या. वहाळाच्या एका अंगाला पाण्याची कोंड व त्या कोंडीवर केगदीची दाट झुडुपं गच्च वाढलेली. काटेरी. झुडुपांचा खालचा भाग पाणथळ. त्यात कुव्वा कोंबड्या दडून रहायच्या व सारख्या 'कुव्वा' 'कुव्वा' केकाटायच्या. झाडंझुडपं आम्ही पोरांनी हालवली की त्या कलकलत बाहेर पडायच्या. कुणग्यात सैरभैर धावायच्या. काळघाकुळकुळीत. छोट्याशा ठेंगण्याठुसक्या. कुव्वा कोंबड्यांना

कुणी मारीत नसे. त्या हिमूस लागतात म्हणून. शिवाय त्या आपण होऊन कुणाच्या वाटचाला जात नसत तर त्या केगदींच्या बींडीवर केगदाचे हाते फुलायचे. केगद म्हणजे केवडे. माझा एक लठ्ठ देहाचा वर्गमित्र भराभर त्या काटेरी झुडपांवर चढायचा व मुळापासून तोडून हाते काढायचा. त्यातला एक मला द्यायचा. केवड्याचा घमघमाट सुटायचा. उथाळीतच शाळेसमोर थेट एक आंब्यांचं उंच व प्रचंड झाड वाढलं होतं. त्याला आंब्याचे घोस लटकायचे व वाऱ्याबरोबर पिकलेले पिवळेधमक आंबे खाली उथाळीत किंवा रस्त्यावर पडायचे. ते वेचण्यासाठी पोरांची सुटीत मग एकच झुम्मड उडायची. हातात आंबा आला की आम्ही तो सालासकट खात असू. गोड गोड.

पुण्याहून वडील गावात आल्यावर पुनः माझे या गावच्या शाळेत दुसरीत नाव घालण्यात आलं. मराठी पाचवीपर्यंत मी त्या शाळेत शिकलो. प्रथम आमचा वर्ग बाहेरच्या पडवीत भरायचा. अनंत मास्तर आम्हाला शिकवायचे. वर्गात मुलीही असायच्या. काही आमच्यापेक्षा खूप थोराड मुलं असायची दोन दोन वर्षं त्याच दर्गात ती असायची व दादागिरी करायची. आमच्या डोक्यावरच्या टोप्या काढून घ्यायची. बाहेर फेकून द्यायची. मग आम्ही रडत मास्तरांकडे जात असू. जवळच्या पिवळपारावर पिंपळाच्या पोटांतूनच एक उंबराचं झाड उगवलं होतं व लांबलचक वाढलं होतं. त्याच्या फांद्या आरपार पसरलेल्या होत्या. त्या फांद्याना लाल पिवळे रसरशीत पिकलेले लहान मोठे उंबर लगडून यायचे. शाळा सुटल्यावर आम्ही पोरं ते उंबर दगड मारून पाडायचे. पडलेले उंबर चवीनं खाण्यासाठी गोळा करायचे. मऊ व मधुर असे ते उंबर पोरांना खूप आवडायचे. तर अशी आम्ही पोरे उंबर पाडीत असताना एका थोराड पोरानं माझी टोपी पळवली. वडील मला काळी टोपी विकत आणायचे. इतक्यात कुणाचा तरी उंबरावर मारलेला अणकुचीदार दगड मधोमध माझ्या डोक्यावर येऊन दाणकन आदळला. डोक्याला खोक पडली व भळाभळा रक्त वाहू लागलं. सकाळची शाळा संपली होती. दुपार सुरू झाली होती. माझे वडील डॉक्टर होते. त्यानी माझी जखम बरी केली. पण मग तो थोराड मुलगा सतत माझी हरएक सेवा-चाकरी करायचा. आपण होऊनच मला उंबर, आंबे, चिचा, जांभळं, चाफरे, आवळे, ओवळधोंडे आणून द्यायचा. शाळेत आत बाहेर सगळे वर्ग एकमेकान।

जोडून भरायचे. शाळेची इमारत काटकोनी होती. खडकाळ जमिनीवर ती बांधलेली होती. श्री. दाभोळकर हे शाळेचे हेडमास्तर होते. मी खूप मोठा झाल्यावरही ते होते त्यांची शिस्त कडक असायची. सातवीच्या वर्गाला ते शिकवायचे. उग्र मुद्रा, लांबट काळा कोट, धोतर, डोक्यावर टोपी, मिशा, गोरापान चेहरा. फार क्वचित बोलायचे. त्यांच्या डोळ्यांचाच सर्वांना दरारा असायचा. सर्वांअगोदर ते शाळेत यायचे व सर्वांत उशीरा आपल्या पायातील कोकणी वहाणा करकर वाजवीत रस्त्याच्या एका बाजूनं वर मान न करता ते घरी जायचे. त्यांच्या घरीच गावचं टपाल यायचं. वडील मला त्यांच्या घरात टपाल आणायला पाठवायचे. पंचा नेसून उघड्याबंब अंगानं आसनमांडी घालून बसलेले दाभोळकर मास्तर, वर शिक्का मारून काही न बोलता लांबूनच माझ्या हातावर पत्र ठेवायचे. शाळेत थोराड मुलीही यायच्या. त्या परकर पोलका नेसायच्या. पण अंगापिंडानं वाढलेल्या असायच्या. नंतर माझी सेवाचाकरी करणारा शाळेतील तो थोराड मुलगा काही मुलींची वर्गात बसल्या बसल्या, मास्तरांची नजर चुकवून खोडी करायचा. मोडी पुस्ती लिहिण्यासाठी मुलं मुली मांडी दुमडून बसली की तो अचकट विचकट हावभाव करायचा. मुलींचे चेहरे रागानं व लाजेनं लालबुंद व्हायचे व त्या सगळ्याजणी खाली मान घालून पुस्ती गिरवत बसायच्या. मला त्या थोराड मुलाच्या चावट हसण्याबोलण्याचा अर्थ कळत नसे. पण त्याचा खूप राग मात्र यायचा. पुढं मोठेपणी तो मुलगा आमच्या कोकण परिसरात प्रख्यात जुगारी व व्यसनी माणूस म्हणून गाजला. तरुण-पणातच मरण पावला.

सत्तावीस

नेरूरची आमची मराठी शाळा सकाळ व दुपारची भरायची. शाळेच्या खिडकीतून आमचं घर दिसायचं. घराला बिलगून उंच, धिप्पाड व विस्तृत वाढलेलं मांदकूर आंब्याचं हिरवं टंच झाड दिसायचं. घरापुढचं अंगण, त्या अंगणातील तुळशी वृंदावन, अंगणाच्या एका अंगाला उंच वाढलेला माड, आणि पलिकडचं जिज्याचं घर दिसायचं. जिज्या आमच्यापेक्षा वयानं मोठा व वरच्या वर्गात होता. तो मला खूप आवडायचा. देखणा, डौलदार शरीरयष्टी, हसतमुख प्रसन्न चेहरा. मनमिळाऊ, अभ्यासू, शाळेत जाताना आम्ही पुस्तकाचं व वहीचं दप्तर फडक्यात बांधत असू ते दप्तर बांधण्याचं एक तंत्र होतं. एक चौकोनी लांबट कपड्याचा पांढरा पातळ तुकडा असायचा. एका चौकोनी दगडी पाटीएवढी लाकडाची फळी असायची. त्या फळीवर नीट पुस्तकं व वह्या रचून ठेवायची. मग कपडा जमिनीवर पसरुन ठेवायचा. कपड्याच्या एका टोकावर ती फळी नीट ठेवायची व कपडा गुंडाळायला सुरुवात करायची. कपड्याच्या दुसऱ्या टोकाला दोर बांधलेला असायचा. मग चारी बाजूनी कपडा गुंडाळून झाला की दोराची गाठ मारायची की दप्तर झालं. ते एका हातात घेऊन व दुसऱ्या हातात पाटी घेऊन आम्ही शाळेत जात असू. वर्ग सुरु झाला की दप्तर सोडत असू. तेव्हा तोंडी हिशोबाचा तास असायचा. सोलकर मास्तर सर्व मुलामुलींना आपल्या समोर रांगेत उभे करायचे व भराभर तोंडी हिशोब घालायचे. गुंजा, मासे, तोळे, पायली, कुडव, भरा, असे ते सोन्याचांदीचे व धान्याचे हिशोब असायचे. केवळ सोलकर मास्तरांच्या भीतीनं माझे हिशोब हटकून चुकायचे. अंगात राखाडी रंगाचा चुरगळलेला कोट ते घालायचे. डोक्यावर काळी टोपी. धोतर, उंच, बारीक.

हातात लपलपती छडी ते घ्यायचे. अंगावर आल्यासारखे ओरडून ते हिशोब घालायचे. माझी भीतीनं गाळण उडायची. कधी चड्डी ओली पण व्हायची. माझं उत्तर चुकायचं की ते हात पुढं करायला लावून सपकन छडी मारायचे. कधी राग अनावर झाला की थडाथड थोबाडातदेखील मारायचे. शेजारचा मुलगा हळूच मग माझ्या पाटीवर उत्तर लिहून ठेवायचा. तेव्हापासूनच माझ्या मनात गणित विषयाची भीती व विशेषत: आकडचांवद्दल भीती उत्पन्न झाली ती आजतागायत कायम आहे. आजही माझे हिशोब, गणितं व व्यवहार चुकतो. पुढे महाविद्यालयात बी. एड्.ला मी प्रायोगिक मानसशास्त्र शिकत असताना त्यातील गणिताची माझी पद्धती बरोबर असायची पण आकडचांची गोळाबेरीज चुकायची व भलतंच उत्तर यायचं. तेव्हाचे आमचे प्रा. वझे सर मला म्हणायचे, ' You are suffering from figure fright..' तुला आकडचांची भीती वाटते मला त्या भीतीचं मूळ ठाऊक असायचं.

एकदा आमच्या चौथीच्या वर्गात गंमतच झाली. नेरूरपासून अवघ्या दोन अडीच मैलावर वालावल गाव होता. तेथील कै. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले मोठे धनाढच व दानशूर म्हणून प्रसिद्ध होते. डोंगर माथ्यावरची वालावलीची इंग्रजी चार इयत्ता असलेली शाळा त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ कै. नर्मदाबाई अनंत शिवाजी देसाई इंग्रजी शाळा बांधलेली होती. वर्षातून कोणत्या तरी एका महिन्यात देसाई मंडळीकडून पंचक्रोशीतील शाळांतील मुलांसाठी खाऊचे पुडे व शिक्षणविषयक सुंदर वस्तू हेडमास्तरांकडे यायच्या. मग त्यांची वर्गवार वाटणी व्हायची, मास्तर आपल्या टेबलावर त्या सुंदर सुंदर वस्तू रचून ठेवायचे. प्रथम वर्गाला अनंत शिवाजी देसाई यांची माहिती ते सांगायचे आमचे अनंत मास्तर मुलांना वस्तू वाटणार होते. किंचित् ठेंगणेसे टापटीप प्रेमळ बोलणारे, डोक्यावर काळी टोपी, पांढरा कोट व धोतर सुंदर वस्तूंची ढीग समोर पाहून डोक्यात व मनात चलबिचल सुरू व्हायची. माझी ती पहिलीच वेळ होती. अनंत मास्तर बोलत असताना एक शिष्ट मुलगा हळूच माझ्या कानात पुटपुटला. ' आपण काही त्या वस्तू घ्यायच्या नाहीत बरं का. तो सगळा मेलेल्या माणसासाठी केलेला दानधर्म आहे. गरीब व खालच्या लोकांनी तो घ्यायचा असतो.' त्या

शब्दांनी मी गोंधळून गेलो. आपण वेगळे असल्याची मनाला जाणीव झाली. टेबलावर कंपासपेट्या, रंगीत खडूच्या पेट्या, पेन्सिलांचा मोहक ढीग, फूटपट्ट्या, आत आठ दहा गुलाबी टीप कागद असलेली व वर जाड पुठ्ठ्यावर अनंत शिवाजी देसाई यांचे चित्र असलेली 'ब्लॉटींगपॅड' होती, जाडजूड रबराचे तुकडे व मिठाईचे पुडे होते. अनंत मास्तर एकेक वस्तू हातात घ्यायचे व मुलांना म्हणायचे, 'ज्याना ही वस्तू हवी आहे त्यानी उभं रहावं.' आम्ही पाच सहा शिष्ट मुलं बसूनच राहायचो. आमच्या डोळ्यांसमोर एकामागून एक मुलगे मुली सुंदर सुंदर वस्तू अनंत मास्तरांच्या हातातून घेऊन जात होती. माझा जीव खालीवर होत होता. एकेक मुलगा टेबलाकडे जायचा. वस्तू घ्यायचा व आपल्या पुढ्यात ढीग रचायचा. मिठाईपासून तों फूटपट्ट्यांपर्यंत सगळ्या वस्तू हा हा म्हणता संपल्या. शेवटचे उरले खोडरबराचे जाड जाड पांढरे वाटोळे चौकोनी तुकडे. माझी स्वत:ची मोठी पंचाईतच झाली होती. तोंडाला पाणी सुटलं होतं. मला काय होतंय, काय नाही, हेच मला नीटसं कळत नव्हतं. खोडरबर ज्याना हवेत त्यानी उभं रहावं असं म्हणताच इतर मुलांबरोबर मीही आपोआपच उभा राहिलो. सगळी मुलं व अनंत मास्तरसुद्धा माझ्याकडे आश्चर्यानं पाहू लागले. मी आपला मान खाली घालून उभा राहिलो. माझ्या अंगात एक गुडघाभर चड्डी. वर पांढरा सदरा. डोक्यावर टोपी. माझे पाय लटलट कापत होते. क्षणभर वर्ग चिडीचूप झाला. मग अनंत मास्तर आपल्या हळवार आवाजात म्हणाले, 'मुलांनो, रबराचे तुकडे मुळातच आपल्याकडे कमी आले आहेत. पण प्रत्येकाच्या वाट्याला थोडा तरी खोडरबर यावा म्हणून मी टेबलावरचे तुकडे कापून तुम्हाला देत आहे.' अनंत मास्तरांनी खिशातून चाकू काढला व एकेक रबर कापून एकेक इवलासा तुकडा एकेकाच्या हातावर ठेवला. माझ्या हातात त्या दिवशी एक रबराचा तुकडा तेवढाच आला.



अठ्ठावीस

नेरूरच्या आमच्या मराठी शाळेत वरच्या वर्गात शिवदास नावाचा मुलगा होता. तो आजही मला जसाच्या तस्सा आठवतो. गोरापान, कन्हाडा ब्राह्मण,' वयानं मोठा. पंचा नेसायचा आणि डाव्या उजव्या अंगाला दोन खिसे असलेलं जाडजूड कुडतं अंगात घालायचा. डोक्यावर टोपी ठेवायचा. पण त्याची टोपी खाली पडली किंवा खोडकरपणानं कुणी ती काढून घेतली तर त्याची शेंडी बाहेर लोंबायची. आपल्या दोन्ही हातांनी शेंडीचे केस उंच धरून तो शेंडीला करकचून गाठ मारायचा. त्याचं लांबट डोकं तुळतुळीत तासलेलं असायचं. फक्त शेंडीच्या पायथ्याशी केसांचा नीट कापलेला वाटोळा भोवरा असायचा. त्याचा चेहरा रेखीव व ओठ हसरे होते. पण दोन्ही डोळ्यांनी तो बराचसा अधू होता. दोन्ही डोळे मिचमिचे करून अवतीभवती पहायचा. वाचताना पुस्तक थेट डोळ्यांना नेऊन भिडवायचा. बोलताना शुद्ध मराठी नाहीतर कोकणी बोलायचा. दीड दोन मैलावरून तो शाळेत यायचा. तो वयानं मोठा, अंगानं थोराड व काहीसा बावळट दिसणारा म्हणून पोरं त्याला चिडवायची. हळूच त्याची टोपी काढून घ्यायची. पुढचातलं दप्तर ओढायची. शेंडीला हिसके द्यायची. तो मोठ्याने पोरांवर ओरडायचा. अस्सल कोकणी मालवणी शिव्या घालायचा. अंगावर धावून जायचा. पण अधू डोळ्यांमुळे त्याची पंचाईत व्हायची. त्याच्याभोवती पोरांचा लपंडाव चालायचा. मला त्याच्याहून लहान असूनही त्याची दया यायची. मी मग त्याची विखुरलेली पुस्तकं, वह्या, टोपी गोळा करून त्याला द्यायचा. माझ्या पाठीवरून तो हळुवार हात फिरवायचा. माझ्याशी गोड बोलायचा. त्याला वर्गातील मुलींवरूनही पोरं चिडवायची. त्याचे वडील कधी कधी त्याला घेऊन जायला शाळेत यायचे. वडील गावा-

तील पुजारी होते. ठेंगणेसे, गोरेपान, कमरेखाली फक्त पंचा. बाकी सगळा देह उघडाबंब. पायात एक कारकूर वाजणारी जाड गावठी वहाण. त्यांच्या एका खांकेत एका हातानं घट्ट दाबून धरलली बासनात बांधलेली पोथी असायची लांबटशी. त्यांच्या दुसऱ्या हातात एक छत्री असायची. ही छत्री म्हणजे माझ्या बालवयात मी पाहिलेली एक अजब चीज होती. तिचा जाडजूड दांडा एका तुळतुळीत बांबूचा केलेला होता. छत्रीचे तीर लाकडी व घट्ट बारीक तासलेले व लांबलचक होते. बैलगाडीला चाक बसवतात तसे ते त्या दांड्याभोवती वर्तुळाकार लाकडी चकतीत बसवलेले होते. सुदर्शन चक्रासारख्या दिसणाऱ्या त्या तीरावर वाटोळे व टोकदार मेणकापड बसवलेले होते. घट्टफिट्ट, कधीही न हालणारे, ढळणारे, फाटणारे. त्या मेणकापडाला आतून बाहेरून बेलफळाच्या तेलाचा चोप दिलेला असायचा. छत्रीचा रंग बेलफळासारखाच फिक्कट हिरवा व ओला ओला असायचा. ती छत्री कधीच मिटत नसे. शिवदासाचे वडील शाळेत येताना खिडकीतून रस्त्यावर दिसत तेव्हा फक्त त्यांचे पाय तेवढे दृष्टीत येत. जणू छत्रीच चालत येतेय असंच वाटायचं

मी मराठी शाळा सोडली. बेळगावला गेलो. पुनः कोकणात येऊन हायस्कूल शिक्षण पूर्ण केलं. शिवदास व त्याचे वडील कधी तरी गावात दिसायचे. शिवदास भेटला तर पोटभर खळखळून बोलायचा. तो जवळ जवळ आंधळा झाला होता. नंतर भारत देश स्वतंत्र झाला. शिवदास एकटाच घरात रहायचा. त्याची आई लहानपणीच वारली होती, नंतर मग वडील पण गेले. गावातून चालणारी ती अजब छत्री दिसेनाशी झाली. मी ही कॉलेज शिक्षणासाठी शहरात गेलो. तर एकदा गावात आल्यावर कळलं की शिवदास गावातून पळून गेला. आमच्याच वर्गात मराठी शाळेत असलेला एक मुलगा नंतर व्यापार करू लागला. त्या व्यापारात त्याचा चांगला जम बसला, त्यानं एक ट्रक घेतला. शिवदासची व त्याची दाट मैत्री जमली. त्या ट्रकातून आपल्या मित्राबरोबर शिवदास गावोगावी जायचा. मुंबईपर्यंत सुद्धा, एके दिवशी उत्तर रत्नागिरीतील कुठल्या तरी गावी शिवशिवदास देवालयात पुजारी म्हणून काम करीत असल्याच्या बातम्या आल्या. त्याला एक चांगली बायको मिळाल्याचं कळलं. पण मग कळलं की ती त्याची

बायको नव्हती. पण ती परजातीतील ब्राह्मणेतर स्त्री शिवदासावर फिदा झाली होती. शिवदास तिच्या प्रेमात पडला होता. तिच्यासाठी तो नवी नवी लुगडी खरेदी करायचा, दागिने बनवायचा. एके दिवशी तो तिला घेऊन गावात आपल्या घरात येऊन राहिला आणि ब्राह्मणवाडीत हाहःकार उडाला अशीही एक अफवा गावात बराच काळ चालत बोलत होती की शिवदासाला त्याच्या घरात त्याच्या वडिलांनी पुरून ठेवलेला एक द्रव्याचा हंडा सापडला होता. त्या हंड्यात म्हणे चांदीचे खणखणीत राणीछाप जुने चाळीस हजार रुपये होते. आपल्या व्यापारी मित्राच्या सहाय्यानं त्या रुपयांची विल्हेवाट शिवदासाने म्हणे लावली होती व तो गब्बर पैसेवाला झाला होता. एके दिवशी घरातील सर्व किडूकमिडूक चीजवस्तू वगैरे घेऊन शिवदास आपल्या प्रेयसीबरोबर परागंदा झाला तो गावात कधी परत आलाच नाही. तो पूर्ण आंधळा होऊन कुठच्या तरी घाटावरच्या शहरात रस्त्यात भीक मागीत फिरत असलेला आपण पाहिला, असे कुणी गावात कधी सांगायचे. पण कालांतरानं त्याच्याबद्दल काहीच ऐकू येईनासं झालं. कुणी म्हणे त्याच्या प्रेयसीनंच त्याला लुबाडला. बडव बडव बडवला व रस्त्यात फेकून दिला. कुणी म्हणे त्याच्या व्यापारी मित्रानंच त्याला दगा दिला. खरं काय खोटं काय, काही मला धडसं कळत नव्हतं. मात्र एक गोष्ट निश्चित होती. शिवदासाचं काही तरी बरं वाईट झालेलं होतं. नक्कीच शिवदास या जगातून अंतर्धान पावला होता. आजही आमच्या गावात रस्त्याच्या बाजूला शिवदासाचं जीर्णशीर्ण पडकं मोडकं घर शिवदासाला हाका मारीत दीनवाणं उभे आहे.

एकोणतीस

नेरूरला संध्याकाळी आमची शाळा सुटली की घरी जाऊन कपडे अंगावरून उतरून उघड्याबंब अंगाने (अंगात फक्त चड्डी) आम्ही देऊळ· अवाठातील मुले देवतळ्याला वळसा घालीत चव्हाट्यावर पळत असू. चव्हाटा म्हणजे नेरुरचं गावरहाटीचे मुख्य ठिकाण. चार वाटा चार बाजूना तिथे फुटलेल्या व एकत्र आलेल्या मधोमध पिंपळाचा पार. दगडांनी वाटोळा बांधलेला. समोर मारुतीचं देऊळ. एका बाजूने रहदारीचा मुख्य रस्ता. थेट वालावल कवठी गावापर्यंत जाणारा. रस्त्याच्या एका बाजूला व्यापाऱ्यांची दुकाने व घरे. त्या घरांच्या मागच्या बाजूला चव्हाट्यावरचे आमचे दुसरे घर. आणखी एक घर त्यालाच लागून. आमच्या ताई देसाईणीचे. तिची शेतीवाडी, विहीर. व्यापाऱ्यामध्ये आमचे शेजारी कृष्णा उर्फ काका सडवेलकर यांचे घर व दुकान फार मोठे. रस्त्याच्याकडेला रांगेत एका ओळीत चहाफराळाची, शिंपी, किरकोळ माल विक्रेत्यांची दुकाने होती दादा वाणी (सडवेलकर) याचं चहाचं दुकान प्रसिद्ध व सर्वांचा बसण्याचा तो अड्डा होता. त्या दुकानाशेजारीच प्रचंड मोठे ओवळीणीचे किंवा बकुळीचे झाड आफ्ल्या भरभक्कम फांद्या चौफेर पसरवीत वाढले होते. बकुळफुले फुलायला लागली की त्या झाडाखाली बकुळफुलांचा दाट सडा पडायचा. रहदारीचा रस्तासुद्धा बकुळफुलांनी माखून जायचा. बकुळफुले वेचून त्यांच्या माळा करण्याची आम्हा मुलांमुलींत चढाओढ चालायची. घराच्या मागच्या दारी केळ उगवलेली असायची. तिचे बारीक दोर बोटांच्या नखांनी आम्ही पटापट काढीत असू ते सर्व दोर बरोबर घेऊन आम्ही चव्हाट्यावर ओवळीणीखाली पळत असू. दाभोळकर मास्तरांची मुलगी काशी, (तिला घरात 'चेत्या' म्हणून हाक मारायचे) ती पण यायची. परकरी. गोड व

गूढ हसणारी. (आमच्या तरुणपणी नंतर ती तरुणपणातच मरण पावली व एक अखंड चुटपूट लावून गेली) तर भराभर बकुळ फुलं वेचायची ती केळीच्या दोराला टोचायची. अलगद फुलाच्या मधोमध दोरा जायचा. पटापट मग एक पूर्ण माळ भरगच्च फुलाची तयार व्हायची. दोराला खाली व वर बारीक नाजूक गाठ मारून माळ पक्की करायची मग एकमेकाच्या किती माळा झाल्या याची स्पर्धा व्हायची. काळोख पडायचा. चव्हाटयावरचे दिवे लागायचे. नौबत सुरू व्हायची व संपायची. सनईचे सूर वातावरणात आपली मोहमाया पसरवीत रेंगाळायचे. आम्ही मुले मुली देहभान विसरून बकुळीखाली बकुळमय व्हायची. बकुळफुलांचा मंदधुंद सुगंध हवेत भरून रहायचा. घरी मग आम्ही त्या बकुळमाळा नेत असू व स्त्री मंडळीना घरात देत असू.

चव्हाटयावरची बकुळीच्या झाडाखालची एक संध्याकाळ मी कधीच विसरणार नाही. नौबत नुक्तीच सुरू झाली होती. मी बकुळफुले केळीच्या दोरात गुंफीत रस्त्यात उभा होतो. इतक्यात समोरून टपटप आवाज करीत दोन चार घोडेस्वार चव्हाटयावर येताना मला दिसले. अशा घोडेस्वारांची वर्णने मी, आमची आई आम्हाला झोपण्यापूर्वी अद्भूतरम्य गोष्टी सांगायची, त्या गोष्टीतून ऐकली होती. कुणीतरी असतील घोडेस्वार म्हणून जास्तीत जास्त माळा तयार करण्यासाठी पुन: मी बकुळीच्या झाडाखाली जाऊन फुले वेचू लागलो. माझ्या एका हातात उभ्या सरळ अशा खूप बकुळमाळा जमल्या होत्या. इतक्यात आमच्या बकुळीच्या झाडाखालीच येऊन घोडेस्वार थांबले. सर्वात पुढे असलेल्या घोडेस्वाराने मोठ्या ऐटीत व दिमाखात घोडयावरून खाली उडी घेतली. मी त्या घोडेस्वाराकडे हर्षभरीत व आश्चर्यचकित होऊन पहातच राहिलो. आईने आम्हा भावंडांना सांगितलेल्या परीकथेतला राजबिंडा व शूर महाराजाधिराज माझ्यासमोर मूर्तिमंत उभा ठाकला होता. त्याच्या डोक्याला मानेवर शेपूट सुटलेला डौलदार फेटा होता. त्याच्या पायात घट्ट आवळलेल्या तुमानी होत्या. जरीचे नक्षीकाम केलेले व पोपटासारखी टोच असलेले उंची जोडे त्याच्या पायात होते. गळाबंद गुडघ्यापर्यंत लोंबणारा पिवळट पांढरा कोट त्याने आपल्या अवयवसुंदर अंगात घातला होता. त्याचा वाटोळा लांबट सुंदर चेहरा संगमरवरी दगडातून जणू

कुणी कलाकाराने कोरून काढला होता. त्याच्या ओठावर मधभरी मधुर हास्य होतं व डोळ चांतून हिऱ्या माणका रत्नांचं तेज ओसंडून वहात होतं. पहिला आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर आम्ही मुले काहीशी घाबरीघुबरी होऊन बाजूला पांगलो. तर पहिल्या घोडयावरून उतरलेले महाराजाधिराज आम्हा मुलांकडेच सरळ आले. मीच पहिला त्यांच्या तावडीत सापडलो. पण त्यांनी मला माझ्या हाताला धरून जवळ ओढले. माझ्या उघडया पाठीवरून आपला हात फिरविला. मला त्यांनी 'मुला' म्हणून प्रेमळ हाक मारली. हळूच खाली वाकून माझी त्यानी चौकशी केली. शाळेत जातो की नाही. कितवीत आहे, आईवडील काय करतात, ती बकुळीची फुले आम्ही कुणासाठी वेचीत होतो, बकुळफुलांची माळ आम्ही कशी तयार केली आणि चटकन् माझ्या हातातील एक बकुळफुलांची माळ आपल्या हातात घेऊन त्यानी आपल्या नाकाजवळ नेली व हुंगली. मी हरखून गेलो. इतर घोडेस्वार आपले घोडे रस्त्यावर थोपवून खाली उतरले होते. आमच्या भोवती लोकांचा घोळका केव्हा जमला तेही मला कळले नव्हते. मग 'शाळेत जा. खूप शिका. मोठे व्हा.' असं आम्हाला जवळ घेत व आंजारत गोंजारत सांगत, पुनः महाराजाधिराज घोडयावर स्वार झाले. इतर घोडेस्वारांनी पटापट आपल्या घोडयांवर उडया घेतल्या. चव्हाटयावरच्या एका आडवाटेने घोडे गावातील सागाच्या डोंगराच्या दिशेने निघून गेले. अदृश्य झाले. लोकांनी पुन्हा आम्हा मुलांना गराडा दिला त्यात तरणा बांड, देखणा, उत्साही व प्रेमळ असा दादा वाणी प्रमुख होता. त्याने मला जवळ घेतलं व म्हणाला, 'अरे, तुला ठाऊक आहे तुझ्याबरोबर कोण बोलत होतं ते ?' मी आपला 'आ' करून दादाकडे पहात राहिलो. मग दादा मला जवळ घेत म्हणाला, 'अरे, ते आपल्या सावंतवाडी संस्थांनचे राजे प्रत्यक्ष बापूसाहेब महाराज होते, आज रात्री त्यांचा गावात मुक्काम आहे. जंगल पहाणी करण्यासाठी ते खुद्द आले आहेत. तू फार भाग्यवान आहेस.' दादा कोकणी मालवणीत रोमांचित होऊन माझ्याशी बोलत होता. माझ्या हातातील बकुळफुलांचं त्या दिवशी सार्थक झालं होतं.



तीस

नेरूरला मराठी शाळेत शिकत असतानाच सकाळच्या प्रभातफेरी निघत. सकाळी सकाळी शाळेत मास्तर आम्हा मुलांना शिकवीत असतानाच गावातील काही तरुण कार्यकर्ते शाळेत येत असत. मास्तरांचे व त्यांचे काही बोलणे होत असे आणि आम्हा मुलांना प्रभातफेरीसाठी सोडून देण्यात येत असे. 'महात्मा गांधी 'च्या नावाचा जयजयकार करीत आम्ही मुलगे (मुली नसत) बाहेर पडत असू. मग एका ओळीत आम्हाला चव्हाट्यावर जावे लागे. तिथे मारुतीच्या देवळासमोर शाळेतील मुले व गावातील लहानमोठी माणसे यांचा जमाव जमत असे. आम्हा मुलांच्या हातात फलक दिले जात. फलकांवर महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि इतर पुढाऱ्यांची रंगीत चित्रे असत. विविध घोषणांचेही फलक असत. प्रथम आम्हाला घोषणांची शिकवण मिळे. मग सामुदायिक गाणी म्हटली जात. शिस्तबद्ध. काही गाणी आजही आठवतात. त्यांच्या सुरुवातीच्या ओळी अशा होत्या.

१) चरखा चला चलाके । लेंगे स्वराज्य लेंगे

२) चहा हे मूळ रोगाचे । चहाने झोप येईना

३) आनंद कंद ऐसा ! हा हिंद देश माझा.

एकदा सर्वांचा ताल सूर चाल मेळ जमला की प्रभातफेरी चालू लागे. पहिल्यांदा 'वंदे मातरम् 'चा घोष होई. नेरूर ते वालावल गाव अशी ही तीन मैलांची फेरी असे. मग आम्ही सर्व मुले गाणी गात व घोषणा देत सर्वांबरोबर झपाझप चालत असू. रस्त्यारस्त्याच्या कडेने घरादारातूनन बाहेर पडून गावातील बायका माणसे आमचं कौतुक पाहत उभे असत. शाळेकडून फेरी पुढे जायला लागली की सगळी शाळा रिकामी झालेली पाहून मनाला मौज वाटे. इतक्यात एक

दोन तरुण स्वयंसेवक मध्येच गर्दीतून फेरी मारते व मुलांच्या डोक्यावरच्या काळचा टोप्या काढून घेत व पांढऱ्या गांधी टोप्या त्यांना घालायला देत मी गांधी टोपी माझ्या डोक्यावर घालताना वाटेतच रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दाट झुडुपात माझी काळी टोपी सारून ठेवून देत असे आणखीही काही मुलं तसं करीत. पुन्हा आम्ही परत येत असू तेव्हा त्या झुडपात आमच्या टोप्या जशाच्या तशा सुखरूप असत. चढाव उतार चढत व वळणे आवळणे घेत. प्रभात फेरी वालावल गावच्या नारायणाच्या देवळात जाऊन थडकत असे. देवालयाला लागूनच नारायणाचं सुंदर तलाव होतं. ते डोळ्यांचं पारणं फेडीत असे. देवळाच्या बाळंद्यावर बसून सगळेजण विसावत आणि गावकरी लोक सर्वांना गुळाचा खडा व पाणी देऊन त्यांचं स्वागत करीत असत.

नेहमीच आमच्या गावातून निघणाऱ्या या प्रभातफेरीचा म्होरका गावातील तुकाराम सुतार नावाचा तरुण असे. देखणा, उंच पण किरकोळ कृश अंगाचा. भावुक प्रेमळ चेहरा. डोक्यावर खूप वाढलेले काळेभोर केस. ऐटीत मागे फिरविलेले. साधा सदरा अंगात आणि पंचा किंवा धोतर नेसलेला गावातील नामवंत कृष्णा सुतार यांचा तो मुलगा. त्याचा धाकटा भाऊ दादा सुतार माझ्या वर्गात होता. कृष्णा सुतार उत्तम सुतार काम करीत तसेच गणपतीच्या सुंदर मूर्तीपण बनवीत. तुकाराम व दादा सुतारसुद्धा सुंदर मूर्ती व चित्रे तयार करीत. प्रभात फेरीतील बहुतेक सगळे फलक व त्यावरची महात्मा गांधी वगैरे पुढाऱ्यांची रंगीत चित्रे तुकाराम सुतार मारुतीच्या देवळात बसून काढीत असे. दादा सुतार सुंदर कोरीव अक्षरात फलकावर घोषणा लिहीत असे. मी देवळात जाऊन तासन्‌तास त्यांची ती कलाकुसर पहात उभा राही. माझे वडील गांधीजींचे अनुयायी होते. ते डोक्यावर नेहमी गांधी टोपी घालत, एकदा गावातील दुकानात जाऊन मी एका ढबू पैशाची पितळीटकळी विकत घेतली. पैशाला तीन मिळणाऱ्या कापसाच्या लडी विकत घेतल्या. आणि टकळी गरागरा फिरवून बारीक जाड सूत काढायला शिकलो. काही मुलांनी चिकाटीने स्वतःचा एक सदरा तयार होईल एवढा सुताचा वाटोळा गठ्ठा टकळीवर काढला. पण मला ते कधीच जमले नाही. माझा टकळीचा उत्साह कधी तरी मध्येच ओसरला. पण

तुकारामाच्या चित्रकलेचे माझे आकर्षण मात्र कधींच ओसरले नाही. तुकाराम कधी सकाळ दुपारचा देवतळचाच्या काठावर हिरवळीत समोर फलक ठेवून निसर्गचित्रे काढीत बसायचा. रंगून जायचा. मी हळूच पावले न वाजवता त्याच्या पाठीमागे जाऊन उभा रहायचा. कधी अंगात लंगोटी किंवा कास्टी तेवढीच असायची, का कुणास ठाऊक, इतर मुलांनी घोळका केला तर तुकाराम त्यांच्यावर रागावून त्याना घालवून देत असे. मला मात्र आपल्या जवळ राहू देत असे. चव्हाटयावर आमचे शेजारी दुकानदार काका वाणी हे प्रेमळ व हौशी गृहस्थ होते· माझ्या वडीलांचे ते जिवलग स्नेही होते. त्यांचा मुलगा मधू हा माझ्याच वर्गात होता. त्याच्याबरोबर अभ्यास करण्यासाठी मी दुपारचा त्याच्या घरी गेलो की काका व काकांची म्हातारी आई माझ्या हातावर खडी-साखरेच खडे ठेवी व खड्खडे लाडूसुद्धा खायला देई. एकदा काका वाण्यांनी आपल्या घराची गणपतीची खोली तुकाराम सुताराकडून संपूर्ण रंगवून घेतली. रस्त्याच्या कडेने काकांच्या घराची ती खोली आजही आहे तश्शीच आहे. खोलीच्या एका बाजूच्या लांबलचक भितीवर तुकारामाने चार मोठी भव्य चित्रे रंग व आकृतीसुंदर अशी काढली. रात्रंदिवस तो समोर वेग-वेगळ्या ओल्या रंगाच्या वाटया ठेवून व हातात कुंचला घेऊन पुरुषभर उंचीची त्या चित्रातील माणसे सजीव साकार करायचा. भूकतहान अभ्यास विसरून मी तासन् तास नि दिवसन् दिवस तुकारामाची ती अद्भूत किमया पहात त्या खोलीत उभा किंवा बसलेला राही. एक चित्र गुडघे दुमडून चरखा चालवीत बसलेल्या पंचाधारी गांधीजींचे होते. दुसऱ्या चित्रात गंगावतरणाचा देखावा होता. तिसऱ्या चित्रात राम लक्ष्मण सीता वनवासात मायावी हरीण पहात होते. चौथ्या चित्रात खडकावर आदळत असलेले देवकीचे बाळ कंसाच्या हातून निसटलेले होते. लहानपणीच एके दिवशी तुकाराम सुतार मरण पावल्याची वार्ता कानावर आली. ती हुरहूर आजही मला छळते,

प्र. श्री. नेरूरकर

सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत व आमचे मार्गदर्शक स्नेही श्री. प्र. श्री. नेरूरकर यांच्या वयाला येत्या रविवारी, १४ फेब्रुवारीला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. वाङ्मयीन चळवळ वा अन्य कोणतीही गोष्ट असो, ती साकार करण्यासाठी ते आजही, जे कष्ट घेतात, उत्साह दाखवितात तो पाहिला की नेरूरकर साठ वर्षाचे होत आहेत यावर विश्वास बसत नाही. श्री. नेरूरकर यांचे जन्मगाव नेरूर व त्यांना घडविलं मुंबईनं ! असे असले तरी बेळगावशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण बेळगावला झाले. कै बॅरिस्टर नाथ पै हे त्यांचे महाविद्यालयातील वर्गमित्र. वक्तृत्व स्पर्धेच्या तयारीसाठी नाथ पै यांच्यासमवेत बेळगावातील अनेक संध्याकाळ त्यांनी घालविल्या आहेत. श्री. नेरूरकर यांचा आणि आमचा गेल्या बारा वर्षांचा ऋणानुबंध आहे. ' ज्वाला ' दिवाळी अंक व ' बेळगाव वार्ता 'च्या जडणघडणीत त्यांचे प्रथमपासूनच आम्हाला मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आले आहे. पन्नास वर्षापूर्वीच्या बेळगावातील आपल्या वास्तव्यातील सुखद स्मृतीना ' बेळगाव वार्ता ' तील ' बकुळीची फुले ' या सदरातून ते उजाळा देत असतात.

गोवा मुक्ती संग्रामात कार्य करीत असतानाच, सरहद्दीवरील बातम्या मुंबईच्या ' दैनिक मराठा ' वृत्तपत्राला ते पाठवीत असत. या आंदोलनाची व्याप्ती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी लँबर्ट मस्कारेन्हस यानी गोवा मुक्ती संग्रामावर लिहिलेल्या इंग्रजी कादंबरीचा ' गोवा माझा सुखाचा ' या नावाने त्यांनी मराठीत अनुवाद केला. या व्यक्तिरिक्त त्यांनी विपुल लेखन केले आहे. कथा, प्रवासवर्णन, ललित लेख, समीक्षा, मुलाखत असे विविध वाङ्मयीन प्रकार त्यांनी हाताळले आहेत. अनवाणी चाल, माझ्या आजोळची

वाट, कॉकटेल, कोकणातील ख्रिस्ती समाजावरील 'किरिस्ताव' (कादंबरी) आदि त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. १९७३ साली 'प्रवासिनी' या त्यांच्या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचे पहिले पारितोषिक मिळाले आहे. श्री. नारायण सुर्वे यांच्या कवितांचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला आहे. सौ. कृष्णा चौधरी यांच्या समवेत. 'On the Pavement of Life' हे त्या पुस्तकाचे नाव आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक नामवंत दिवाळी अंकांतून त्यांनी सातत्याने लिखाण केले आहे. त्यातून मुलाखतीचा एक आगळा आणि वैशिष्टचपूर्ण प्रकार त्यांनी रूढ केला.

शिक्षकी हा त्यांचा पेशा. गतवर्षीच या पेशातून ते निवृत्त झाले. मुंबईच्या कोळीवाडा (वरळी) या मागास भागातील जनता हायस्कूलचे ते मुख्याध्यापक होते. मागास भागात फिरून 'मागासलेल्या मुलांचे भावनात्मक प्रश्न' या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला आहे. तसेच डॉ. ऑर्थर मोर्स यांच्या शैक्षणिक विषयावरील ग्रंथाचा 'शाळा–आजच्या व उद्याच्या' या नावाने अनुवाद केला आहे. शिक्षण क्षेत्रातील बत्तीस वर्षाच्या त्यांच्या सेवेचा केंद्र सरकारच्या शिक्षणखात्याने १९७८ साली त्यांना राष्ट्रीय शिक्षक पारितोषिक देऊन गौरव केला आहे. पत्रकार म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. भूतपूर्व संरक्षण मंत्री स्व. कृष्ण मेनन यांच्या 'सेंच्युरी' या साप्ताहिकात ते दहा वर्षे मराठी साहित्यावर इंग्रजीत लिहीत होते. त्यांच्या त्या लेखनाचे भाग परदेशी वृत्तपत्रानीही छापले होते. तसेच 'मेनस्ट्रीम' 'क्लॅरिटी', 'पॅट्रिअट', 'टाईम्स ऑफ इंडिया', 'लिंक', 'युनायटेड एशिया', 'लोटस' या इंग्रजी साप्ताहिकातून व मासिकातून त्यानी मराठी साहित्य विषयक लेखन केले आहे. 'क्लॅरिटी' मधून त्यांनी अनेक दलित साहित्यिकांचा इंग्रजी वाचकांना परिचय करून दिला आहे. स्वातंत्र्य लढ्यात भूमिगत असताना १९४३–४४ साली नागपूरच्या 'इन्किलाब' या साप्ताहिकाचे डॉ. सुरेन्द्र बारलिंगे मुख्य संपादक होते व प्र. श्री. नेरूरकर सहाय्यक संपादक होते. त्या तीनचार वर्षांच्या काळात 'इन्किलाब' मधून ते मराठी साहित्याचे दालन सांभाळीत. मराठीतील नव्या ताज्या पुस्तकांची समीक्षा ते लिहीत. शिवाय पाश्चात्य कादंबरीकारांचा सखोल परिचय करून देणारी लेखमाला त्यानी 'इन्किलाब

मध्ये लिहिली. टॉलस्टॉय, डॉस्टोव्हस्की, थॉमस मन, रोमाँ रोलाँ या लेखकांवर त्यानी विपुल लिहिले. तसेच दूरदर्शनवर ' प्रतिमा व प्रतिभा ' हा कार्यक्रमहि त्यांनी सादर करून दलित साहित्यिकांचा प्रेक्षकांशी सुसंवाद घडवून आणला आहे.

धी ग्रेट रॉयल सर्कशीचे मालक श्री. नारायणराव वालावलकर यांच्या जीवनावर पुस्तक लिहिण्यासाठी, त्यांच्या सर्कशीसमवेत त्यांनी आफ्रिकन देशांचा दौरा केला. मॉरिशस हा तर त्यांचा जिव्हाळ्याचा विषय ! या देशाला ते दोनदा भेट देऊन आले. तेथील मराठी जनतेचा महाराष्ट्राला परिचय करून देण्याचे, त्यांचे भारताशी संबंध प्रस्थापित करण्याचे महत्वपूर्ण कार्य ते करीत आहेत. मुंबईतील नवोदित पुरोगामी लेखकांना ' प्रगत साहित्य सभा' या संस्थेत त्यांनी एकत्र आणले. दलित साहित्याच्या विकासाला त्यांचा फार मोठा हातभार लागला आहे. मराठी साहित्य शारदेची सेवा घडून त्यांच्याकडून विपुल साहित्यनिर्मिती व्हावी यासाठी त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो, अशी ' बेळगांव वार्ता व ' ज्वाला ' परिवारांतर्फे आम्ही मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

(बेळगाव वार्ता–बेळगाव, संपादकीय. ता. १२ २-१९८२)

❋

REFBK-0024667

प्र. श्री. नेरूरकर यांचे प्रकाशित साहित्य

ललित लेख : (१) अनवाणी चाल
(२) माझ्या आजोळची वाट

लघुकथा : (१) प्रवासिनी [महाराष्ट्र राज्य साहित्य पारितोषिक]

कादंबरी : (१) किरिस्ताव
(२) कॉकटेल
(३) गोवा माझा सुखाचा [अनुवादित]
(४) रस्ता [अनुवादित]

नाटक : (१) अशांतता ! शाळा चालू आहे !

बालवाङ्मय : (१) सुब्रह्मण्यमं भारती [चरित्र]
(२) हौसा कथा भाग १ ला
(३) हौसा कथा भाग २ रा

शैक्षणिक : (१) शाळा : उद्याच्या : आजच्या [अनुवादित]

प्रवासवर्णन : (१) मॉरिशस डायरी

इंग्रजी : On The Pavement of Life
[कवी नारायण सुर्वे यांच्या कवितांचा इंग्रजी अनुवाद]

बकुळीची फुले

शुद्धिपत्रक

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६	वरून ६ वी	तो रंजनाची	तोरंजनाची
६	,, ७ वी	फाद्याफाद्यावर	फांद्याफांद्यावर
६	खालून १२ वी	बायरन	बावरन
६	,, ३ री	द्यायचे	घ्यायचे
८	वरून २ री	डोळ्याला	डोक्याला
१०	खालून ११ वी	हॅरस	हॅरिस
१२	वरून ७ वी	डाकं	डोकं
१६	खालून १३ वी	अनवानी	अनवाणी
१९	वरून ७ वी	कँटोनमध्ये	कँटोनमेंटमध्ये
२४	,, २ री	होतो	होती
३४	खालून ९ वी	चिडोचूप	चिडीचूप
३५	,, ५ वी	डाळकूग	डाळकुट
३८	,, ११ वी	डबाल...चा	डबल ब्रेस्टचा
३८	,, ४ थी	मेन अॅण्ड विपिन	मेन अॅण्ड वुमेन
४१	,, १२ वी	आठवतं	आठवते
४७	,, ११ वी	भारताचं	भासाचं

४९	वरून ३ री	लयात	लयीत
५०	,, ५ वी	हातानं	दुसऱ्या हातानं
५२	,, १ ली	करणार	करणारे
५३	,, १२ वी	विझा	विझार्ड
५४	,, १ ली	पब्लीक इन्स्पेक्टर	पब्लीक इस्ट्रक्शन अधिकारी
५७	,, १ ली	यानी	त्यानी
६०	,, ५ वी	चंद्रचड	चंद्रचूड
६८	,, ७ वी	दावून	दाबून
७१	,, ४ थी	मादकूर	मांदकूर
७२	,, ३ री	जोपायचो	झोपायचो
७२	खालून ११ वी	काल	काळ
७५	वरून २ री	बींडीवर	बोंडीवर
८१	खालून ८ वी	–ही	मीही
८६	वरून ९ वी	पडित	पंडित
८७		मारते	मारीत

०—०

प्र. श्री. नेरुरकरांनी 'बकुळीची फुले' या तीस लघु-लेखांत आपल्या विसाव्या-एकविसाव्या वर्षापर्यंतच्या आठवणी सांगितल्या आहेत. लेखांचे आकडे विसरायला लावणारी प्रवाही उत्कटता त्यात आहे.....

आजच्या काळातला **प्र. श्री. नेरुरकर** हा विविध भूमिकांनी समृद्ध आहे. कथा, कादंबऱ्या, संपादन, समीक्षा, अध्यापन, मुलाखत, भाषण, प्रवास, गोवा सत्याग्रह, अनुवाद, अशा क्षेत्रात तो समर्थपणे वावरला आहे. इथल्या आठवणी इतक्या विनाभाष्य आहेत की त्या ह्या सर्व भूमिकांचा विसर पाडायला लावतात. हे या आखीव-रेखीव नसलेल्या पाल्हाळिक लेखांचे यश आहे.

— प्रा. आ. ना. पेडणेकर
अलिबाग.